


महाराष्ट्राचे जिल्हे

धुळें

(पश्चिम खानदेश)

महाराष्ट्राचे जिल्हे

धुळें

किंमत २५ नवे पैसे

ऑगस्ट १९६१

म हा रा ष्ट्र रा ज्य जि ल्हा प रि च य

धुळें जिल्हा

पृष्ठ

ओझरतें दर्शन ५

१. परिचय ३

भौगोलिक रचना--हवामान व पाऊस

२. धुळें जिल्ह्याची ऐतिहासिक पार्श्वभूमि ९

प्रास्ताविक--वसाहत--ज्ञात राज्यकर्ते--अभीर उर्फ अहीर--चालुक्य (बदामी) --राष्ट्रकूट--यादव सिन्नर व देवगिरी सुलतान (दिल्ली)--फरुकी (अरब)--राजपूत व राऊळ मोंगल--मराठे-पेशवे--होळकर-शिंदे--इंग्रज--स्वातंत्र्य.

३. लोकजीवन १६

लोकसंख्येची वर्गवारी--सण--रोट (कानबाई)--राणा देवी भालदेव.

४. शासनव्यवस्थेचें स्वरूप २०

सरकारी अर्थव्यवहार--पोलीस यंत्रणा व पोलीस स्टेशन्स--न्यायदानाची व्यवस्था --महसूल न्यायालयें--दिवाणी व फौजदारी न्यायालयें--स्थानिक स्वराज्य संस्था --नगरपालिका जिल्हा लोकल बोर्ड--तक्ता.

५. शेती २४

भू-भाग--पिकें--शेतकरी व त्याची शेती करण्याची पद्धति-विरनार कापूस विस्तार योजना--जमीन संरक्षण--शेतकी संशोधन केंद्र--शेतकी शिक्षण--आधुनिक पद्धति व शेतीसुधारणा--सुधारलेलीं बी-बियाणीं--खतांचा पुरवठा--बागायतीसाठीं अधिक पाणी-पुरवठा--भाजीपाला व फलोद्यान--पीक मोहीम--रब्बी ज्वार प्रायोगिक योजना--लांब धाग्याच्या कापसाची योजना--ऊंस मोहीम--पीक-संरक्षण योजना--शेतकी प्रात्यक्षिक केंद्रें--पीकस्पर्धा व प्रदर्शनें--शेतकरी संघ--तुकडेजोड--भूमिहीनांना जमीन--पशुधन व संवर्धन.

६. पाणीपुरवठ्याच्या योजना ३५

छोटे पाटबंधारे--लहान पाटबंधाऱ्यांचीं कामें--सय्यदनगर बंधारा--पुरमेपाडा--शहादा कालव्याचा विस्तार--करवंद बंधारा--वसमार बंधारा--कापडणें पाट--बेटावद कालवा--चिमढाणा बंधारा--विहिरी व तळ्यामधून पाणी पुरवठा.

७. जंगलें व उपवनें ३९

लांकूड--कुरणें--बांबू--जंगल विकासाच्या योजना--घायपात अथवा केतकीच्या कुंपणाची लागवड--जोपासना केंद्रें--औषधी रोपें--बांबूची लागवड--टीकची लागवड--काड्याच्या पेटचांचें लांकूड--लाखेची लागवड--डिपार्टमेंटल डेपो--जमीन संरक्षण विषयक प्रात्यक्षिकें--जंगलांतील दळणवळण--वन्य पशू व त्यांचें निवासस्थान.

८. उद्योगधंदे ४४

कुटिरोद्योग--शिक्षणाची सोय--जिल्हा खादी आणि ग्रामोद्योग मंडळ.

९. सहकार ४९
इतिहास--शेतकी कर्ज व पतपुरवठा--मध्यवर्ती सहकारी बँक --सहकारी लँड मॉर्गेज बँक--नागरी सहकारी बँक--सावकारी नियंत्रण--सेवा सहकारी संस्था--मोठ्या आकाराच्या विविध सहकारी संस्था--शेती सहकारी संस्था--पाणीपुरवठा सहकारी संस्था--पीक संरक्षण सहकारी संस्था--घरबांधकाम सहकारी संस्था--शेतमालावर प्रक्रिया करणाऱ्या सहकारी संस्था--सहकारी साखर कारखाना--मच्छीमार सहकारी संस्था--वीजपुरवठा सहकारी संस्था--दूध उत्पादक सहकारी संस्था--सहकारी शिक्षण संस्था--सहकारी प्रशिक्षण वर्ग--सहकारी कायद्यांची अंमलबजावणी व मार्गदर्शन--नियंत्रित बाजार पेठा--निरनिराळ्या पेठांत होणारी आवक--सहकारी बाजार व्यवस्था.

१०. वाहतुकीचे मार्ग व बांधकाम ६०
खेडीं जोडणारे रस्ते--प्रमुख रस्ते--राष्ट्रीय मार्ग--राज मार्ग--जिल्हा मार्ग--सेतुबंधन--सारंगखेडा पूल--इमारतींचें बांधकाम--दळणवळणाचीं साधनें--रेल्वे वाहतूक--रस्ते वाहतूक.

११. स्वास्थ्य आणि वैद्यकीय चिकित्सा ६९
उपचार व्यवस्था--प्राथमिक आरोग्य केंद्रें--कुटुंब नियोजन--कॉटेज हॉस्पिटल--प्रतिबंधक उपाय योजना--सॅनिटरी पथकें--कुष्ठरोग प्रतिबंध--परिचारिकांचें शिक्षण--पाणीपुरवठा योजना--रेडक्रॉस--मलेरिया प्रतिबंधक व निर्मूलन कार्य.

१२. शैक्षणिक प्रगतीची वाटचाल ७१
प्राथमिक शिक्षण--प्राथमिक शिक्षण महाविद्यालयें--मूलोद्योग--शालेय इमारती--दुय्यम शिक्षण--तांत्रिक शिक्षण--उच्च शिक्षण--वाचनालयें--शिक्षणाच्या विविध सोयी--साक्षरतेचें प्रमाण.

१३. समाज सेवा ७६
समाज कल्याण--बालवाडी संस्कार केंद्रें व वसतिगृहें--शैक्षणिक सवलती--आदर्श आदिवासी वसाहत पानखेडा--मध्यवर्ति समाज कल्याण मंडळ--रिमांड होम्स--सामुदायिक विकासानें जनजागृति--जिल्हा विकास मंडळ--समाज विकास गट.

१४. सर्वोदय ८२

१५. प्रेक्षणीय स्थळें, महत्त्वाचीं शहरें आणि यात्रा ८५
थंड हवेचें ठिकाण तोरणमाळ--ऐतिहासिक स्मृतिस्थळें--थाळनेरचा किल्ला--लळिंग किल्ला--देवळें--यात्रा--प्रमुख शहरें--राजवाडे संशोधन मंदिर, धुळें--श्री समर्थ वाग्देवता मंदिर, धुळें--प्रवाशांचीं विश्रामस्थानें--इन्स्पेक्शन बंगले--जंगल विभागाचे बंगले.

१६. विविध माहिती ९०
टपाल, तार व टेलिफोन व्यवस्था--वृत्तपत्रें आणि नियतकालिकें--प्रसिद्धि व सामुदायिक श्रवण--महापूर संकट निवारण मंडळ--जिल्हा उद्योगविनिमय केंद्र--जिल्हा अल्पबचत सल्लागार मंडळ--जिल्हा माजी सैनिक मंडळ--जिल्हा आकडे--शास्त्र कचेरी--जिल्हा होमगार्ड संघटना व भारत सेवक समाज--जिल्हा दारू-बंदी कचेरी--सेल्स टॅक्स, इन्कम टॅक्स व सेंट्रल एक्साईज--लाईफ इन्शुअरन्स--विद्युत् व्यवस्था--चित्रपट गृहें.

१७. कोणाकडे कशाची चौकशी करायची ९५

मुखपृष्ठ--तापी नदीवरील सारंगखेडा पूल

ओझरतें दर्शन

अक्षांश	२०° – ३१' ते २२° – २'
रेखांश	७३° – ३५' ते ७५° – १७'
क्षेत्रफळ	५०९१ चौरस मैल
लोकसंख्या	१३,५०,१४३
पुरुष	६,८७,०२३
स्त्रिया	६,६३,१२०
खेडीं	१३५२
शहरें	१२
महत्त्वाचीं पिकें ..	बाजरी, ज्वारी, भुईमूग, कापूस, तीळ, मूग, मका, नागली साळ, तूर, उडीद, गहूं, दादर, हरबरा
पिकाखालील जमीन	१९,६३,६११ एकर
जंगल	१४,००,३५७ एकर
नद्या	तापी, पांझरा, बोरी, अमरावती, शिवा, रंगवाल, नेसू अनेर, बालेर, अरुणावती, गोमती.
प्राथमिक शाळा ..	११६३
माध्यमिक शाळा ..	४६
उच्च शिक्षणाच्या शाळा	५
तांत्रिक शाळा ..	१
हॉस्पिटल व दवाखानें	७२
सहकारी संस्था ..	१०५९
शेती सहकारी संस्था ..	२०
औद्योगिक सहकारी संस्था	५९
जंगल कामगार सहकारी संस्था	६१
थिएटर्स	२४
वर्तमान पत्रें	११

१ : परिचय

महाराष्ट्र राज्याच्या उत्तर भागास धुळें जिल्हा आहे. साधारणतः २०°-३१' व २२°-२' उत्तर अक्षांश आणि ७३°-३५' व ७५°-१७' पूर्व रेखांश यांच्यामध्यें हा जिल्हा येतो. जिल्ह्याच्या उत्तर सीमेपलीकडे मध्यभारत, पश्चिमेकडे गुजरात राज्य, दक्षिणेकडे नासिक जिल्हा आणि पूर्वेस जळगांव जिल्हा आहे.

भौगोलिक रचना

जिल्ह्याचें एकूण क्षेत्रफळ ५०९१ चौरस मैल आहे. जिल्ह्यांत एकूण १३५२ खेडीं व १२ शहरें आहेत. भौगोलिक दृष्टया दख्खन पठाराचाच एक भाग असें धुळें जिल्ह्याचें वर्णन करतां येईल. या जिल्ह्याची भौगोलिक वैशिष्टचें तीन प्रकारचीं आहेत. जिल्ह्याच्या उत्तर भागांत पूर्व पश्चिम सातपुडा पर्वत पसरलेला आहे. या भागांत अक्राणी, अक्कलकुवा, शहादे या तालुक्यांचे भाग येतात. जिल्ह्याच्या पश्चिम भागांत सह्याद्रि पर्वताच्या उत्तर रांगा पसरलेल्या आहेत. या भागांत नवापूर, साक्री, धुळें व नंदूरबार तालुक्यांचा कांहीं भाग येतो. जिल्ह्याच्या मध्य भागांत सखल खोरें असून त्यांतून तापी नदी वाहात जाते. तापीचे हें खोरें अत्यंत सुपीक आहे. तापीला जिल्ह्यांतील अनेर, बालेर, अरुणावती, गोमती या नद्या जिल्ह्याच्या उत्तर भागांतून वहात येऊन मिळतात. दक्षिण भागांतून बोरी, पांझरा, बुराई, अमरावती, शिवा, रंगवाल, नेसू या नद्या येऊन मिळतात. या नद्याकांठची जमीन काळी व सुपीक आहे. खानदेश पठाराची उंची समुद्रसपाटीपासून ६०० ते ७०० फूट आहे. या जिल्ह्यांत डोंगराचे सुळके असून त्यांची उंची ३००० ते ३८०० फूट आहे. या ओळींतील सर्वात उंच सुळका अकरानी महालांतील तोरणमाळ असून त्याची उंची ३३१८ फूट आहे. या डोंगरावर १६ चौ. मैलांचा चिंचोळा पठाराचा भाग आहे. जिल्ह्यांतून पूर्व-पश्चिम वाहणाऱ्या तापी नदीच्या पात्राकडे प्रदेश उतरता होत गेला आहे. ही नदी जिल्ह्यांतील पावसाचें सर्व पाणी वाहून नेते.

तापी आणि तिच्या उपनद्या यांच्या काठावरील सुपीक काळ्या जमिनीचा सपाट भाग सोडला तर हा जिल्हा बहुतांशी डोंगराळच आहे. शिरपूर तालुक्यांतील तापीचा सपाट भाग अत्यंत सुपीक आहे. पण त्याच्या उत्तरेकडील भाग सातपुड्याच्या रांगांवरील जंगलांनीं भरलेला आहे. सर्व जिल्ह्यांत शहादे तालुक्यांतील जमीन फार सुपीक आहे. साक्री आणि नवापूर तालुके हे डोंगराळ आहेत. तसेच तळोदे तालुक्याचा उत्तर भाग व नंदूरबार तालुक्याचा दक्षिण भाग हेहि डोंगराळच आहेत. त्यामध्यें तापी आणि तिच्या उपनद्यांचा सपाट सुपीक प्रदेश पसरलेला आहे. तापी खोऱ्याचा

भाग सोडला तर सिंदखेड तालुक्याचा कांहीं भाग डोंगराळ व गवताळ आहे. धुळें तालुका हा छोटया टेकडयांनीं भरलेला असून या टेकडया पूर्वी जंगलांनीं व्यापलेल्या होत्या. परंतु आतां मात्र त्या टेकडया ओसाड आहेत.

जिल्ह्याचें सरासरी पर्जन्यमान २१ ते ४९ इंचापर्यंत असतें. सिंदखेडा तालुक्याचें पर्जन्यमान कमीत कमी म्हणजे २१ इंच आहे तर नवापूर तालुक्यांत तें जास्तींत जास्त ४९ इंच आहे.

हवामान व पाऊस

सर्व जिल्हयांचें एकत्र असे सरासरी पर्जन्यमान मात्र ३० इंच आहे. हा सर्व पाऊस मान्सूनचा असून तो जून तें ऑक्टोबर या महिन्यांत पडतो. जंगल सान्निध्याखेरीज इतरत्र हवामान सर्वसामान्यपणे विषम स्वरूपाचें असतें.

२ : धुळें जिल्ह्याची ऐतिहासिक पार्श्वभूमि

पश्चिम खानदेश जिल्ह्याचें नांव दि. २१ ऑक्टोबर १९६० पासून धुळें असें ठेवण्यांत आलें आहे.

महाभारत, रामायण, दशकुमारचरित यांत ऋषिक नांवाच्या प्रदेशाचे उल्लेख आढळतात. हें सर्व उल्लेख एकत्र केलें असतां ऋषिक देशाच्या पूर्वेस वऱ्हाड म्हणजे प्राचीन विदर्भ, उत्तरेस माळवा म्हणजे प्राचीन अनुप किंवा महिषक व दक्षिणेस मराठवाडा म्हणजे प्राचीन अश्मक असें देश असल्याचें आढळतें या भौगोलिक परिस्थितीशीं जुळणारा भूभाग खानदेशशिवाय दुसरा असू शकत नाहीं. यावरून खानदेशचें प्राचीन नांव ऋषिक असावें. तें नांव केव्हां लुप्त झालें व खानदेश नांव नक्की कोणत्या राजवटींत रूढ झालें याची माहिती नाहीं. खानदेश या नांवाची व्युत्पत्ति कोणी यादव राजा कान्हेरदेव यांच्या नांवावरून, कोणी सेऊणदेश या नांवावरून तर कोणी खानांचा देश तो खानदेश अशी निरनिराळी लाविलेली आढळते. अकबराच्या कारकीर्दींत याला दानदेश असें नामाभिधान प्राप्त झालें होतें. इंग्रजांच्या अमदानींत खानदेशचें विभाजन होऊन पश्चिम खानदेश असें नांव रूढ झालें, आणि आतां प्रारंभीं नमूद केल्याप्रमाणें धुळें जिल्हा असें त्याचें नांव ठेवण्यांत आलें आहे.

प्रास्ताविक

या जिल्ह्याच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीचा विचार करतांना प्रथमदर्शनी एक गोष्ट लक्षांत येते ती अशीं कीं पूर्वीच्या मोठ्या खानदेश जिल्ह्यांतून राज्यशासन सोईसाठीं पूर्व खानदेशचा विभाग वेगळा करून अवशिष्ट राहिलेला भाग पश्चिम खानदेश म्हणजे आतांचा धुळें जिल्हा होय. अर्थातच या जिल्ह्याची ऐतिहासिक पार्श्वभूमी, मूळच्या मोठ्या खानदेश जिल्ह्याच्या पार्श्वभूमीहून फारशी वेगळी नाहीं. एवढेंच नव्हे तर ती दक्षिणेस लागून असलेल्या नासिक जिल्ह्याच्या पार्श्वभूमीहूनसुद्धां फारशी वेगळी नाहीं. गेल्या दोन हजार वर्षांच्या कालखंडांत अनेक राजवंशांच्या राजवटींत नासिक व खानदेश एकाच सत्तेच्या अधिपत्याखाली असल्याचें इतिहास सांगतो.

वसाहत

धुळें जिल्हा प्राचीन कालापासून महाराष्ट्राचाच भाग असल्याने, महाराष्ट्राच्या वसाहत कालाबद्दलचें अनुमान याहि भूभागास लागू आहे. नासिक जिल्ह्यांत जोरवें, नगर जिल्ह्यांत नेवासें व दायमाबाद, पूर्व खानदेशांत बहाळ व पश्चिम खानदेशांत प्रकाशें येथें झालेल्या उत्खननावरून, ऐतिहासिक ताम्राश्म युगांत या भागांत वस्ती होती हें स्पष्ट दिसतें. या जिल्ह्यांतील तोरणमाळ येथील प्राचीन राजा युवनाश्व, भारतीय युद्धांत पांडवाच्या पक्षांत असल्याचा महाभारतांतील निर्देश या भागांतील पांडवकालीन वस्तीचा पुरावा होय.

आंध्रभृत्यशातवाहन––प्रागैतिहासिकालापासून तो ख्रिस्तपूर्व ३०० च्या सुमारापर्यंतचा काळ ऐतिहासिक दृष्टीनें, अजून सर्वत्र धुक्यांत आहे. पितळखोरें, अजिंठा, इ. लेण्यांतील लेख, शिल्पें, यावरून असें दिसतें कीं ख्रिस्तपूर्व ३०० च्या सुमारास शुंगासारख्या बुद्ध मतानुयायी राजवंशांच्या सत्तेखालीं हा प्रदेश असावा. या प्रदेशावर राज्य करणाऱ्या ज्या राजवंशाबद्दल निश्चित स्वरूपाची माहिति मिळते असा पहिला राजवंश म्हणजे आंध्रभृत्य अथवा शातवाहनांचा. नाशिक जवळच्या लेण्यांतील लेखाधारें शातवाहन घराण्यांतील दुसरा पुरुष कृष्ण याची या भागावर ख्रिस्तपूर्व २ च्या शतकांत सत्ता होती असें दिसतें. पुढें इ. सनाच्या पहिल्या शतकापासून ते इ. स. १२५ ते १३५ च्या दरम्यान गौतमीपुत्र शातकर्णी यानें शातवाहनांची सत्ता पुन्हा प्रस्थापित करीपर्यंत, नहपान, क्षहरात इत्यादि शक अथवा पारद क्षत्रपांच्या सत्तेखाली हा भूभाग होता. पुढें शकवंशीय क्षत्रपराजा रुद्रदामन् यानें शातवाहनांचा पराभव करून ४० वर्षें राज्य केलें असावें. हा काळ सुमारें इ. स. २१०-१५ चा येतो. येथून पुढें इ. स. ४१९ पावेतोंचा म्हणजे सुमारें दोनशें वर्षाचा कालखंड ऐतिहासिक दृष्टया अजून धुक्यांतच आहे.

ज्ञात राज्यकर्ते

नाशिक जवळच्या लेण्यांतील इ. स. ४१९ च्या एका शिलालेखावरून नाशिकवर वीरसेन अभीराची सत्ता होती. साहजिकच खानदेशहि अभीरांच्या सत्तेखालीं असावा. नागपूर युनिव्हर्सिटीच्या जर्नलमध्यें डॉ. म. म. मिराशींचा एक लेख प्रसिद्ध झालेला आहे. सदर लेख डॉ. आर. सी. मुजुमदारांनीं संपादित केलेल्या स्वामीदास, भुलुंड, रुद्रदास या राज्यांनीं दिलेल्या व इंदूरचे असें सजमले जाणाऱ्या ताम्रपटाबाबत आहे. सदर ताम्रपटांचें उपलब्धि स्थळ ज्ञात नाहीं. परंतु सदरचे ताम्रपट खानदेशांतील असावे, व ते देणारे राजे कोणाचे तरी मांडलीक म्हणून खानदेशवर राज्य करीत असावेत असा सयुक्तिक निष्कर्श डॉ. म. म. मिराशींनीं काढला आहे. तसेंच अजिंठा लेण्यांतील क्रमांक १७ मधील एका शिलालेखांत दिलेल्या वंशावळींतील कांहीं व्यक्तिनामांच्या सादृश्यावरून स्वामीदास, भुलुंड इ. राजे या वंशावळींतील लोकांच्या घराण्यांतील असावे व त्यावेळीं खानदेश ज्या अभीर सम्राटांच्या साम्राज्यांत होता त्याचे मांडलीक असावेत, असा निष्कर्ष, ताम्रपटांत उल्लेखिलेलीं वर्षें अभीर राज्यारोहण शकाशीं जुळतात, यावरून काढला आहे. स्वामीदासाचा काळ इ. स. ३१६-१७ ठरतो. अजिंठा वंशावळींतील शेवटचा राजा, इ. स. ४७५ ते ५०० च्या दरम्यान होऊन गेलेल्या वाकाटक राजा हरिशेन याच्या समकालीन होता. खानदेशवर अभीरांची सत्ता सुमारें १६०-१६५ वर्षें असावी. खानदेशची अहिराणी भाषा व अहीर सोनार, अहीर शिंपी इत्यादि लोकसमाज यांचा विचार करतां खानदेश अभीरांच्या केवळ सत्तेखालीं होता असें नसून तो अभीर लोक समुहाचें वसतिस्थान असला पाहिजे असें दिसतें.

अभीर उर्फ अहीर

खानदेश नाशिक या प्रदेशावर अभीराची सत्ता असतांना, महाराष्ट्राच्या इतर भागांवर राष्ट्रकूटांची सत्ता असावी. अभीरांच्या राजवटीचा "गवळी राज" या नांवानें निर्देश खानदेश, नाशिक भागांतच केला जातो. इ. सनाच्या सहाव्या शतकाच्या प्रथमार्धांत जयसिंह चालुक्यानें राष्ट्रकूट वंशांतील राजा इंद्र याचा पराभव करून चालुक्य सत्तेचा पाया घातला व पुढें सबंध महाराष्ट्र जरी चालुक्य साम्राज्यांत अंतर्भूत झाला तरी खानदेश मात्र त्या काळांत गुप्तांचे यवन

चालुक्य (बदामी)

मांडलीक जे विंध्यशक्ति वाकाटक त्यांच्या सत्तेखालीं असावा असें मानण्यास जागा आहे. राष्ट्रकूट, यादव, इत्यादींच्या खानदेशांतील सत्तेची साक्ष देणारे ताम्रपट शिलालेख सांपडतात. परंतु चालुक्यांचा ताम्रपट अगर शिलालेख अजून खानदेशांत सांपडलेला नाहीं. इ. सनाच्या ४ थ्या शतकांतील चालुक्यांचा ताम्रपट पिंपळनेर येथें सांपडलेला आहे. परंतु तो बनावट मानण्यांत येतो. चालुक्यांची राजमुद्रा वराह चित्रांकित आहे व वराहाच्या दगडी मूर्ति वा प्रतिमा मात्र खानदेशांत आढळल्या आहेत. चालुक्यांची राजवट इ. स. ५०१ ते ७५३ अशी सुमारें अडीचशें वर्षे टिकली.

राष्ट्रकूट

चालुक्यांची सत्ता संपुष्टांत आणून राष्ट्रकूटांच्या राज्याचा पाया घालण्याचें काम दंतिदुर्गानें केलें. या घराण्यांतील राजा पहिला अमोधवर्ष याचें साम्राज्य उत्तरेस माळव्या पावेतों, दक्षिणेस म्हैसूर पावेतों, पश्चिमेस समुद्र किनाऱ्या पावेतों व पूर्वेस एक छोटीशी समुद्रकिनाऱ्या लगतची उभी पट्टी सोडून बाकीच्या भागांत पसरलेलें होतें. अर्थांत यांत खानदेशचा समावेश होताच. राष्ट्रकूटांचे धुळें, तोरखेडें, खर्दे, तळोदें, जवखेडे, पिंपरी वगैरे ठिकाणीं ताम्रपट सांपडले आहेत. राष्ट्रकूट राजवंश सुमारें २२० वर्षे म्हणजे इ. स. ९७३ पर्यंत सत्ताधिष्ठित होता. खानदेशांतील नेर, सत्तारपाडा वगैरे ठिकाणीं हूणांचीं गधिया पैसा म्हणून ओळखलीं जाणारीं नाणी सांपडलीं आहेत. तसेंच राष्ट्रकूट राजा कक्क याच्या एका ताम्रपटांत त्यानें हूणांचा पराभव केल्याचा उल्लेख आहे. कदाचित खानदेशच्या पश्चिम भागावर निदान सरहद्दीवर या काळांत हूणांची सत्ता असावी असा तर्क होतो.

यादव सिन्नर व देवगिरी

राष्ट्रकूटांच्या सत्तेचें हरण कल्याणीच्या म्हणजे उत्तर चालुक्यांनीं केलें. खानदेशवर मात्र त्यांची प्रत्यक्ष सत्ता नव्हती. सिन्नर येथील यादववंशीय राज्यांच्या सेऊणदेश नांवानें ओळखल्या जाणाऱ्या प्रदेशांत खानदेश समाविष्ट होता. या घराण्याच्या लोकांच्या साहाय्यानें चालुक्यांची सत्ता सावरली. याच घराण्यांतील पुरुष पांचवा भिल्लम यानें इ. स. ११९१ त चालुक्यांचें राज्य हस्तगत करून देवगिरी ही यादव साम्राज्याची राजधानी केली. वाघळी व धाबादेव येथील शिलालेखांचा काल विचारांत घेतां चालुक्यांच्या राजवटींतहि खानदेश यादव सत्तेखालीं होता. खानदेशांत बळसाणें, मेथी, वाघापूर, धाबादेव, विखरण, बहाळ, पाटण येथील देवळें त्यांच्या राजवटीची स्मारकें आहेत. मेथी येथील शिलालेखावरून समजतें कीं देवळांतील देवाची पूजा "चंदन धूपदीप वसने नैवेद्य नृत्या : क्रमैं" अशी भूषा व भोग सहित चालवावयासाठीं ब्राह्मणास जमिनी दिल्या आहेत. तेव्हां हा काळ समृद्धीचा असून लोकांचें जीवन सुखी असावें असें वाटतें. यादवांचे साम्राज्य इ. स. १३१० पावेतों होते.

सुलतान (दिल्ली)

इ. स. १३०६ त अल्लाउद्दीन खिलजीचा सेनापती मलिक काफूर सुलतानपूर येथें आला होता. अल्लाउद्दीन खिलजीकडून इ. स. १३१२ त पराभूत होऊन यादवांची सत्ता संपुष्टांत आली. या काळापर्यंत परधर्मीय सत्तेचा या भूप्रदेशाला स्पर्श झाला नव्हता. प्राचीन काळांत इकडे शक, यवन, पारद, पल्लव वगैरे वंशाचे राज्यकर्ते होऊन गेले. ते परकीय असले तरी परधर्मीय नव्हते हे त्यांच्या शिलाताम्रपटादि लेखांवरून दिसून येतें. महाभारत, पुराणें, मनुस्मृति आदि ग्रंथांतील वचनावरून उपरोक्त शक, यवन इत्यादि लोकसमूहांत एके काळीं चातुर्वर्ण्य पद्धति रूढ होती असें दिसून

येतें. येथें एका मुद्याचा अवश्य निर्देश केला पाहिजे. राष्ट्रकूट चालुक्यादि राजवंशांच्या उदयापूर्वीच बौद्धमताचें प्राबल्य भारतांत ओसरूं लागलें होतें. तशी जैन मताची स्थिति नसून राष्ट्रकूट राजांपैकीं कांहीं अधून मधून जैन मतानुयायी असल्याचें आढळतें. तसेंच जैन मतास राजाश्रय असलेलाहि आढळतो. इ. स. १३१२ त मलिक काफूरनें जें सुलतानपूर लुटलें तेथें आतां उध्वस्त स्थितींत असलेल्या गढीच्या जागीं जैन तीर्थंकर, यक्षी वगैरेंच्या अनेक छिन्नविछिन्न मूर्ति सांपडल्या आहेत. अशाच एका मूर्तीच्या बैठकीवरील लेखांत कालनिर्देश असून तो संवत १२१७ असा आहे. त्यावरून व तेथें आढळणाऱ्या इतर भग्न अवशेषांवरून असें दिसून येतें कीं यादवांच्या कालांत सुलतानपूर येथें––अर्थात पूर्वी या शहराचें नांव वेगळें असलें पाहिजे––जैनांची उत्कृष्ट कलाकृतियुक्त मंदिरें होतीं. सुलतानपूर हें नांव सुद्धां मलिक काफूरनें तें जिंकल्यानंतर प्रचारांत आलें असावें. इ. स. १३१२ त सुरूं झालेला दिल्लीच्या सुलतानांचा अंमल खानदेशवर इ. स. १३७० पावेतों होता. दरम्यान खानदेशाच्या कांहीं भागांत बहामनी सत्तेनें शिरकाव केलेला असावा.

फरुकी (अरब)

इ. स. १३७० मध्यें दिल्लीचा सुलतान फिरौज तघलक याला गुजरात वरील स्वारींत ऐन वेळीं मदत दिल्याबद्दल त्यानें मलिकराजा फरुकी नांवाच्या अरब तरुणास थाळनेर व करवंद असे दोन सुभे बक्षिस दिले. यानंतर मलिक राजा यानें आजूबाजूच्या प्रदेशावर स्वाऱ्या करण्यास सुरवात केली व हलके हलके संबंध खानदेश फरुकी राजांनीं आपल्या सत्तेखालीं आणला. सुरुवातीस फरुकीची राजधानी थाळनेर येथें होती. मलिक राजानें मरतेसमयीं मोठ्या मुलास ललिंगचा किल्ला व धाकट्यास थाळनेरचा किल्ला दिला. पुढें मोठा मुलगा मलिक नसीर यानें दगलबाजीनें अशीरगड जिंकून बऱ्हाणपूर आपली राजधानी केली. फरुकी घराण्यांतील एका मागून एक याप्रमाणें बारा लोकांनीं खानदेशवर इ. स. १६०० पावेतों म्हणजे सुमारें दोनशें तीस वर्षें राज्य केले. इ. स. १३९७ ते इ. स. १४०९ चा प्रसिद्ध दुर्गादेवीचा दुष्काळ पहिल्या फरुकीच्या राजवटीच्या अखेरीस पडला. परंतु फरुकींच्या काळांतील यूरोपीय प्रवाश्यांच्या प्रवास वर्णनावरून खानदेशांत समृद्धि असल्याचें दिसून येतें. फरुकी राजांपैकीं पहिल्या ३–४ राज्यकर्त्यांच्या कबरी थाळनेर येथें बांधलेल्या आहेत.

राजपूत व राऊळ

सोनगीर येथील पूर्व किल्ल्याच्या दरवाज्यावर असलेला शक १४९७ म्हणजे इ. स. १५७५ मधील शिलालेख उपलब्ध आहे. त्यांत उग्रसेनाचा मुलगा मानसिंग महाप्रतापी होता अशा आशयाचा मजकूर आहे. अर्थात सोनगीर किल्ला व त्याच्या आजूबाजूच्या कांहीं प्रदेशावर त्याची सत्ता असावी. सबंध खानदेश फरुकीच्या सत्तेखालीं असतांना अथवा पुढें अनुक्रमे मोगल व मराठे यांच्या सत्तेखालीं असतांना किल्लेवजा गढ्यांच्या आश्रयानें आजूबाजूच्या छोट्या प्रदेशांवर सत्ता ठेवणारे कांहीं राजपूत होते. कदाचित त्या त्या टापूंचें संरक्षण मध्य सत्तेनें त्यांच्याकडे सोपविले असावें. खानदेशांतील प्रसिद्ध साडेबारा राऊळ यापैकीच असावेत. गुजरात सुलतान अगर मोगल बादशहांच्या सैन्याबरोबर गुजरातेंतून किंवा राजपुतान्यांतून येऊन हे लोक इकडे स्थायिक झाले असावे.

मोगल बादशहा अकबर याच्या कारकीर्दींत खानदेश फरुकींच्या हातून मोगलांच्या ताब्यांत गेला. मोगली अंमलाच्या सुरवातीच्या ३०-३५ वर्षांत त्या सत्तेविरुद्ध सारखे उठाव होत होते. शहाजहानच्या कारकीर्दीस प्रारंभ झाल्यावर इ. स. १६२९-३० मध्यें खानदेशावर लढाई

आणि दुष्काळ असें दुहेरी संकट कोसळलें. दक्षिणचा पूर्वीचा सर सुभेदार खानजहान लोदी बंड करून उठला, तेव्हां त्याचा पाडाव करण्यासाठीं शहाजहान जातीनें दक्षिणेंत आला होता. त्यानें खानदेशावर पाठविलेल्या सैन्यानें पावसाळ्याचे चार महिने धुळें येथें मुक्काम केला होता. लढाईच्या पाठोपाठ

मोंगल

अमदाबाद ते दौलताबाद एवढ्या प्रदेशांत अवर्षणामुळें भीषण दुष्काळ पडला. पुत्राच्या वात्सल्यापेक्षां त्याचे मांस जास्त प्रिय वाटावयास लावणारा, असे त्या दुष्काळाचें वर्णन आहे. इ. स. १६३४ मध्यें वऱ्हाडच्या काहीं भागासह व दक्षिणेस गाळणा किल्ल्यापावेतों खानदेशचा स्वतंत्र सुभा करण्यांत येऊन त्यास राजा तोडरमलची जमीनमहसुलाची पद्धत लागू करण्यांत आली. सतराव्या शतकाच्या मध्याच्या सुमारास खानदेश संपन्नतेच्या शिखरावर होता. मोगल साम्राज्यांत इतके संपन्न भूभाग थोडे होते. इ. स. १६७० पासून पुढें मराठ्यांनीं मोंगली मुलखांत चौथाई व सरदेशमुखी वसूल करण्याचें धोरण स्वीकारल्यानंतर खानदेश अर्थातच त्याला अपवाद नव्हता. शिवाजी महाराजांनीं लगेच कांहीं महिन्यानंतर पहिल्यांदाच चौथाई व सरदेशमुखीची मागणी करून वसुली करण्यासाठीं प्रतापराव गुजरास खानदेशांत पाठविलें. इ. स. १७०८ मध्यें राजा शाहूनें खानदेशांत लूट केल्याचे नमूद आहे. पुढें इ. स. १७२० मध्यें तर बाळाजी विश्वनाथनें दिल्लीच्या पातशहाकडून ज्या दख्खनच्या सहा सुभ्यांत चौथाई सरदेशमुखी वसूल करण्याच्या सनदा मिळविल्या होत्या त्यांत खानदेशचा सुभा होताच.

मोगलांचा माळव्याचा सरसुभेदार म्हणून निजाम उल्मुल्कची नेमणूक झाल्यानंतर थोड्याच दिवसांनीं इ. स. १७२० मध्यें बंड करून व खानदेश जिंकून तो मोगलांच्या दक्षिणेकडील मुलुखाचा मालकच बनला. आतां दक्षिणेंत पसरत असलेल्या मराठी सत्तेचा व त्याचा संघर्ष अटळच होता. एका प्रसंगीं मराठ्यांचा वरचष्मा होऊन माळव्याशीं दळणवळण ठेवण्यासाठीं मराठ्यांनीं खानदेशांतून

मराठे-पेशवे

जावें, यावें—मात्र उपद्रव करू नये असा उभयतांत तह झाला. पुढें निजाम उल्मुल्कचा मुलगा सलाबतजंग याचा मराठ्यांनीं पराभव करून इ. स. १७५२ च्या भालकीच्या तहानें जवळ जवळ सर्व खानदेश हस्तगत केला आणि पुढें आठ वर्षांनीं मराठ्यांनीं अशीरगड जिंकून संपूर्ण खानदेशावर प्रभुत्व मिळविलें. पुढें कांहीं काळ शांततेंत गेल्यावर इ. स. १७६८ ते १७८४ च्या १६ वर्षांत पेशव्यांच्या भाऊबंदकीची झळ खानदेशला पण लागली.

इ. स. १७९५ मध्यें पेशव्यांनीं माळव्यालगतचा खानदेशचा भाग होळकरांना दिला. पाचोरें, यावल, रावेर वगैरे पूर्वेचा भाग शिंद्यांना दिला व पश्चिमेकडील नवापूर, तळोदे, अक्राणी–महाल वगैरे गायकवाडांच्या राज्याच्या सरहद्दीस लागून असलेला भाग नाना फडणीसांच्या देखरेखीखालीं होता. सुमारें इ. स. १८०० पावेतों होळकरांच्या भावाभावांतील भांडणांनीं खानदेश स्वस्थतेला पारखा

होळकर-शिंदे

झाला होता. पुढें ३–४ वर्षें होळकर, शिंदे, पेशवे, इंग्रज यांच्यांतील लढायांनीं हैराण झालेल्या खानदेशवर निसर्गाची अवकृपा होऊन भीषण दुष्काळ पडला. खूप गुरें ढोरें मेलीं, लोक परागंदा होऊन अनेक पांढऱ्या उजाड झाल्या. पूर्वी रखवालदार म्हणून रक्षणाचें काम करणारे भिल्ल डोंगर कपाऱ्यांच्या आश्रयाला जाऊन राहिले होते ते दुष्काळ संपल्यावर चोर दरोडेखोर बनून लूटमार करूं लागले. स्वसंरक्षणाचें सामर्थ्य नसलेल्या मोठमोठ्या जमिनदारांनीं रखवालीस ठेवलेले अरब जीवघेणी

सावकारी करूं लागले. यांत आणखी जमावंदी वसुली करणाऱ्या सरकारी अधिकाऱ्यांचा जुलूम. अशा स्थितींत प्रजेला कोणी वाली उरला नाहीं. इ. स. १८१६ त पेंढाऱ्यांचें नवें संकट उद्‌भवलें.

इ. स. १८१८ त मराठ्यांचें राज्य इंग्रजांनीं जिंकून घेतले. खानदेशावर कॅप्टन बिग्जची नेमणूक होऊन धुळें हें त्याचें मुख्य ठिकाण झालें. मराठ्यांचें राज्य घेतल्यावर भिल्ल, अरब, पेंढारी यांचा बंदोबस्त करून प्रजेला दिलासा देण्याची जबाबदारी इंग्रजावर येऊन पडली व सैन्यबळावर त्यांनीं ती पार पाडली. तरी सर्व स्थिरस्थावर होईतों इ. स. १८४६ साल उजाडलें. सुमारे इ. स. १७७० पासून इ. स. १८४० पावेतों चार पिढ्या हैराण गतींत काढलेल्या लाचार प्रजेला स्वास्थ्य मिळवून देणारे इंग्रज देवदूत भासले असल्यास नवल नाहीं. इ. स. १८४६ अखेर सर्व स्थिरस्थावर झाल्यावर इंग्रजी अंमलाची मोहिनी इ. स. १८५७ पावेतों टिकून त्यांतून जाग्या झालेल्या लोकांनीं पहिला स्वातंत्र्य-संग्राम सुरू केला. तत्पूर्वी इ. स. १८५२ मध्यें जमीन मोजणी विरुद्ध चळवळ होऊन कांहीं काळ वातावरण अस्थिर झालें होतें. इ. स. १८५७ च्या स्वातंत्र्य संग्रामांत खानदेशाचा वांटा खाजा नाईक या भिल्ल पुढाऱ्याच्या नेतृत्वाखालीं जमलेल्या सर्व समाजाच्या लोकांनीं उचलला असल्याचें दिसून येतें. स्वातंत्र्यानंतरची कांहीं वर्षे मोहनिद्रेंतच गेलीं.

इंग्रज

पुढें इंग्रजी अंमलाचें खरें स्वरूप जसजसें बुद्धिमंतांना दृग्गोचर होऊं लागलें तसतसें स्वातंत्र्य संपादनार्थ, एकाकी व सामुदायिक, सशस्त्र, निःशस्त्र, वैध, अवैध लोकजागृतिद्वारा सतत प्रयत्न होऊन इ. स. १९४७ च्या १५ ऑगस्टला भारत दास्यमुक्त झाला.

स्वातंत्र्य

१९६१ च्या खानेसुमारी प्रमाणें जिल्हयांतील सब्डिव्हिजन्स तालुके, खेडीं, पुरुष, स्त्रिया, एकूण साक्षर व लोकसंख्या पुढील प्रमाणें आहेत.

सब्-डिव्हिजन्स	तालुका	तालुक्याचें ठिकाण	खेडीं संख्या	एकूण पुरुष	एकूण स्त्रिया	एकूण साक्षर	एकूण लोकसंख्या
नंदूरबार	नंदूरबार	नंदूरबार	११६	७७३९९	७५५५३	४०२०२	१५२९५२
	नवापूर	नवापूर	८५	५३७७९	५१९६२	१५५९२	१०५७४१
	शहादा	शहादा	१८२	७८३५८	७७११५	३८६००	१५५४७३
	तळोदा	तळोदा	८८	३१९०३	३१७९७	१२६५०	६३७००
	अक्कलकुवा	अक्कलकुवा	१६०	२९२९६	२८०६०	४८८२	५७३५६
धुळें	धुळें	धुळ	१५०	१५३६०५	१४५१५७	१००४८७	२९८७६२
	साक्री	साक्री	१५३	९४२४०	९११६८	४१९८२	१८५४०८
	शिंदखेडा	शिंदखेडा	१३९	८७४२४	८४९३३	४७९०१	१७२३५७
	शिरपूर	शिरपूर	११९	६३०९८	६०६५७	३०६३२	१२३७५५
अक्राणी	अक्राणी (महाल)	धडगांव	१५३	१७९२१	१६७१८	१२८६	३४६३९
३	१०	१०	१,३५२	६,८७,०२३	६,६३,१२०	२,३४,२०५	१३,५०,१४३

३. लोकजीवन

धुळें जिल्ह्याची लोकसंख्या १९६१ च्या खानेसुमारीप्रमाणें १३,५०,१४३ आहे. ही लोकसंख्या जिल्ह्याच्या १० तालुक्यांतील १३५२ गावांची आहे.

१९६१ च्या खानेसुमारीप्रमाणें एक लाख किंवा त्याहून अधिक लोकवस्ती असलेलें एकहि शहर नाहीं. ९८३४३ लोकसंख्या असलेलें एकच शहर व तेंहि जिल्ह्याचें मुख्य ठिकाण धुळें आहे. १० हजार ते ५० हजार लोकवस्ती असलेलीं पांच शहरें असून ती पुढील प्रमाणें आहेत. नंदूरबार, शिरपूर, तळोदा, दोंडाइचा आणि शहादा.

एकूण लोकसंख्ये पैकी ६८७०२३ पुरुष व ६६३१२० स्त्रिया आहेत. म्हणजेच जिल्ह्यांतील स्त्री पुरुषांचें प्रमाण दर १,००० पुरुषांमागें ९६५ स्त्रिया असे आहे. शहरांत हें प्रमाण दर १,००० पुरुषांमागें ९४२ स्त्रिया असून ग्रामीण भागांत हेंच प्रमाण दर १,००० पुरुषांमागें ९७८ स्त्रिया आहे. शेतकरीवर्ग हा लोकसंख्येचा सर्वांत मोठा भाग आहे.

जिल्ह्यांतील एकूण साक्षर ३३४२०५ असून त्यांत २५३,४३१ पुरुष व ८०७७४ स्त्रिया आहेत.

जिल्ह्यांतील साक्षरतेचें प्रमाण २४.८ इतके असून पुरुषांत हें प्रमाण ३६.९ टक्के व स्त्रियांत १२ टक्के आहे. जिल्ह्यांत साक्षरतेचें प्रमाण सर्वांत जास्त म्हणजे ३३.६ टक्के धुळें तालुक्यांत आहे. तेंच अक्राणी महालांत फक्त ३.७ टक्के आहे. शेतकरीवर्गांत साक्षरतेचें प्रमाण फार कमी आहे.

लोकसंख्येच्या वर्गवारीवरून असे दिसून येतें कीं ह्या जिल्ह्यांत मागासलेल्या वर्गांतील लोकांची संख्या फार मोठी आहे. ती जवळ जवळ ५० टक्के एवढी आहे. ह्या ५० टक्के लोकसंख्येपैकीं ३७.४ टक्के लोक आदिवासी आहेत व बाकी १२.६ टक्के हरिजन व इतर मागासलेले लोक आहेत. जिल्ह्यांतील नवापूर, अक्कलकुवा व अक्राणी महाल ह्या भागांत आदिवासी बहुसंख्येनें असल्यामुळें हा भाग सुरुवातीपासून मागासलेला म्हणून सरकारनें जाहीर केला आहे. याशिवाय नंदूरबार, तळोदा, शहादा, साक्री व शिरपूर तालुक्यांच्या कांहीं भागांत आदिवासींचें प्रमाण बरेंच मोठें आहे. आदिवासी समाजांत बऱ्याच जाती असून त्यापैकीं या जिल्ह्यांत प्रामुख्यानें भिल्ल, पावरा, मावची, कोंकणी, धानका, गावीत, कातकरी व काथोडी ह्या जमाती आहेत. ह्या जमाती-

लोकसंख्येची वर्गवारी

पैकीं कोंकणी, धानका, गावीत व कांहीं भिल्ल शहराच्या आसपासच्या ग्रामीण विभागांत राहात असल्या-मुळें ते इतर आदिवासींच्या मानाने बरेच सुधारलेले वाटतात. परंतु अक्राणी महालांत सातपुडा पर्वताच्या दऱ्याखोऱ्यांतून राहाणारी आदिवासी जनता दोन पर्वतांच्या रांगांमधील सपाट जमिनीवरील थोडीशी शेती व जंगलाचें उत्पन्न यावरच आपलें पोट भरत असते. भारत देशांत निरनिराळ्या राजवटी आल्या, निरनिराळ्या सुधारणा झाल्या, वेष पालटला, शिक्षणाचा प्रसार झाला, नवे आचार विचार आले परंतु यापैकी कोणत्याहि गोष्टींचा या जनतेला स्पर्शहि झाला नव्हता. दोन तीन हजार वर्षांपूर्वीच्याच परिस्थितींत ते वावरत होते. शेताची जागा कशी तरी खणावयाची, त्यामध्यें पावसाळ्यांत मका किंवा दादर (ज्वारी) यांचे बी चिखलांत फेकावयाचे व पीक आल्यावर नुसती कणसें तोडावयाची अशी त्यांची शेतीची मागासलेली रीत होती. एक लंगोटी, वर कुडतें किंवा उपरणें व फेटा, असा पुरुषांचा वेष. स्त्रिया एक लुगडयाचे दोन तुकडे करून एक नेसण्यास व एक अंगावर पांघरण्यास घेत असत. शिक्षणाचें प्रमाण शेकडा १ सुद्धां पडणारें नव्हते. जमिनीची पाहणी नाहीं, शेतीची मोजणी नाहीं, त्याला नंबर नाहीं व ठरलेला शेतसारा नाहीं. अशा प्रकारें शेजारच्या सुसंस्कृत जगामध्यें मोठमोठें बदल असले तरी हे आदिवासी पूर्वी-प्रमाणेंच पुरातन काळांतील जीवन जगत होते. त्यांच्या देवता, त्यांचे सण, त्यांच्या विवाहपद्धति आणि करमणुकीच्या पद्धति, विशेषतः त्यांची लोकनृत्यें आणि लोकगीतें हीं सुधारलेल्या लोकांना भुरळ पाडणारीं अशीच आहेत. दारिद्र्य व अज्ञान यांत खितपत पडल्यामुळें त्यांची स्थिति अतिशय करुणाजनक झाली होती. तशांत दुर्दैवाची गोष्ट अशी की त्यांच्यांत चालू असलेल्या जुन्या चालीरीति व रुढी ह्या इतक्या खोलवर रुजल्या आहेत कीं हिताची अशी एकादी गोष्ट करतांना देखील ते आपल्या जुन्या चालीरीति बदलण्यास कांहीं वेळां प्रतिकार करतात. म्हणून त्यांच्या ग्रामीण संस्कृतीस कसल्या हि प्रकारचा धक्का न लावता त्यांची आर्थिक स्थिति सुधारण्याबाबाबत सरकार व सामाजिक कर्याकर्ते प्रयत्न करीत आहेत. अशा या आदिवासी शेतकऱ्यांची सुधारणा करण्याचा प्रयत्न या जिल्ह्यांत विकास योजनेच्या मार्गानें व सर्वोदय मंडळामार्फत चालूं आहे. वरिष्ठ जातीच्या वर्चस्वाखाली अनेक शतके राहिलेल्या अनुसूचित जाती अथवा हरिजन हे आतां जागृत झाले असून त्यांना आपल्या हक्कांची जाणीव झाली आहे. ह्या जिल्ह्यांत हरिजनांत महार, चांभार, मांग, गारुडी, भंगी ह्या जाती आहेत. इतर मागासलेल्या वर्गांत जवळ जवळ ३० जाती आहेत. त्या आजहि आपल्या परंपरागत पद्धतीनें आपली उपजीविका चालवीत असतांना दिसतात. अगदी अलीकडच्या काळांत सहकार्याचें लोण त्यांच्यापर्यंत पोहोचले असून या मागासलेल्या जातींतील कारागिरांनीं आपल्या सहकारी संस्था स्थापन केल्या आहेत व त्यांचीं कामें उत्कृष्ट प्रकारें चालूं आहेत.

या जिल्ह्यांत उरलेल्या ५० टक्के लोकसंख्येंत हिंदु समाज फार मोठा आहे. त्यांत मराठे, गुजर, राजपूत बहुसंख्य आहेत व ते बहुअंशी शेतकरी आहेत. ते कष्टाळू, कल्पक व काळजीपूर्वक शेती करणारे असून जुन्या परंपरागत कृषिपद्धतीऐवजी हळूंहळूं शेतीच्या आधुनिक तंत्रांचा अवलंब करीत आहेत. ते सरळ स्वभावाचे आहेत. यापैकी राजपूत व मराठे यांना लष्करी परंपरा असून त्यांच्यांत स्वाभिमान, चिवटपणा, काटक वृत्ति व कल्पकता इत्यादि गुण दिसून येतात. ह्या लोकांत, त्यांतल्यात्यांत गुजर लोकांत घोडयांची फार आवड दिसून येते. शेतांत जाण्या-येण्यास या घोडयांचा फार उपयोग होत असल्यामुळें बहुतेक सधन शेतकऱ्यांकडे एक तरी घोडा दिसून येतो. वरील जातीशिवाय माळी समाजहि बऱ्याच ठिकाणीं दिसून येतो. त्यांच्यांत

परंपरागत चालत आलेली बागायती किंवा मळा करण्याची पद्धत अजूनहि आहे. त्यांनीं आधुनिक बागायतींच्या निरनिराळ्या सुधारणांचा अवलंब केल्यामुळें आज ते भरपूर उत्पन्न काढीत आहेत. फार पूर्वी या प्रदेशांत उत्तर भारतांतून आलेल्या अहीर अथवा अभीर लोकांचीं राज्यें होऊन गेलीं. पुढें त्यांचा व यादवांचा निकट संबंध आला. अहिरांची सत्ता संपल्यावर ते या भागांत स्थिर झाले व आपलें वैशिष्टच टिकविण्यासाठीं ते प्रत्येक व्यवसायवाचक शब्दापुढें अहिर हे उपपद लावूं लागले. उदा. अहिर ब्राह्मण, अहिर सोनार, अहिर शिंपी, अहिर सुतार इत्यादि. आतां तेहि नाहीसे होऊन अहिर हे उपनांव फक्त शिल्लक राहिले आहे. अशा निरनिराळ्या व्यवसायांत गुंतलेल्या अहिर लोकांचीहि वस्ती या भागांत बरीच आहे. ह्या अहिर लोकांचें वैशिष्टच म्हणजे त्यांची अहिराणी बोली होय. ती आज या जिल्ह्यांतील बहुसंख्य लोकांची मातृभाषा आहे.

या जिल्ह्यांतील लहान मोठ्या गांवांमध्यें मुस्लीम जमात पसरलेली असून बहुतांश खेड्यांमध्यें थोड्या फार प्रमाणांत मुसलमान लोकवस्ती आढळून येते. शहरांत ते व्यापार धंदा, विशेषतः चाकू सुऱ्या व इतर लोखंडी सामानाचा व्यवसाय करतात आणि ग्रामीण भागांत घरगुती उपयोगाच्या लहान-लहान वस्तु बनविण्याचा उद्योग करीत असतात. ग्रामीण भागांत घर बांधण्याचें कामहि हे लोक करीत असतात. पानाच्या विड्यांसाठीं लागणारीं आकड्याचीं पानें विकण्याचा व्यवसाय बहारी लोक करतात. ह्या भागांत हिंदू आणि मुसलमान हे दोन्हीं समाज शतकानुशतके गुण्यागोविंदानें नांदत आले आहेत. ही गोष्ट दोन्ही समाजाच्या दृष्टीनें भूषणावह आहे.

ह्या जिल्ह्यांतील व्यापार बहुतेक मारवाडी, गुजराती, वाणी, बोहरी व कच्छी ह्या लोकांच्या हातांत आहे. आतां त्यांत सिंधी लोकहि बऱ्याच ठिकाणीं दिसून येतात. दूरवरच्या एकाद्या खेड्यांत सुद्धां कापडाचा व्यापारी हा बहुतेक गुजराती असतो तर वाण्याचा धंदा हा बहुधा मारवाडी करीत असतो. ते आपले व्यवसाय स्थानिक लोकांचा कोणत्याहि प्रकारचा रोष ओढवून न घेतां व त्यांत संपूर्णपणें समरस होऊन वर्षानुवर्षें करीत आहेत. पूर्वी ह्या जिल्ह्यांतील वंजारी लोक नेमाड, माळवा वगैरे उत्तरेकडील प्रदेशांतून बैल, घोडे, वगैरे आणून गुरांचा मोठा व्यापार व मालाची ने-आण करीत. अजूनहि या जमातीचे लोक थोड्या फार प्रमाणांत बैलांचा व्यापार करीत असतांना दिसून येतात. परंतु आतां दळणवळणाच्या सुखसोयी वाढल्यामुळें त्यांच्या या व्यापारास व भटक्या वृत्तीस आळा बसला असून त्यांचा हा व्यापार कमी झाला आहे व ते स्थायिक झाले आहेत.

ह्या जिल्ह्यांत वेगवेगळीं प्रादेशिक वैशिष्टचें असलेल्या ब्राह्मण, कायस्थ या प्रमुख व पुढारलेल्या जाती असून त्यांचा पांढरपेशा वर्गामध्यें समावेश होतो. शिक्षण, वैद्यक, कायदा, स्थापत्य व नोकरी ह्या व्यवसायांत त्यांचेंच प्रमाण जास्त आहे.

महाराष्ट्रांत साजरे होणारे सर्व महत्त्वाचे सण म्हणजे दिवाळी, दसरा, होळी पौर्णिमेचा उत्सव, गणपती वगैरे ह्या जिल्ह्यांतहि मोठ्या उत्साहानें साजरे होतात. वरील सणापेक्षां ह्या जिल्ह्यांत पोळा हा बैलांचा सण मोठ्या प्रमाणावर साजरा होतो. या जिल्ह्यांतील बहुसंख्य लोक शेतकरी असल्यामुळें व त्यांच्या जीवनांत बैलाला महत्त्वाचें स्थान असल्यामुळें या सणाला फार महत्त्व आहे. पोळ्याच्या दिवशीं बैलांकडून त्यांचें नेहमीचें काम करून घेण्यांत येत नाहीं. यांना रंगीबेरंगी साज देऊन व शिंगांना बाशिंगें लावून सजविण्यांत येते व त्यांची गावांतून मिरवणक काढण्यांत येते. कांहीं ठिकाणीं सायंकाळीं खुल्या

सण

मैदानावर बैलांच्या अथवा बैलगाड्यांच्या शर्यती होतात. सायंकाळीं बैलांची व शेतीच्या अवजारांची पूजा केल्यावरच शेतकरी जेवण करतो. हें जेवण पुरणपोळीचें असतें.

रोट (कानबाई)

ह्याशिवाय जिल्ह्यांत साजरे होणारे कांहीं सण वैशिष्ठ्यपूर्ण आहेत. त्यापैकीं रोट अथवा कानबाई हा सण श्रावण मासाच्या शुक्ल पक्षांत करतात. ह्या सणास रविवारीं आरंभ करतांना नदीवरून नारळ स्वच्छ धुवून पात्रांत घालून विधिपूर्वक घरीं आणण्यांत येतो. नंतर हा नारळ कलशासुद्धां चौरंगावर विधिपूर्वक स्थापून त्याची संध्याकाळीं पूजा करतात. ह्या ठिकाणीं सव्वापट गहूं घेऊन तें घरींच दळून न चाळतां त्याच्या पोळ्या करून याचा नैवेद्य देवाला दाखवितात. ह्यालाच रोट असें नांव आहे. हे रोट वा हा नैवेद्य फक्त दशाधिकारी (भाऊबंद) खातात. दुसरें दिवशीं म्हणजे सोमवारीं स्थापन केलेल्या कानबाईची बोळवण करतात. ह्या प्रसंगीं लाह्या, खोबरे व काकडी यांचा प्रसाद वाटण्यांत येतो.

राण.देवी

कांहीं ठिकाणीं राणादेवीच्या कृपाछत्राखालीं मौंजी व लग्नें लावण्यांत येतात. हा समारंभ फाल्गुन, चैत्र, वैशाख, जेष्ठ व माघ ह्या महिन्यांच्या शुक्ल पक्षांत होतो. तो दहा दिवस चालतो व त्याला वरील महिन्यांतील शुक्ल पक्षांतील कोणत्याहि रविवारी आरंभ करतात. ह्यांत पहिल्या दिवशीं घरांतील प्रमुखासहित सर्व मंडळी वाजत गाजत जाऊन आंब्याच्या झाडाखालील काळी माती पूजेसाठीं आणतात. ह्या काळ्या मातीला कस्तुरी असें नांव आहे. हीच माती राणादेवीच्या आसनाखालीं ठेवण्यांत येते. राणादेवीची आसनें दोन ते पांच असतात. हीं आसनें म्हणजे चौरंगावर एक तांब्याचा कलश ठेवून त्यावर छोटीशी कोरी पाटी व त्या पाटींत नारळ ठेवतात. कांहीं ठिकाणीं आंब्याच्या झाडाचे पाट तयार करतात व तांब्याखालील मातींत धान्य पेरतात. ह्या समारंभाच्या दहा दिवसामध्यें तेलाचे व तुपाचे दोन दिवे तेवत ठेवतात व राणादेवीची दिवसांतून तीन वेळा पूजा करतात. वरील समारंभ प्रसंगीं ज्याच्या त्याच्या ऐपतीप्रमाणें दोन ते पंधरा मेहुण (नवरा बायकोचीं जोडपीं) जेवावयास सांगतात. सदर जेवणांत पुरणाच्या पोळ्या व सांजोऱ्या ह्यांचा प्रामुख्यानें समावेश असतो. राणादेवीचें लग्न लावण्याच्या आधी मुलाची मौंज लावतात. राणादेवीचें लग्न शंकराशीं लागते. शंकराची मूर्ति कुंभाराकडून आणतात. राणादेवीचे टाक (प्रतिमा) सोन्याचे असतात. ह्या समारंभाच्या शेवटच्या दिवशीं केळीचे खांब आणून चौरंग मंदिरासारखा सजविण्यांत येतो. हा मंदिराचा आकार करतांना सुईदोऱ्याचा वापर न करतां फक्त कांट्यांचाच उपयोग करतात. देवीची पूजा संपल्यावर तिची नदीवर बोळवण करतात.

भालदेव

हाहि सण जिल्ह्यांतील वैशिष्ठ्यपूर्ण सण आहे. ह्या सणाची सुरुवात भाद्रपद शुद्ध प्रतिपदेस होते. तो कांहीं ठिकाणीं ७ दिवस व कांहीं ठिकाणीं ९ दिवस असतो. ह्यांत स्वतःच्या घरच्या जनावरांपासून मिळणाऱ्या दुधाचा, तुपाचा वरील ७ ते ९ दिवसाच्या काळांत सांठा करण्यांत येतो. स्वतःच्या घरचे दूध खाण्यास वरील दिवशीं बंदी करतात. त्यामुळें ह्या काळांत जिल्ह्यांत दुधा तुपाचा फारच तुटवडा भासतो. सातव्या किंवा नवव्या दिवसानंतर पूजा होते. नंतर मित्रमंडळी व नातेवाईक ह्यांना दूध, तूप, दही वाटण्यांत येते.

आदिवासी लोकांत भंगोऱ्या (होळी) हा सण फार धामधुमीनें साजरा करतात. त्यांच्यांत दिवाळी, दसरा वगैरे सणापेक्षां ह्याच सणाला जास्त महत्त्व आहे.

४. शासन व्यवस्थेचें स्वरूप

जिल्ह्याचें प्रमुख ठिकाण धुळें हें असून राज्यांतील बहुतेक राज्यकारभाराचे जिल्हा पातळीवरील अधिकारी धुळें येथें असतात. जिल्ह्याचें न्यायालय हेंहि धुळें येथेंच आहे. राज्यकारभाराच्या सोयीच्या दृष्टीनें जिल्ह्याच्या तीन सब् डिव्हिजन्स पाडण्यांत आल्या असून प्रत्येक सब्-डिव्हिजन्सच्या गांवीं एक प्रांताधिकारी असतो व तालुक्याच्या गांवीं तालुकाधिकारी असतात.

सरकारी अर्थव्यवहार

राज्य कारभारविषयक बाबींसंबंधी अर्थव्यवहार जिल्ह्यांतील धुळें येथें असलेल्या जिल्हा सरकारी ट्रेझरींतून होत असला तरी तालुका पातळीवरील लोकांची अधिक चांगली सोय व्हावी म्हणून तालुका पातळीवर सब-ट्रेझरींतून अर्थव्यवहाराचें काम चालूं असतें. सरकारकडून जिल्ह्याला आलेला पैसा व जनतेकडून सरकार जमा व्हावयाचा पैसा असे दुहेरी काम या सर्व ट्रेझरींतून होत असते. जिल्ह्यांत १ ट्रेझरी व ९ सब्-ट्रेझऱ्या आहेत. सब्-ट्रेझरी ह्या जिल्हा ट्रेझरीच्या कक्षेंत असतात. यापैकीं धुळें, शिरपूर, नंदुरबार येथील ट्रेझरीजचा देवाण घेवाणीचा व्यवहार बॅन्केमार्फत चालतो. बाकी सर्व ठिकाणचा हा व्यवहार सब्-ट्रेझरी स्वतःच करते.

पोलीस यंत्रणा
पोलीस स्टेशन्स

कायदा आणि समाज जीवनाची व्यवस्था सुरक्षित राहून वैयक्तिक स्वातंत्र्य अबाधित राहावें, यासाठीं जिल्ह्यांतील १२३६ (पैकी ६१६ हत्यारी) पोलीस ग्रामीण भागांत सेवाकार्य करीत आहेत. धुळें येथें जिल्हा पोलीस प्रमुखाची कचेरी असून जिल्ह्यांतील पोलीस कार्यावर त्यामार्फत मार्गदर्शन करण्यांत येतें.

तालुका पातळीवर पोलीस स्टेशन ठेवण्यांत आलें असून तेथें एक सब्-इन्स्पेक्टर व त्याला मदतनीस पोलीस ठेवण्यांत आले आहेत. जिल्ह्यांत अशी १५ पोलीस स्टेशनें पुढील गावांत आहेत. धुळें शहर, धुळें तालुका, सोनगीर, शिंदखेडा, दोंडाईचा, शिरपूर, थाळनेर, साक्री, नंदूरबार शहर, नंदूरबार तालुका, तळोदा, नवापूर, शहादा, सारंगखेडा, व धडगांव.

ग्रामीण भागांत जनतेच्या संरक्षणाकडे व सुव्यवस्थेकडे पाहाण्याची अधिक गरज असल्यामुळें जिल्ह्यांत खेड्यांचा गट करून त्यांत मध्यवर्ती अशा ठिकाणीं ३० पोलीस आऊट पोस्ट आहेत. त्यांत एक हेड कॉन्स्टेबल व मदतनीस पोलीस असतात. जिल्ह्यांतील पोलीस आऊट पोस्ट पुढील गांवांतून ठेवण्यांत आलीं आहेत. शिरुड, नेर, बोरीस, चिमठाणें, नरढाणे, बेटावद, निमगुळ, सुळें, सांगवी, पळासनेर, निजामपूर, पिंपळनेर, शेलबारी, उमरपाटा, धनोरा कोपरली, अष्टे, रनाळा,

बोरद, विसरवाडी, खांडबारा, प्रकाशा, रायखेडा, खासावद, खेडा नाका, असलोद, तोरखेडा, खापर, काठी, व चांदसैली.

जिल्ह्यांतील जनतेची जमीन-महसुलाचीं गाऱ्हाणीं, तक्रारी आणि गुन्हेगारीचे परिमार्जन त्वरित व्हावें म्हणून तालुका पातळीवर न्यायदानाची व्यवस्था करण्यांत आलेली आहे. न्यायदानाच्या व्यवस्थेंत दोन विभाग असून महसूल न्यायालयाचे जिल्हाधिकारी हे जिल्ह्याचे प्रमुख न्यायाधीश व दिवाणी फौजदारी न्यायालयाचे जिल्हा न्यायाधीश हे प्रमुख आहेत. न्यायदानाचें काम त्वरित व्हावें म्हणून तालुका पातळीवर न्यायालयाचे अधिकारी नेमण्यांत आलेले आहेत.

न्यायदानाची व्यवस्था

या जिल्ह्यांतील तालुके व महालाच्या ठिकाणीं मिळून १० ठिकाणीं महसूल न्यायालयें असून तालुक्याचे मामलेदार हे अशा न्यायालयाचे प्रमुख असतात. त्याच्या पुढें जमीनविषयक तंटे, कूळ कायदा व किरकोळ तंटें या बाबतचे खटले चालविण्यांत येतात. या न्यायालयांत लागलेले निर्णय मान्य नसणारांना जिल्ह्यांतील अक्राणी, धुळें व नंदूरबार येथील प्रांत ऑफिसरच्या न्यायालयांत निवाडा लावून घेतां येतो व त्या पुढेंहि जिल्हा अधिकाऱ्यांपर्यंत दाद मागतां येते.

महसूल न्यायालयें

जनतेच्या फौजदारी खटल्याचें न्याय–निवाड्याचें काम त्वरित व्हावें म्हणून या जिल्ह्यांत तालुका पातळीवर पुढील आठ गांवांत न्यायदानाची व्यवस्था करण्यांत आली आहे. धुळें, शिंदखेडा, शिरपूर, नंदूरबार, शहादा, तळोदा, साक्री, व नवापूर. अक्कलकुवा तालुक्याचा भाग तळोदा न्यायालयाला व अक्राणी महाल शहादा न्यायालयास जोडण्यांत आला आहे. या न्यायालयांत लागलेल्या निवाड्यानें जनतेचें समाधान झालें नाहीं तर धुळें येथील जिल्हा न्यायालयांत जिल्हा न्यायाधिशापुढें त्यांना दाद मागतां येतें.

दिवाणी व फौजदारी न्यायालयें

देशाची उभारणी मजबूत पायावर करावयाची झाल्यास प्रत्येक खेड्यांत एक ग्रामपंचायत, एक शाळा आणि एक सहकारी संस्था असलीच पाहिजे, अशा आशयाचें मत आपल्या पंतप्रधानांनीं व्यक्त केलेलें आहे. स्थानिक विकास कार्याकडे बारकाईनें पाहातां यावें, आवश्यक ती कामें प्राधान्य देऊन करतां यावीत आणि स्थानिक जनतेंत अशा कार्याबद्दल जागृति करतां यावी व सहकार्य मिळवतां यावें, या दृष्टीनें स्थानिक स्वराज्य संस्थांचें महत्त्व आगळेंच आहे. हें महत्त्व ओळखून राज्य सरकारनें ग्रामपंचायतींना अधिक कार्यशील व स्वयंपूर्ण करण्याच्या दृष्टीनें जिल्ह्याच्या ठिकाणीं धुळें येथें एका ग्रामपंचायत मंडळाची स्थापना केली असून ग्रामपंचायतींना मार्गदर्शन करण्यासाठीं धुळें येथें ग्रामपंचायत अधिकारी यांची कचेरीहि सुरू करण्यांत आली आहे. या जिल्ह्यांत एकूण ५९९ ग्रामपंचायती असून त्यांची तालुकानिहाय संख्या पुढील प्रमाणें आहे.: धुळें (८५), साक्री, (८२), शिरपूर (४७), शिंदखेडा (८४), नंदूरबार (६७), नवापूर (४४), तळोदा (२५) शहादा (१०५), अक्कलकुवा (३९), व अक्राणी (२१).

स्थानिक स्वराज्य संस्था

जिल्ह्यांतील लोकवस्ती लहान लहान खेडयांतून विखुरलेली असल्यामुळें वरील ५९९ ग्रामपंचायतीच्या क्षेत्रांत त्याच्या दुप्पटीहून अधिक खेडयांचा समावेश होतो. पाणीपुरवठा, रस्तेदुरुस्ती आणि आरोग्य या मूलभूत कर्तव्यावरोबरच ग्रामीण जनतेच्या विकासाच्या योजनांची पूर्तता करण्याची जबाबदारी ग्रामपंचायती पूर्ण करीत आहेत.


नगरपालिका

या जिल्ह्यांत सहा नगरपालिका पुढील गांवांतून कार्य करीत आहेत. धुळें, नंदूरबार, शिरपूर, तळोदा, शहादे, व दोंडाइचे. यापैकीं धुळें व नंदूरबार येथील नगरपालिका वरो-म्युनिसिपालिटचा आहेत. वरील कांहीं नगरपालिकांच्या हद्दींतील प्राथमिक शिक्षण त्या त्या नगरपालिकेतर्फेच चालत असून सर्व नगरपालिकांचे औषधोपचाराचे दवाखाने आहेत. दोंडाईचा नगरपालिकेनें कॉटेज हॉस्पिटल सुरूं करण्याची योजना हातीं घेतली असून इमारतीचें बांधकाम पूर्ण झालें आहे. नळानें पाणीपुरवठा व ड्रेनेजच्या योजनाहि कांहीं नगरपालिकांतून हातीं घेण्यांत आल्या आहेत. त्यापैकीं धुळें, नंदूरबार व शिरपूर येथील नगरपालिकांच्या हद्दींत राहाणाऱ्या लोकांना नळाच्या साहाय्यानें पिण्याचें पाणी मिळूं लागले आहे.

जिल्हा लोकल बोर्ड

या जिल्ह्याचे लोकल बोर्ड लोकल बोर्ड कायद्यानुसार स्थापन झालें असून विद्यमान बोर्डावर ४६ सभासद आहेत. यांत दोन जागा स्त्रियांसाठीं, तीन हरिजनांसाठीं आणि १९ आदिवासींसाठीं आहेत. बोर्डाला एक अध्यक्ष आणि एक उपाध्यक्ष असून धुळें येथें जिल्हा लोकल बोर्डाचे प्रमुख कार्यालय आहे. दळणवळणाची ग्रामीण विभागांतील सोय, पाणीपुरवठा, ग्रामीण आरोग्यव्यवस्था आदि बोर्डाच्या विविध कामाकरितां सभासदांतून निरनिराळचा समित्या नेमलेल्या असतात. लोकल फंड सेस, इतर उत्पन्न, सरकारी ग्रँटस्, वर्गण्या व देणग्या यापासून बोर्डाला उत्पन्न होत असून त्यांतून ग्रामीण विभागांतील रस्ते व जोडरस्ते तयार करणें व त्यांची दुरुस्ती करणें, ग्रामीण विभागांत पाणीपुरवठयाची व औषधोपचाराची सोय करणें या गोष्टी प्रामुख्यानें बोर्डाला कराव्या लागतात. धुळें जिल्ह्यांत लोकल बोर्डातर्फे ५ दवाखाने व १५ आयुर्वेदिक दवाखाने चालविले जात आहेत. तसेंच जिल्ह्यांत ६६० मैल लांबीचे रस्ते लोकल बोर्डाच्या ताब्यांत आहेत.

पशुसंवर्धन व बी--बियाणें केंद्रें



बांधबंदिस्ती योजना चालू असलेलें क्षेत्र

▲ बी-बियाणें उत्पादन केन्द्रें

● गुरांचें दवाखाने

× गुरांच्या संगोपनाचीं उपकेन्द्रें

५. शेती

भू-भाग

धुळें जिल्ह्यांत एकण भू-भाग क्षेत्राच्या ४८.५ टक्के जमीन लागवडीखालीं आहे व जिल्ह्याची लोकसंख्या १३,५०,१४३ इतकी आहे. जिल्ह्यांत हलक्या व भारी (काळचा) व मध्यम अशा तिन्ही प्रकारच्या जमिनी आढळतात. धुळें जिल्ह्याच्या साधारण मध्यभागांतून पूर्व-पश्चिम तापी वाहते. तापी नदीचें खोरे हें उत्तम काळचा जमिनीचें असून सुपीक आहे. दक्षिणेकडील व उत्तरेकडील भाग डोंगराळ आहे व त्या भागांत जमीन हलकी व मध्यम दर्जाची अशी आढळते. जमिनीच्या निरीक्षणावरून खालीलप्रमाणें स्थूलमानानें वर्गवारी करतां येईल.

हलक्या जमिनीचा विभाग : धुळें, साक्री व नवापूरचा पश्चिम भाग व नंदूरबारचा दक्षिण भाग.

मध्यम जमिनीचा विभाग : शिंदखेडा, अक्राणी महाल, अक्कलकुवाचा उत्तरभाग, धुळें तालुक्याचा पश्चिम भाग.

भारी जमिनीचा विभाग : शिरपूर, शहादा, नवापूरचा पूर्वभाग, नंदूरबारचा उत्तर भाग, तळोदा.

जिल्ह्यांतील बहुतांश तालुक्यांत डोंगराळ भाग आहे. उत्तरेकडील डोंगराळ भाग जंगलांनीं व्यापलेला आहे.

जिल्ह्यांतील लागवडी खालील व इतर जमिनीचें प्रमाण पुढील तक्त्यांत दिले आहे.

	प्रकार	एकर
१	जमिनीचें एकूण क्षेत्र	३९,७९,९९८
२	जंगलाचा विभाग	१४,००,३५७
३	लागवडी योग्य असलेली जमीन	८५,६३२
४	लागवडीस योग्य नसलेली ओसाड जमीन	४,९१,७१३
५	शेती व्यतिरिक्त उपयोगांत आणलेली जमीन	१,०४,८१८
६	जनावरांची कुरणें व गायरानाची जमीन	१,६५,८९३
७	फलोत्पादनाखालीं असलेली जमीन	६६५
८	दुबार पिकाखालील जमीन	२,३२,६९१
९	जिल्ह्यांतील एकूण पिकाखालील जमीन	१९,६३,६११

जिल्ह्यांतील बहुतांश जमीन डोंगराळ व हलक्या दर्जाची असल्यामुळें जिल्ह्यांत मुख्यत्वेकरून खरीप पिकें जास्त घेतात. खरीप पिकांत बाजरी, भुईमूग, कपाशी, साळ, खरीप ज्वारी व मूग हीं प्रामुख्यानें घेतलीं जातात. पावसाचें प्रमाण कमीं असल्यामुळें लवकर निघणाऱ्या बियाणांचा जास्तींत जास्त प्रमाणांत वापर होतो. रबी हंगामांत मुख्य पीक म्हणजे दादर अथवा रबी ज्वार व गव्हाचें आहे. थोडच्या प्रमाणांत हरबराहि पेरण्यांत येतो. बागायत क्षेत्र एकूण लागवडीच्या मानानें अंदाजे ३½ टक्के आहे. बागायतीखालीं मुख्यतः बागायत गहूं, मिरची, ऊंस, लांब धाग्याचा १७० सी. ओ. २ (देविराज) कापूस इत्यादि पिकें घेण्यांत येतात.

खरीप पिकें काढून त्यावर रबीमध्यें दुहेरी पीक घेऊन जास्त उत्पन्न घेण्याची प्रवृत्ति या जिल्ह्यांत बळावत आहे. खरीपमध्यें भुईमूग, तीळ, मूग किंवा उडीद घेऊन रबीमध्यें दादर किंवा बागायत गहूं बहुतेक शेतकरी जमिनीचा मगदूर पाहून घेतात. अशा रीतीनें या जिल्ह्यांत जवळ जवळ २,०४,५१५ एकरांत दर साल दोनदां पिकें घेतली जातात.

एकूण पिकांखालील क्षेत्र १९,३०,७६९ एकर आहे. पिकाखालीं असलेल्या क्षेत्रापैकी मुख्य पिकाखालील क्षेत्र व त्याचें उत्पादन खालीलप्रमाणें आहे.

पिकाचें नांव	क्षेत्र (एकर)	पिकाचें उत्पन्न (टनांत)
बाजरी	३,४३,५०२	८५,५१८
खरीप ज्वार	१,४९,६२२	३२,०६३
साळ	८२,७३३	४४,३२१
भुईमूग	३,५०,९९३	१,५०,४२६
कापूस विरनार	१,०७,७५५	७५०
देविराज कापूस	४,२००	२,२५०
तीळ	१,९०,१२०	३,७४०
एरंडी	३,४७६	७४,४८५
मूग	४१,५७३	५,९३९
मका	१०,३३८	१,८४६
नागली	१९,७९३	३,५३४
तूर	२३,९७१	५,१३७
उडीद	६१,६९०	११,३७३
गहूं	१,०६,४१६	३८,००६
दादर	३,१५,२७२	९०,०७८
हरभरा	२९,४३९	६,३०८
या शिवाय खालील प्रमाणें इतर पिकेंहि घेतलीं जातात.		
ऊंस	६,३३१	
मिरची	२६,३६२	
केळीं	१,३०१	
इतर फळफळावळें	७५०	
रताळी	३५०	
कांदे	५३४	
भाजीपाला	२,५१४	

पैसा देणारी पिकें जास्त प्रमाणांत घेण्याची प्रवृत्ति शेतकऱ्यांमध्यें वाढत असल्यामुळें भुईमूग, मिरची, कंबोडीया कपाशी व ऊंस ह्याखालील क्षेत्र हळूंहळू वाढत आहे. भाजीपाल्याखालील क्षेत्रांत म्हणावी तशी वाढ झाली नाहीं.

ह्या विषयांवर चर्चा करतांना आपणाला मुख्यतः दोन विभाग पाडले पाहिजेत. एक म्हणजे आदिवासी मागासलेला शेतकरी व दुसरा म्हणजे शाहू भागांतील सुधारलेला शेतकरी

शेतकरी व त्याची शेती करण्याची पद्धति

या जिल्ह्याचा बराचसा भाग डोंगराळ व मागासलेला आहे. ह्या भागांत राहाणारे शेतकरी अत्यंत मागासलेले आहेत. त्यांना शेती कशी करावी याचे पुरेसें ज्ञान नाहीं. शास्त्रोक्त शेतीचा तर त्यांना गंधच नाहीं. जुन्या पद्धतीचा नांगर हेंच एकमेव अवजार त्यांच्या जवळ पूर्वी असावयाचें. त्यानेंच तो जमीन नांगरायचा व पेरणी फोकून पद्धतीनें करावयाची. पण आतां विकास योजनेमुळें त्याला मार्गदर्शन होऊं लागलें व तोहि नवीन पद्धतीनें शेती करण्यास शिकूं लागला. शाहू शेतकरी मात्र फार कष्टाळू व चौकस बुद्धीचा आहे. तो शेतीची सुधारणा करण्याचा सारखा प्रयत्न करीत असतो. जमिनींतून जास्तींत जास्त उत्पन्न काढून जास्तींत जास्त अमदानी करण्याचा त्याचा प्रयत्न कसतो. जास्त प्रमाणांत दुसोटयाचें पीक घेतो हें त्याचें वैशिष्टच आहे.

दुसरें एक वैशिष्टय म्हणजे या जिल्ह्यांत बरेचसे शेतकरी खरीपाची व रबीची पिकें निघतांच जमीन नांगरतात. लोखंडी नांगरानें जमीन नांगरण्याचें महत्त्व बऱ्याच शेतकऱ्यांना समजले आहे. म्हणूनच लोखंडी नांगराचा खपहि फार मोठ्या प्रमाणांत होतो. उन्हाळी नांगरटीनें तण कचरा मरतो व जमीन चांगली तापते. याचा पिकांवर चांगला परिणाम होतो. यानंतर एप्रिल-मे महिन्यांत तो शेतीला शेणखत देतो. प्रत्येक जमिनीच्या तुकडयास शेणखत भरपूर प्रमाणांत मिळतेच असे नाहीं. पावसाळा सुरू होई पर्यंत वखरपाळ्या देऊन नंतर पाऊस पडतांच तो पेरणी करतो. उभ्या पिकांत आंतरमशागत करतो. त्यासाठीं निरनिराळ्या प्रकारचे कोळपे उपलब्ध आहेत. कापणी व मळणी– नंतर बरेच शेतकरी शेतीचा माल ॲग्रिकल्चरल प्रोडयूस मार्केट कमिटीमार्फत विकतो.

विरनार कापूस विस्तार योजना

धुळें जिल्ह्यांतील महत्त्वाचें पैसा देणारें पीक म्हणजे कापूस हें होय. दरवर्षी हें पीक जवळ जवळ दीड लाख एकरांत लावण्यांत येतें. त्यापैकीं १७० सी. ओ. २ जातीचा कापूस सुमारें ५ ते ६ हजार एकरांत पेरला जातो. बाकीच्या सर्व क्षेत्रांत विरनार (१९७-३) या जातीचा कापूस पेरला जातो.

या जिल्ह्यांत कपाशीच्या वाढीला पांच ते सहा महिन्याचा कालावधी मिळतो. एवढ्या थोडया काळांत व निसर्गदत्त पावसावर विरनार (१९७-३) शिवाय कोणत्याहि जातीची कपाशी या भागांत यशस्वी होत नाहीं. शिवाय विरनारचा धागा ०.८६ इंच लांब असतो व त्यापासून २५ ते ३० नंबरचे सूत निघूं शकते. त्यामुळें या जातीच्या कपाशीस फार मागणी आहे. वरील सर्व परिस्थिति लक्षांत घेऊन राज्य सरकारनें हीच जात या भागांत लागवडीकरितां अधिकृत ठरविली व इतर हलक्या जातींच्या कपाशीस कायद्यानें बंदी केली आहे.

जिल्ह्यांतील या सुधारलेल्या जातीचे सर्व गुणधर्म कायम टिकावे, तिची प्रत कायम राहून बाजारांतील दर्जा दिवसेंदिवस वाढत राहावा म्हणून तिची शुद्धता राखणें अत्यंत आवश्यक आहे. त्याचप्रमाणें शेतकऱ्यांना दरसाल ह्या जातीच्या शुद्ध बियाणाचा पुरवठा करतां यावा म्हणून विरनार बीजसंवर्धन व वांटप योजना सुरूं करण्यांत आली. सर्व शेतकऱ्यांना सहकारी मंडळामार्फत शुद्ध बियांचा पुरवठा करण्यांत येतो. कपाशींतील भेसळ काढून शुद्धता कायम ठेवणें, रोग प्रतिबंधक उपाययोजना करणें, प्रतवार कापूस एकत्र करून त्याचें जिनींग करविणें व बाहेरील प्रदेशांतून येणाऱ्या कापसावर कडक नियंत्रण ठेवणें यामुळें या कपाशीला बाजारांत विशिष्ट दर्जा प्राप्त झाला आहे. चांगल्या मालाला योग्य भाव मिळावा म्हणून कपाशीचें वर्गीकरण करून जास्त शुद्धता असलेल्या कपाशीला ॲग. मार्क लेबले पण लावली जातात.

जिल्ह्यांत कपाशीचें एकूण उत्पन्न ३,३६,००० मण (३०,००० गांठीचें) आहे.

जमीन संरक्षण

या जिल्ह्यांत बांधबंदिस्तीद्वारें जमीन संरक्षणाच्या कार्यक्रमास १९४८ सालीं सुरवात करण्यांत आली पण सुरुवातीस शेतकऱ्यांस ह्या कार्याचें महत्त्व न कळल्यामुळें फारशी प्रगति होंऊं शकली नाहीं. परंतु गेल्या तीन वर्षापासून ह्या कार्याची झपाट्यानें प्रगति होत असून गेल्या वर्षी धुळें जिल्ह्यांत १ लाख १९ हजार एकर जमिनीवर बांधबंदिस्तीचें कार्य झालें व राज्यांत प्रथम स्थान मिळालें. आजपर्यंत २० लक्ष ९ हजार ७७७ एकर क्षेत्रांत बांधबंदिस्ती करण्यांत आली असून या योजनेचे फायदे शतकऱ्यांना कळूं लागले आहेत. बांध घातलेल्या जमिनींतील पिकांच्या आढाव्यावरून असें दिसून येतें कीं बांधबंदिस्तीमुळें एकरीं उत्पादनांत २० ते २५ टक्के कायमची वाढ होते. बांध घातलेल्या भागांतील विहिरीचें पाणीहि वाढतें व त्यामुळें या भागांत अधिक विहिरी खणून पिकांना पाणी देण्याचीहि शक्यता वाढते. बांधबंदिस्ती झालेल्या ७० एकर जमिनी- मागें एक विहीर याप्रमाणें जिल्ह्यांत २५०० विहिरी बांधण्यांत येणार आहेत. बांध घातल्यामुळें उत्पादनांत वाढ होतेच शिवाय नापिक व पडीत जमीन देखील लागवडीस योग्य होते.

भू-संरक्षण कार्यासाठीं जिल्ह्यांत धुळें येथें स्वतंत्र कार्यालय असून त्याचे पांच उपविभाग निरनिराळ्या ठिकाणीं उघडण्यांत आले आहेत. बांधबंदिस्तीचें कार्य धुळें, साक्री, नंदूरबार व शिंदखेडे या चार तालुक्यांतील एकूण १५० गांवांत चालू आहे.

शेतकी संशोधन केंद्र

स्थानिक बियाण्यांत जे कांहीं दोष असतील ते लक्षांत घेऊन त्यापेक्षां जास्त उत्पन्न देणारें (स्थानिक बियाणांतील दोषापासून मुक्त असें) बियाणें शास्त्रोक्त पद्धतीनें (उदा. संकर पद्धति, निवड पद्धति इ.) निर्माण करण्याकरितां धुळ्याला एक शेतकी संशोधन केन्द्र उघडण्यांत आलें आहे. ह्या केंद्रांत या जिल्ह्यांतील कांहीं मुख्य पिकें उदा. खरीपाचा कापूस, भुईमूग, बाजरी, ज्वारी, मूग, उडीद, तीळ, इ. व रबीचा गहूं, ज्वार, हरभरा यांसबंधीं संशोधन हातीं घतलें आहे. निरनिराळ्या नवीन शोधलेल्या जातींची स्थानिक जातींशीं तुलना या केंद्रावर केली जाते. व त्यांतून जिल्ह्याकरितां चांगल्या बियाणांच्या जाती उपलब्ध करण्याचा प्रयत्न केला जातो.

शेतकऱ्यांच्या मुलांना सुधारलेल्या पद्धतीनें शेती करण्याचें ज्ञान व माहिती देण्याकरितां सन १९२३ सालीं धुळें येथें एक शेतकी शाळा स्थापन करण्यांत आली. ह्या शेतकी शाळेचा शिक्षणक्रम दोन वर्षांचा असून त्यामध्यें शेती, पशुसंवर्धनन, दुग्ध व्यवसाय, बागायत, सहकार, शेतकी कायदेकानू, सुतारकाम व ग्रामोद्योग यांचा समावेश होतो. वरील कामासाठीं १५८ एकराचा शेती फार्म, डेअरी, मेंढवाडा, वाचनालय, सुधारलेलीं हत्यारें, प्रदर्शन साहित्य इ. ची व्यवस्था करण्यांत आली आहे. शेतकऱ्यांच्या मुलांना त्यांच्या जीवनाशीं संबंधित अशा विषयांचें शिक्षण देणें व शिक्षणोत्तर जीवनांत त्यांनीं परत आपल्या जमिनींकडे लक्ष द्यावे, स्वतः शास्त्रोक्त पद्धतीनें जमीन करून शेतकऱ्यांना शेतीच्या नव्या पद्धतींची माहिती द्यावी हा या शिक्षणाचा मुख्य उद्देश आहे.

शेती शिक्षण

शेती विकासाचा कार्यक्रम कार्यान्वित करण्यासाठीं सुशिक्षत सेवक वर्गाची अत्यंत जरूरी आहे. याच हेतूनें प्रेरीत होऊन महाराष्ट्र सरकारनें धुळें येथें शेतकी महाविद्यालय १९६० मध्यें प्रस्थापित केलें. प्रथम वर्षांत एकूण ५० विद्यार्थ्यांची सोय करण्यांत आली आहे. महाविद्यालयाला आवश्यक असणाऱ्या सोयीं उदा. भू-रचना शास्त्र, रसायन शास्त्र, वनस्पति शास्त्र, बागकाम शास्त्र वगैरेसाठीं तात्पुरती प्रयोगशाळा उघडण्यांत आली आहे. विद्यार्थ्यांना शेतकी कामाचें प्रात्यक्षिक देण्याकरितां व त्यांना शेतीचें काम स्वतः करावयास मिळावें म्हणून शेतकी शाळेची १२५ एकर जमीन शेतकी महाविद्यालयाला देयांत आली आहे. शेतीचें शास्त्रोक्त ज्ञान व प्रत्यक्ष कामाची, माहिती व्हावी म्हणून सर्व व्यवस्था करण्यांत आली आहे. लागणारी यंत्रसामुग्री, आवश्यक शिक्षण देण्याची साधनें वगैरे सर्व साधनसामुग्री जमविण्यांत आली आहे. तसेच निरनिराळ्या विषयांतील तज्ज्ञांची नेमणूक करण्यांत आली आहे.

आधुनिक पद्धति व शेती सुधारणा

जिल्ह्यांतील बहुसंख्य लोकांचें शेती हेंच उपजीविकेचें साधन आहे. शेतकऱ्यांचें अज्ञान दूर व्हावें व त्यांना आहे त्या जमिनींत अधिकाधिक उत्पादन काढतां यावें या दृष्टीनें सल्ला देणें, प्रात्यक्षिकांद्वारें मार्गदर्शन करणें, सुधारलेलीं अवजारें, बी-बियाणें, खतें आदींचा पुरवठा करणें हीं कामें जिल्ह्यांतील शेतकी अधिकाऱ्यांमार्फत केलीं जातात. जिल्हा शेतकी अधिकाऱ्यांस एक दुय्यम शेतकी अधिकारी म्हणून जिल्ह्याच्या ठिकाणीं मदतनीस असून प्रत्येक तालुक्यासाठीं एक शेतकी अधिकारी व ग्राम पातळीवर ग्रामसेवक शेतीच्या कामांत शेतकऱ्यांना मदत करीत असतो.

सुधारलेली बी-बियाणें

आधुनिक संशोधनानें शेतीउत्पादनांत वाढ झाल्याचें प्रयोगानें सिद्ध झाल्यामुळें सर्वसामान्य शेतकऱ्यांस सुधारलेलीं बी-बियाणीं सहजरीत्या उपलब्ध होण्याकरितां ८ बी-बियाणें केंद्रें या जिल्ह्यांत सुरूं करण्यांत आलीं आहेत. स्थापन झालेल्या व स्थापन व्हावयाच्या बी-बियाणें केन्द्रांचा तपशील पुढील प्रमाणें—

तालुका	बियाणें केंद्राचें मुख्य ठिकाण	ताब्यांत आलेलें क्षेत्र	ताब्यांत घ्यावयाचें जास्तीचें क्षेत्र	बियाणें केंद्राचें एकूण क्षेत्र
धुळें	पिंप्री	४७–३४	८४–३६	१३२–३०
शहादा	कळंबू	७३–३८	—	७३–३८
नवापूर	नवापूर	४२–३२	—	४२–३२
तळोदा	तळोदा	५१–९	२८–३९	७९–३८
साक्री	साक्री	२२–२९	१०–१९	३३–८
शिरपूर	शिरपूर	३२–३½	४१–५	७८–८½
अक्कलकुवा	अक्कलकुवा	२९–१०	२३–८	५२–१८
अक्राणी	धडगांव	२१–२३	—	२१–२३
स्थापन होणारीं				
नंदूरबार	पळासी	८१–१९	—	८१–१९
सिंदखेडा	सिंदखेडा	७१–१५	—	७१–१५

वरील केंद्रांतून सुधारलेल्या बी-बियाणांचा पुरवठा १९५८-५९ पासून जिल्ह्यांतील शेतकऱ्यांना करण्यांत येत आहे. १९६०–६१ मध्यें ९७४८ एकर क्षेत्राला पुरेल एवढीं बाजरी, ज्वारी, भुईमूग, मूग, उडीद, साळ, हरभरा, गहूं, दादर यांचीं सुधारलेलीं बियाणें पुरविण्यांत आलीं.

खतांचा पुरवठा

शेतीचें उत्पादन वाढविण्यासाठीं ज्याप्रमाणें उत्तम बी-बियाणांची आवश्यकता असते तशीच पिकांची योग्य वाढ होण्याकरितां विविध प्रकारच्या खतांचीहि आवश्यकता असते. शेतकी खात्यानें प्रात्यक्षिकाद्वारें खेडोपाडीं प्रचार करून खतांचें शेतकऱ्यांना महत्त्व पटवून दिलें आहे.

कंपोस्ट खत, शेणखत, सोनखत आदि ग्रामीण खतें तयार करून त्यांचा उपयोग शेतकरी-वर्ग मोठ्या प्रमाणांत करूं लागला आहे. तसेच अमोनियम सल्फेट ३५६५, टन सुपर फॉस्फेट १८०४ टन व इतर खतें शेतकी खात्यामार्फत शेतकऱ्यांना या वर्षी पुरविण्यांत आलीं. हिरव्या खताचा देखील जिल्ह्यांत वापर होत आहे. या वर्षी जवळ जवळ १६१० एकर जमिनीवर हिरवें खत तयार करण्यांत आलें होतें.

बागायतीसाठीं अधिक पाणीपुरवठा

जिल्ह्यांतील पिकाखालीं एकूण १९,६३,६११ एकर जमिनीच्या मानानें बागायती क्षेत्र फक्त ७६,२६८ एकर आहे. त्यांत सरकारी पाटपाण्याच्या खालीं ३१,००० एकर, खाजगी पाटाखालीं २,४४३ एकर, विहिरीखालीं ४२,५७५ एकर व तलावाच्या पाण्याखालीं २८० एकर जमीन भिजते. अन्न धान्याच्या उत्पादनांत त्वरित वाढ करण्याच्या दृष्टीनें ठिकठिकाणीं नवीन विहिरी खणून व जुन्या विहिरींची दुरुस्ती करून बागायती पिकाचें क्षेत्र वाढविण्याचा प्रयत्न जिल्ह्यांत करण्यांत येत आहे व त्यानुसार पुढील योजना कार्यान्वित होत आहेत.

राज्य सरकारद्वारें गरजू शेतकऱ्यांना एकूण २१२ नवीन विहिरींसाठीं ४,३९,४०० रु. तगाई देण्यांत आली व ४८ जुन्या विहिरींच्या दुरुस्तीसाठीं ५३,६०० रु. देण्यांत आले. अविकसित ग्रामीण भागांत ३०० विहिरी बांधण्यांत येत असून १,५०,००० रु. शेतकऱ्यांना मदत म्हणून मंजूर करण्यांत आले आहेत. त्याचप्रमाणें ९०० रु. च्या आंत उत्पन्न असलेल्या शेतकऱ्यांसाठीं ३११ नवीन विहिरी खणण्याकरितां १,६१,००० रु. मंजूर करण्यांत आले आहेत. बांधबंदिस्ती झालेल्या भागांत १,५९८ विहिरींचें बांधकाम चालू आहे व त्यासाठीं रुपये १३,६२,१२५ कर्ज वांटण्यांत आलें आहे. विहिरीच्या बरोबरच पाणीपुरवठ्याची ऑईल इंजिनें व पंपिंग सेट यांची जरुरी आहे. म्हणून असे एकूण ३२५ सेटस् खरेदी करण्यासाठीं शेतकऱ्यांना ९,७७,६०० रुपये पुरविण्यांत आले. यावरून जिल्ह्यांत नवीन व जुन्या विहिरी खोदण्याचा भरगच्च कार्यक्रम आंखण्यांत आला असून त्यांत शेतकऱ्यांचेंहि बरेचसे साहाय्य व सहकार्य मिळत आहे असें दिसून येते. वरील विहिरींच्या खोदकामाच्या कार्यक्रमाशिवाय ज्या विहिरींना पाणी कमी आहे त्या स्वस्त दरांत फोडण्यासाठीं पाणसुरुंगाची योजना सुरूं करण्यांत आली आहे. त्यांत आतां पावेतों सुमारें २०० विहिरी यशस्वीरीत्या फोडून देण्यांत आल्या आहेत.

जिल्ह्यांत मिरचीचें पीक मोठ्या प्रमाणांत घेण्यांत येतें. त्याखालीं २६,३६२ एकर क्षेत्र आहे. बाकी भाजीपाला फार थोड्या प्रमाणांत घेण्यांत येतो. विशेषतः नंदूरबार, शिंदखेडा व शहादा या

भाजीपाला व फलोद्यान

तालुक्यांत मिरचीचें पीक मोठ्या प्रमाणांत निघते. त्यासाठीं खताचा व कीटक नाशक द्रव्यांचा खास पुरवठा करण्यांत येतो. शहादे तालुक्यांत केळींचें उत्पन्नहि बऱ्याच प्रमाणावर होतें. या जिल्ह्याचें हवामान आंबे, पेरू, बोरी इत्यादि फळझाडांच्या लागवडीस अनुकूल असल्याने फळ झाडें वाढविण्यास मदत व्हावी म्हणून प्रयत्न करण्यांत येत आहेत. त्यानुसार २,१९२ रायवळ आंब्याचीं कलमें व ७,१९३ इतर फळझाडें पुरविण्यांत आलीं आहेत व फळझाडांच्या लागवडीसाठीं कर्जें देखील मंजूर करण्यांत आलीं आहेत.

अन्नधान्य उत्पादन मोहिमेनुसार ह्या जिल्ह्यांत खरीप व रब्बी पीक मोहीम १९५८-५९ पासून हातीं घेण्यांत आली. मागच्या तीन वर्षांच्या सरासरीपेक्षां पंधरा टक्क्याहून जास्त उत्पादन

पीक मोहीम

१९५८ च्या रब्बी मोहिमेंत या जिल्ह्यानें काढून दाखविल्याबद्दल १०,००० रु. बक्षिस मिळविलें होतें. ह्या वर्षीं खरीप मोहिमेंत ज्वार, बाजरी, भुईमूग, कापूस ह्या बाबतींत ठरवून दिलेलें लक्ष्य गांठलें असून कांहीं बाबतींत तें ओलांडलें आहे. रब्बी मोहिमेंतील गहूं व दादरच्या बाबतींत ठरविलेलें लक्ष्य जवळ जवळ गांठण्यांत आलें आहे. वरील मोहीम यशस्वी करण्यासाठीं शेतकऱ्यांस शुद्ध बियाणें व खतांचा पुरवठा करण्यांत येत असून गरजू शेतकऱ्यांना को-ऑपरेटिव्ह बँकेमार्फत पैसा करून देण्यांत येतो. शेतकऱ्यांच्या मार्गदर्शनाकरितां ठिकठिकाणीं प्रात्यक्षिकें घेण्यांत येतात.

रब्बी ज्वार प्रायोगिक योजना

या जिल्ह्यांत ही योजना लागू करण्यांत आली असून त्यासाठीं शिरपूर तालुक्यांतील सावळदे व शिरपूर गांवांच्या आसपास ५,००० एकराचा गट निवडण्यांत आला आहे. ही योजना बरीच यशस्वी झाली असून ठरवून दिलेलें लक्ष्य पूर्णतः गांठण्यांत आलें आहे.

देशाला लांब धाग्याच्या कपाशीची आवश्यकता आहे. त्यासाठीं ही योजना हातांत घेण्यांत आली. या योजनेखालीं देविराज कपाशीचें (१७० सी. ओ.२) प्रतवार बियाणें शेतकऱ्यांना स्वस्त भावानें वांटण्यांत येते व त्याचा पेरा बागायतीची व्यवस्था असेल तेथें करण्यांत येतो. या वर्षीं ४,२०० एकर क्षेत्रांत ही कपाशी पेरण्यांत आली.

लांब धाग्याच्या कापसाची योजना

या जिल्ह्यांत विशेषतः साक्री, शहादा, धुळें तालुक्यांत ऊंस लावण्यांत येतो. पिकाखालील पूर्वीचे तीन हजार एकरावरील क्षेत्र आतां सहा हजारांवर गेलेलें आहे. लोकांत उंसाची पाडेगांव पद्धति फार लोकप्रिय होत आहे. ऊंसाचें उत्पादन वाढत असल्यामुळें साखर कारखाना उघडण्याचेहि प्रयत्न चालले आहेत. उत्पादन वाढावें म्हणून खास रासायनिक खतांचा पुरवठा करण्यांत येत असून प्रात्यक्षिकेंहि घेण्यांत येतात.

ऊंस मोहीम

पिकांचें रोगापासून संरक्षण व्हावे म्हणून शेतकऱ्यांना सवलतीच्या दरांत कीड नाशक द्रव्यें व त्यासाठीं लागणारी आधुनिक यंत्र सामुग्री पुरविण्यांत येते. या-वर्षीं शेतकी खात्यानें भुईमुगाचें मावा व टिका रोगापासून संरक्षण व्हावे म्हणून ५,००० एकरांचें क्षेत्र घेतलें होतें. त्यामुळें जवळ जवळ शेत-कऱ्यांचे २,७०,००० रु. वाचूं शकले. अशाच प्रकारें जिल्ह्यांत ठिकठिकाणीं आलेल्या टोळधाडीविरुद्ध शेतकी खात्यानें शेतकऱ्यांच्या मदतीनें यशस्वी सामना देऊन जिल्ह्याचा भयंकर संकटापासून बचाव केला.

पीक-संरक्षण योजना

प्रात्यक्षिकांद्वारें प्रचारकार्य झटपट होतें व त्यामुळें शेतकऱ्यांस नवीन सुधारणा पटतात. म्हणून प्रत्येक ग्रामसेवकाच्या हद्दींत एक, या प्रमाणें ७८ प्रात्यक्षिक केंद्रें ठिकठिकाणच्या शेतकऱ्यांच्या शेतांत उघडण्यांत आलीं व त्यामार्फत शेत-कऱ्यांस सुधारलेल्या पद्धतीनें शेती कशी करावी ह्याचें प्रात्यक्षिक करून दाखविण्यांत आलें. त्याचप्रमाणें डिस्ट्रिक्ट ट्रायल्स व फरी फर्टिलायझर योजनेद्वारा शेतीच्या सुधारलेल्या पद्धतीची माहिती शेतकऱ्यांस देण्यांत आली.

शेतकी प्रात्यक्षिक केंद्रें

नवीन सुधारलेल्या शेती पद्धतींचा शेतकऱ्यांनीं अधिकाधिक अवलंब करावा म्हणून तालुका पातळीवर "पीकस्पर्धा" जिल्हाविकास मंडळातर्फे ठेवण्यांत येतात व अधिकाधिक उत्पादन काढणाऱ्या शेतकऱ्यांना बक्षिसें देऊन त्यांचा गौरव करण्यांत येतो. त्यामुळें शेतकऱ्यांत चुरस निर्माण होऊन अधिक धान्योत्पादनास मदत होते. दरवर्षी यात्रेच्या अगर प्रमुख अशा ठिकाणीं शेतीमाल व गुरांचें प्रदर्शन विकास मंडळातर्फे भरविण्यांत येतें. या प्रदर्शनांतून आधुनिक शेतीपद्धति, अवजारें, बी-बियाणें, सुधारलेलीं जनावरें आदि ठेवण्यांत येतात व शेतकऱ्यांना त्या-बद्दलची संपूर्ण माहिती देण्यांत येते. प्रदर्शनांतील उत्कृष्ट नमुने शेतकऱ्यांकडून घेतलेले असल्यामुळें अशा प्रदर्शनांत आपल्या उत्पादनास बक्षिसाचा मान मिळावा म्हणून शेतकरी उत्साहानें भाग घेत असतात.

पीकस्पर्धा व प्रदर्शनें

शेतकऱ्यांत संघटितरीत्या काम करण्याची वृत्ति निर्माण होत असून जिल्ह्यांत अशा प्रकारें ९८४ शेतकी संघ स्थापन झाले आहेत. त्यांचे एकूण २६,३१९ सभासद आहेत.

शेतकरी संघ

पिढ्यानपिढ्या चालत आलेल्या इस्टेटीच्या वांटणीमुळें आर्थिक दृष्ट्या फायदेशीर नसलेले असे जमिनीचे लहान लहान तुकडे पडले व त्याचा परिणाम शेतीउत्पादन कमी होण्यांत झाला. या जमिनीचे यापुढें जादा तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्यासाठीं व असलेल्या तुकड्यांची आर्थिक दृष्ट्या स्वयंपूर्ण अशीं शेतें बनविण्यासाठीं १९४७ मध्यें तुकडेबंदी-तुकडेजोड कायदा सरकारनें अंमलांत आणला. या जिल्ह्यांत तो १९४९-५० मध्यें प्रथम धुळें तालुक्यास लागू करण्यांत आला. पुढें १९५४ मध्यें शिंदखेडा तालुका व १९६० पासून साक्री तालुक्यांत शेतजमिनीचे तुकडे पाडण्यास या कायद्यानें प्रतिबंध केला असून असलेले तुकडे एकत्र जोडून त्यांचें संयुक्त शेत करण्याची त्यांत तरतूद आहे.

तुकडे जोड

या योजनेची प्रगति पुष्कळशी जनतेच्या सहकार्यावरच अवलंबून आहे. आतापर्यंत अशा प्रकारचें काम धुळें तालुक्यांत १५५ गांवीं, शिंदखेडा तालुक्यांत ११९ गांवीं व साक्री तालुक्यांत १७ गांवीं हातीं घेण्यांत आलें आहे. त्यापैकीं धुळें तालुक्यांतील ७४ व शिंदखेडे तालुक्यांतील ४८ गांवांतून ही योजना पूर्णपणें अमलांत आलेली आहे. धुळें तालुक्यांतील आणखी २१ गांवांसाठीं ही योजना मंजूर झाली असून तीनुसार काम चालू आहे. राहिलेल्या गांवांपैकीं धुळें तालुक्यांतील १५, शिंदखेडा तालुक्यांतील ११ व साक्री तालुक्यांतील २ गांवें कायद्याप्रमाणें प्रसिद्ध झाली आहेत. तिन्ही तालुक्यांतील बाकी राहिलेल्या ४४ गांवांसाठीं कच्ची योजना आंखण्यांत आली आहे.

सरकारनें जिल्ह्यांत हातीं घेतलेलें दुसरें एक अतिशय महत्त्वाचें कार्य म्हणजे सरकारी पडित जमिनींचें भूमिहीनांना वांटप हें होय. हें कार्य द्रुतगतीनें पार पाडण्याच्या दृष्टीनें जमिनी देण्याबाबतची कार्यपद्धति अतिशय सोपी करण्यांत आली आहे. त्यानुसार धुळें जिल्ह्यांत प्रारंभिक योजना सुरूं करण्यांत आली असून सुमारे २७,००० एकर जमीन भूमिहीनांना वांटण्यांत आली आहे. त्याखेरीज जमिनी लागवडीस योग्य करण्यासाठीं बैल, अवजारें व रासायनिक खतें खरेदी करण्यासाठीं आर्थिक सवलती आणि कर्जें देण्यांत आलीं आहेत. वांटण्यांत आलेल्या जमिनीपैकीं बरीच जमीन बांधबंदिस्त करण्यांत आली आहे.

भूमिहीनांना जमीन

धुळें जिल्ह्यांतील एकूण सर्व पशुधन १९,४८,६२१ असून त्यांत गाई, बैल, म्हशी, रेडे, शेळ्या, मेंढ्या, घोडे, कोंबड्या, डुकरे, बदके इ. चा समावेश होतो. त्यापैकीं गाई, बैल, वळू ४,६६,९८३; म्हशी, रेडे ६५,८२६; कोंबड्या ५,५५,९११; घोडे ४,१०,०४; बदके ३,३४३; डुकरे १०,६५२; मेंढ्या ४९,८७१ व बकऱ्यांची संख्या २,०६,१२४ अशी आहे. पशुधनाचें योग्य तें संवर्धन व्हावे म्हणून जिल्ह्याकरितां धुळें येथें जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांची स्वतंत्र कचेरी आहे. पशुसंवर्धनाची मोठ्या प्रमाणांत प्रगति व्हावी म्हणून एक स्वतंत्र शेतकी अधिकारी व ४ शेतकी मदतनीस नेमले आहेत. अशा प्रकारे जिल्ह्यांतील पशुधनाकडे योग्य तें लक्ष पुरविलें जातें.

पशुधन व संवर्धन

गुरांची योग्य ती काळजी घेण्याकरितां जिल्ह्यांतील प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणीं गुरांचे १० दवाखाने धुळें, साक्री, शिरपूर, शिंदखेडा, नंदूरबार, नवापूर, तळोदा, शहादा, अक्कलकुवा व धडगांव या ठिकाणीं सुरू करण्यांत आले आहेत.

धुळें येथील दवाखान्यांत जनावराचें रक्त तपासून रोगाचें निदान करण्याकरितां एक लहानशी प्रयोगशाळाहि ठेवण्यांत आली आहे. याशिवाय ग्रामीण पातळीवर जिल्ह्यांत पुढील १६ उपकेंद्रें गुरांच्या संवर्धनाचें काम करीत आहेत. पाडलडे, शिरुडदिगर, म्हसदी, दहिवेल, पिंपळनेर, निझामपूर, खांडवारा, चिंचपाडा, खापर, काठी, प्रतापपूर, मोडलपाडा, मांडवी बु., खुंटामोडी, वडाळी व मंदाणे.

वरील सर्व उपचार केन्द्रांतून गुरांच्या सांसर्गिक रोगावरील उपाययोजना, इतर रोगांवरील उपचार, सांथीच्या रोगांवर प्रतिबंधक उपाय करण्याचें काम होतें. १९५९-६० मध्यें जिल्ह्यांत २९५ गुरांच्या सांसर्गिक रोगावर उपाययोजना करण्यांत आली आणि ६४,६३० गुरांच्या इतर रोगांवर औषधोपचार करण्यांत आलें. त्याचप्रमाणें सांथीच्या रोगांच्या प्रतिबंधासाठीं या वर्षांत एकूण ६५,४५८ गुरांना प्रतिबंधक लस टोचण्यांत आली. त्यापैकी बुळकांडी रोगाकरितां १७,९७५ गुरांना, घटसर्प रोगाकरितां १०,७९२ गुरांना, बी. क्यू. रोगाकरितां ८,९०१ गुरांना, रानीखेत रोगाकरितां २४,४२९ कोंबडयांना व इतर रोगाकरितां ३,३३९ गुरांना प्रतिबंधक लस टोंचण्यांत आली. तसेच मध्यप्रदेशांतून येणाऱ्या जनावरांमुळें होणाऱ्या बुळकांडी रोगाविरुद्ध मध्यप्रदेश व धुळें जिल्हा यांच्या सरहद्दीवरील पळासनेर या गांवीं एक हंगामी बुळकांडी रोग प्रतिबंधक लस टोचण्याचें केंद्र दरवर्षी उघडण्यांत येतें.

ह्या जिल्ह्यांतील पशुधनाची सुधारणा व्हावी या उद्देशानें शेतकऱ्यांना खिलार जातीचे ११४ वळू देण्यांत आले आहेत. तसेंच खिलार जातीच्या कांहीं गाई शेतकऱ्यांना पुरविण्यांत आल्या आहेत. वरील खिलार वळू व गाई यांच्या पासून झालेली शुद्ध खिलार जातीची पैदास पुढील पैदासीकरितां उपयोगांत आणतां येते. आदिवासी भागांतील अक्राणी महाल या डोंगरी भागांत ७० डांगी जातीच्या गाई व ३२ डांगी जातीचे वळू आदिवासी लोकांना देण्यांत आले. खुजट जातीची पैदास थांबविण्यासाठीं व दिलेले वळू व गाईपासून चांगली पैदास निपजण्याकरितां खुजट जातीच्या ४,२२६ वळूंची खच्ची करण्यांत आली आहे. या जिल्ह्यांतील शहादे येथें एक सरकारी कृत्रिम रेतन केंद्र, उत्तम खिलार जातीच्या व सुरती जातीच्या म्हशींच्या पैदासीकरितां उघडण्यांत आलें असून सरकारी मालकीचे २ उत्तम वळू व २ रेडे, एक गाय व एक म्हैस ठेवण्यांत आली आहे. शेतकरी त्याचा फायदा घेतात. तसेंच नवापूर तालुक्यांतील धनराट या ठिकाणीं सरकारी मालकीचे एक प्रिमीयम बुल सेंटर असून त्यांत २ चांगल्या प्रकारचे खिलार वळू ठेवले आहेत. त्यांचा उपयोग त्या भागांतील आदिवासी लोक करून घेत आहेत.

या जिल्ह्यांतील आदिवासी भागांत कोंबडया पाळण्याचा जोडधंदा म्हणून १९५९-६० मध्यें कोंबडयांची पैदास सुधारण्याकरितां १५० व्हाईट लेग हार्न जातीचे कोंबडे व ६५ डझन त्याच जातीचीं अंडीं लोकांना पुरविण्यांत आलीं. याशिवाय विकास गटातर्फे जवळ जवळ २०० शुद्ध जातीचे कोंबडे, कोंबडीची शुद्ध जातीचीं २००० पिलें व २०० डझन अंडीं आदिवासी भागांतील लोकांना वांटण्यांत आलीं. तसेंच मध्यवर्ती साहाय्यक योजनेमधून आदिवासी भागांत २१०० रु. च्या कोंबडया, बकऱ्या व म्हशी

गरजू लोकांना मोफत वाटण्यांत आल्या. जिल्ह्यांत खाजगी १० कुक्कुट पालन केंद्रें खात्याच्या मदतीनें चालविलीं जात आहेत. शुद्ध जातीचे कोंबडें, पिलें व अंडीं पुरविण्याकरितां धुळें येथें सरकारी कुक्कुट पालन केंद्र असून तेथेंच कुक्कुट पालन विषयक तांत्रिक शिक्षणाकरितां एक शाळा चालूं आहे.

गुरांवर येणाऱ्या बुळकांडी (देवी) या भयंकर रोगाच्या निर्मूलनाची मोहीम जून १९६० पासून सुरू करण्यांत आली आहे. ह्या मोहिमेकरितां खास तांत्रिक लोक नेमण्यांत आले असून ते खेडोपाडीं जाऊन गुरांना देवी रोगप्रतिबंधक लस टोंचण्याचें कार्य करीत आहेत. ठिकठिकाणीं घोड्यांवर आलेला "दक्षिण आफ्रिकन हॉर्स डिसिस" हा रोग ह्या जिल्ह्यांतहि येऊन गेला. त्यामुळें बरेच घोडे दगावले. घोड्यांचा बचाव व्हावा म्हणून सुमारे ११०० घोड्यांना रोगप्रतिबंधक लस टोचण्यांत आली.

६. पाणीपुरवठ्याच्या योजना

आपल्या देशांतील लोकांचा प्रमुख व्यवसाय शेती हा आहे. अर्थकरणाच्या या प्रमुख विभागाला चालना देऊन व त्याचा विकास करून देशाची अन्नाची व कच्च्या मालाची गरज भागविण्याची आवश्यकता आहे. याकरितां पाटाखालील जमिनीचें क्षेत्र वाढविणें हें अत्यंत महत्त्वाचें आहे. दुसरें कारण म्हणजे त्यामुळें पावसाच्या लहरीवर अवलंबून राहाण्याची गरज कमी होईल व पिकाच्या उत्पादनांत वाढ होईल. त्वरित फलप्राप्ती होण्यासाठीं विविध प्रकारच्या मध्यम व लहान पाटबंधाऱ्याच्या योजना पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या कालांत हातीं घेण्यांत आल्या.

या जिल्ह्यांतील अवर्षण व विषम पाऊस यामुळें येथें पाटबंधाऱ्याच्या योजनांच्या विकासाकडें त्वरित लक्ष देण्यांत आलें. पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत पाटबंधाऱ्याच्या जास्तींत जास्त सोयी करण्याचे खास प्रयत्न करण्यांत आले. १९५३-५४ च्या अवर्षणाच्या काळांत हे प्रयत्न अधिक गतिमान करण्यांत आले. या काळांत लोकांनींहि स्वेच्छेनें बंधारा बांधण्यासाठीं व पंपिंग सेटस् बसविण्याच्या कामांत सक्रिय पुढाकार घेतला. विशेषत: शहादे तालुक्यांतील लोकांनीं केलेली कामगिरी उल्लेखनीय आहे. या तालुक्यांतील लोकांनीं ६३,००० च्या वर रक्कम जमविली व सासुरी नदीपासून एक कालवा २८,००० रु. खर्च करून बांधला. हें काम पूर्ण झाल्यावर सुमारें ३,००० एकर जमीन कालव्याच्या पाण्यानें भिजेल. त्याचप्रमाणें शिरुड आणि काथर्डे या गांवच्या लोकांनीं जनतेच्या पुढाकारानें व श्रमदानानें दोन बंधारे बांधले. ह्या दोन्हीसाठीं ९०,००० रु. खर्च आला. जनतेच्या पुढाकारानें १९५४-५५ मध्यें २३४९ एकरांना पाणीपुरवठा करणारे ८५ कच्चे बंधारे बांधण्यांत आले.

छोटे पाटबंधारे

छोटया पाटबंधाऱ्याच्या योजनेंत छोटी पाटबंधाऱ्याचीं कामें, विहिरी आणि तळीं बांधणें दुरुस्त करणें, आणि नलिका कुप व लिफ्ट इरिगेशन यांचा समावेश होतो. सहकारी लिफ्ट इरिगेशनची माहिती सहकार विषयक प्रकरणांत दिलेली आहे.

लहान पाटबंधाऱ्यांचीं कामें

अन्नधान्य उत्पादनांत त्वरित वाढ करण्यासाठीं छोटी पाटबंधाऱ्याचीं कामें अधिक उपयुक्त असतात असें आढळून आलें आहे. युद्धोत्तर पुनर्रचना कार्यक्रम व पहिली पंचवार्षिक योजना यानुसार लहान पाटबंधाऱ्यांचीं बरीच कामें सुरू करण्यांत आलीं. "अधिक धान्य पिकवा" मोहिमेस पूरक म्हणून लहान पाटबंधाऱ्याच्या व पाणीपुरवठ्याच्या अधिक योजना हातीं घेण्यासाठीं भारत सरकारनें राज्य सरकारला कर्ज मंजूर केलें आहे.

सुमारें ९४,४४९ एकर जमीन पाण्याखालीं येऊं शकेल अशीं पुढील कामें पंचवार्षिक योजनेच्या काळांत या जिल्ह्यांत हातीं घेण्यांत आलीं. लहान व मध्यम प्रतीचीं अशीं ४३ कामें हातीं घेण्यांत आलीं होतीं. त्यापैकीं ३४ छोटी कामें प्रथम पंचवार्षिक योजनेंत पूर्ण झालीं. ह्या कामासाठीं एकूण ६.५१ लाख रुपये खर्च आला व त्यामुळें सुमारें ७,००० एकर जमिनीला पाणीपुरवठा झाला आहे. राहिलेल्या ९ कामांपैकीं सय्यदनगर बंधारा, पूरमेपाडा बंधारा, शहादा कालव्याचा विस्तार, करवंद धरण ही चार कामें मोठीं असून बाकीचीं छोटी आहेत. हीं सर्व कामें चालू असून त्यांतील बरीच कामें लवकरच पूर्ण होतील.

कामाचें नांव	पाण्याखालील क्षेत्र (एकर)
पुरमेपाडा बंधारा	५,०००
बसमार बंधारा	८,०००
करवंद बंधारा	१२,०००
कापडणे कालवा	५,०००
बेटावद कालवा	४,०००
शहादे कालवा (दोन हप्त्यानें)	३५,०००
चिमठाणा बंधारा	६,०००
सासुरी नदीपासून कालवे	३,०००
शिरूड आणि काथर्डे येथील बंधारा	१००
८५ कच्चे बंधारे	२,३४९
सय्यदनगर बंधारा	१४,०००

सय्यदनगर बंधारा

या संपूर्ण योजनेचा खर्च ४०.९२ लाख रुपये आहे. ही योजना प्रथम दुष्काळी काम म्हणून १९५३ साली सुरूं झाली. त्यानंतर दुष्काळी काम संपल्यावर ती सार्वजनिक बांधकाम खात्याकडे सोपविण्यांत आली. ह्या योजनेवर आतांपर्यंत एकूण २५.२७ लाख रुपये खर्च झाला आहे. ही योजना १९६२ सालीं पूर्ण होईल तेव्हां एकूण १४,००० एकर जमिनीला पाणी मिळेल.

पुरमेपाडा

या तळ्याचा कांहीं भाग १९०० सालच्या निमदुष्काळाच्या वेळीं खणून काढण्यांत आला. नंतर पुढील ५० वर्षांत त्याच्याकडे कोणीहि लक्ष दिलें नाहीं. १९५३ सालीं निमदुष्काळी योजना म्हणून सरकारनें हें काम हातीं घेतलें. धुळें तालुक्यांतील बोरी नदीवर धरण बांधण्याची ही योजना आहे. ह्या संपूर्ण योजनेचा खर्च ३९.९२ लाख रु. आहे. ही योजना जवळ जवळ पूर्ण होत आली असून आतांपर्यंत या योजनेवर ३८.६० लाख रु. खर्च झाला. १९६१ अखेरीस ही योजना पूर्ण होईल. ह्या योजनेमुळें एकूण ५,००० एकर जमिनीस पाणी मिळेल.

शहादे तालुक्यांत कावळीथ गांवाजवळ गोमाई नदी वर एक जुना बंधारा असून त्याच्या साहाय्यानें त्या भागांत १,००० एकर जमिनींत बागायत व १,५०० एकर जमिनींत तात्पुरती बागायत चालू आहे. हें कामहि प्रथम १९५३ सालीं दुष्काळी काम म्हणून हातीं घेण्यांत आलें व पुढें बांधकाम खात्याकडे सोंपविण्यांत आलें. या योजनेचा एकूण खर्च १६.४२ लाख रुपये आहे. आतापर्यंत या योजनेवर १४.६० लाख रुपये खर्च करण्यांत आले. ही योजना लवकरच पूर्ण होईल. ह्या योजनेमुळें एकूण ३५,००० एकर जमिनीला पाणी मिळेल.

शहादा कालव्याचा विस्तार

स्पेशल इरिगेशन डिव्हिजनमध्यें १९०० साली ही योजना तयार केली. निमदुष्काळी काम म्हणून १९५३ सालीं ही योजना हातीं घेण्यांत आली. शिरपूर तालुक्यांत अरुणावती नदीला मातीचें धरण घालणें अशी ही योजना असून ती पूर्ण झाली म्हणजे त्यांतून १२,००० एकर जमिनीला पाणी मिळेल.

करवंद बंधारा

१९५२ सालीं निमदुष्काळी काम म्हणून याचें काम सुरू करण्यांत आलें. वसमार येथें २२ फूट ऊंचीचा बंधारा घालण्यांत आला आहे. ह्या योजनेला २१ लाख रु. खर्च आला असून ८,००० एकर जमिनीला पाणी पुरवठा करणारा कालवा काढण्यांत आला आहे.

वसमार बंधारा

पूर्वी पांझरा कालव्याच्या पाण्याचा खालच्या भागांत एका मोठ्या कालव्यानें कापडण्यापर्यंतच्या जमिनीस, पुरवठा होत असे. पण मध्यंतरी कांहीं तंटा उद्‌भवल्यामुळें हा कालवा न्याहालोदच्या पुढें बंद झाला. त्यामुळें न्याहालोद व कापडणे यांच्या दरम्यानचा जुना कालवा बुजूं लागला. परंतु निमदुष्काळी कामांत त्याचें पुनरुज्जीवन करण्यांत आलें. कापडणे गांवापर्यंत तो नेण्यांत आला असून त्याच्यामुळें ५,००० एकर जमिनीला पाणी मिळतें.

कापडणें पाट

निमदुष्काळी काळांत हें काम हातीं घेण्यांत आलें. या कामामुळें एकण ४,००० एकर जमिनीला पाणी मिळतें.

बेटावद कालवा

शिंदखेडे तालुक्यांत चिमठाण्याजवळ गंगेश्वर येथें बुराइ नदीवर बंधारा बांधण्याची योजना, निष्मदुष्काळी काम म्हणून हातीं घेण्यांत आली. या बंधाऱ्यांमुळें चिमठाणा साळवे, हातनूर, दारखेडे, दिगर, आणि पिंप्री या गांवांना पाणीपुरवठा होत असून रब्बी २००० एकर व खरीप ४००० एकर जमीन पाण्याखालीं आली आहे.

चिमठाणा बंधारा

ह्या शिवाय आणखी १४ लाख रु. खर्चाच्या छोटया बंधाऱ्याच्या ६ योजना हातीं घेण्यांत आल्या. ह्या ६ योजनामुळें १८,००० एकर जमिनीला पाणी मिळणार आहे. हीं कामें जवळ जवळ पूर्ण होत आलीं आहेत. प्रथम पंचवार्षिक योजनेंतील उरलेल्या ९ कामाशिवाय ज्यामुळें २,००० एकर जमिनीला पाणी मिळेल अशी ६ नवीन कामें हातीं घेण्यांत आलीं त्यापैकीं बरींच कामें पूर्ण होत आलीं आहेत.

पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरीस ज्यांचीं कामें चालू होतीं त्यांच्या जोडीला पुढील १५ नवीन कामें हातीं घेण्यांत आलीं आहेत. ह्या १५ कामांवर एकूण १२ लाख रु. खर्च येणार असून तीं पूर्ण झाल्यानंतर आणखी १४,८९० एकर जमीन पाण्याखालीं येऊ शकेल.

कामाचें नांव	पाण्याखाली येणारें क्षेत्र (एकर)
भादवड बंधाऱ्याची खास दुरुस्ती	१२५
थाणेपाडा येथें बंधारा बाधणें	१५०
छडवेल यथील बंधाऱ्याची खास दुरुस्ती	४०
खर्डे येथील खालाजी नाल्यावर बंधारा व पाट	२००
नागेश्वर जवळील अजनाड नाल्यावर बंधारा व पाट	२००
बोराडी येथील सती नाल्यावर बंधारा व पाट	१५०
तळोदा जवळील मालानी नाल्यावर बंधारा व पाट	३००
भोणे येथें बंधारा व पाटाची खास दुरुस्ती	३००
सुसरी बंधारा	६,०००
बेटावद पाष्टे पाटाची वाढ	६०००
दामवड बंधारा	१२५
मोती नाल्यावर बंधारा	३००
लोवर पांझरा नदीकाम	
अमलाडजवळ पालनी नाल्यावर पाट काढणें	३००
काधी बंधारा	८००
	१४,८९०

पाणीपुरवठ्याच्या सोईसाठीं विहिरी खोदण्याचा व पंपाचा उपयोग करण्याचा सक्रिय प्रचार सरकार करीत आहे. या कामासाठीं शेतकऱ्यांना बरीच तगाई कर्जें दिलेलीं आहेत. पहिल्या पंचवार्षिक

विहिरी व तळ्यांमधून पाणीपुरवठा

योजनेच्या काळांत २५०० हून जास्त नव्या विहिरी खोदण्यांत आल्या व बऱ्याच जुन्या विहिरी दुरुस्त करण्यांत आल्या. अशा रीतीनें ११,२६२ एकर जमिनीला पाणी पुरविण्याची सोय झाली. बोअरींग यंत्राच्या साहाय्यानें २०० विहिरींची खोली वाढविण्याचें कामहि करण्यांत आलें. विहिरी खोदण्यासाठीं आर्थिक साहाय्य देण्याची योजना चालू आहे. विहिरी खोदण्याच्या मोहिमेला अधिक उत्तेजन व चालना देण्यासाठीं नव्या विहिरी खोदण्यासाठीं किंवा जुन्या विहिरींच्या दुरुस्तीसाठीं येणाऱ्या खर्चापैकीं २५ टक्के रक्कम शेतकऱ्याला मदत म्हणून देण्यांत येते.

७. जंगलें व उपवनें

जिल्ह्यांत एकूण १५८६ चौ. मैल क्षेत्रफळाचा भूभाग जंगलांनीं व्यापलेला आहे. सोयीच्या दृष्टीनें जिल्ह्यांतील जंगलाचे मुख्यत्वें दोन भाग पडलेले आहेत. पहिला भाग म्हणजे तापी नदीच्या दक्षिणेकडील. ह्याला पश्चिम खानदेश वनविभाग म्हणून संबोधण्यांत येतें. त्याचें राखीव क्षेत्र एकूण ७३१ चौ. मैल आहे. दुसऱ्या भागांत तापी व नर्मदा या नद्यांमधील जंगलें येतात. त्यास उत्तर खानदेश वनविभाग म्हणून संबोधण्यांत येते. ह्या जंगलाचें क्षेत्रफळ ८५५ चौ. मैल आहे. पश्चिम खानदेश विभागांत धुळें, शिंदखेडे, साक्री, नवापूर, व नंदूरबार तालुक्यांतील जंगलाचा समावेश होतो. उत्तर खानदेश विभागांत तळोदे, शहादे, शिरपूर, अक्कलकुवा तालुके आणि अक्राणी महालाचा समावेश होतो.

कार्यतत्परतेच्या दृष्टीनें वरील दोन्हीं विभागाचे एकूण खालील प्रमाणें १२ उपविभाग पाडण्यांत आले असून, त्यांस रेंज असें म्हणतात. (१) धुळें, (२) साक्री, (३) पिंपळनेर, (४) नंदूरबार, (५) नवापूर, (६) चिंचपाडा (७) लळींग, (८) शिरपूर, (९) सांगवी, (१०) शहादा, (११) तळोदा, व (१२) अक्राणी.

जंगलांतील इमारती लांकूड व सरपण ही उत्पन्नाची मुख्य बाब आहे. त्यापासून वार्षिक जवळ जवळ १२ लाख रुपयांचें उत्पन्न मिळतें. नंदूरबार, नवापूर, तळोदा, शिरपूर, अक्कलकुवा या तालुक्यांतील जंगलांतून इमारती व जळाऊ लांकूड मोठ्या प्रमाणावर निघते.

लांकूड

उच्च प्रतीचा साग हा तळोदा व अक्कलकुवा या विभागांतच होतो. कोणत्याहि प्रकारच्या इमारतीच्या कामाला सागाचें लांकूड हें सर्वांत उत्तम असतें. अक्राणी महालांतील धडगांव रेंजमध्यें उत्तम प्रतीचा मुबलक साग आहे. पण दळणवळणाच्या अभावी येथील साग काढणें फार कठीण होऊन बसलें आहे. झाडाची तोड, घडण, डेपोपर्यंत वाहतूक व विक्री हीं कामें प्रामुख्यानें जंगल कामगार सहकारी सोसायटच्यांमार्फत केलीं जातात. या सोसायटच्यांमुळेंच येथील आदिवासी व गरीब लोकांना योग्य वेतन मिळू लागलें आहे.

लांकडाच्या उत्पन्नाच्या खालोखाल इकडील जंगल विभागांत कुरणाचें उत्पन्न आहे. हें उत्पन्न गेल्या वर्षीं ४७,०५३ रु. झालें. उत्तर खानदेश विभागांत कुरणासाठीं स्वतंत्र अशी जागा नाहीं. तथापि जंगलांतील कांहीं भाग तेथील लागवड काढल्यावर कांहीं वर्षा-

कुरणें

नंतर गुरें चरावयास खुला ठेवण्यांत येतो. पश्चिम खानदेश वन विभागांत कुरणाचें एकूण क्षेत्र सुमारें २८,१३२ एकर आहे. त्यापैकीं एकटच्या लळींग येथील कुरणाचें क्षेत्र १०,३१६ एकर आहे. कुरणाचें हें ठिकाण धुळ्यापासून केवळ ८ मैलावर आहे.

या कुरणांतून सभोवतालच्या भागांना चाऱ्याचा पुरवठा होतो. पूर्वी ह्या कुरणाची स्थिति अत्यंत खालावलेली होती. पण १९५२-५३ सालीं ह्या कुरणाची सुधारणा करण्याचें काम हातीं घेण्यांत आलें. ह्या योजनेचा उद्देश दुष्काळग्रस्त विभागांत गवत पुरविणें व चांगल्या प्रकारच्या गवताची लागवड करून त्याचा जनावरांकरितां सांठा करणें व उपयुक्त अशा वनस्पतीची लागवड करणें हा आहे. या योजनेनुसार कुरणाच्या १०,००० एकर क्षेत्रांत अंजन, चिंच व लिंबाची अनेक झाडें लावण्यांत आलीं आहेत. या कुरणांतील गवताचें उत्पादन पूर्वीपेक्षां दुप्पट वाढलें आहे.

बांबू

जिल्ह्यांतील अक्राणी व नवापूर रेंजमध्यें बांबू फार मोठ्या प्रमाणांवर होतो. त्यामुळें तेथील रहिवाश्यांना बांबूपासून उत्तम प्रकारच्या टोपल्या, पडदे वगैरे तयार करण्याचा कायमचा उद्योग मिळालेला आहे. या विभागांत बांबू व गवत मुबलक प्रमाणांत उपलब्ध असल्यामुळें पेपर फॅक्टरी व स्ट्रॉ बोर्ड फॅक्टरी सुरूं करण्याचें सरकारनें विचारांत घेतलें आहे. आदिवासी लोकांना उद्योगधंदा मिळावा म्हणून चिंचपाडा उपविभागांत १० एकराच्या क्षेत्रांत ज्यापासून उत्तम प्रकारचा कागद तयार होऊ शकेल अशा बांबूची लागवड करण्यांत येत आहे. पश्चिम खानदेश वन विभागांत दर वर्षीं सुमारें १६.५ हजार रु. बांबूपासून उत्पन्न येतें.

ह्या शिवाय येथील जंगलांत विविध प्रकारची वृक्षसंपत्ति आहे. सुवासिक तेलांत व साबण वगैरेंत ज्याचा उपयोग होतो व ज्याला परराष्ट्रांकडून मोठ्या प्रमाणांत मागणी आहे अशा प्रकारचें रोषा गवत अक्राणी महालाच्या जंगलांत मोठ्या प्रमाणांत होतें. त्याच प्रमाणें ज्या झाडांचा डिंक औषधोपयोगी आहे अशा प्रकारचीं कढयीचीं झाडेंहि इकडे पुष्कळ आहेत. शिवाय अत्यंत महाग अशा चारोळीचें उत्पन्नहि इकडील जंगलांत होतें. जनावरांना वैरणीसाठीं उपयुक्त अशा अंजनची लागवडहि इकडील जंगलांत चांगल्या प्रकारें होऊं शकते. सागाबरोबरच खैर, धावडा, बाभुळ, मोहा, चिलार, सफेद, मुसळी, सावर, तखडसाल, चिलारसाल ह्या वनस्पति येथें मुबलक प्रमाणांत उगवतात. त्यामुळें जंगलाच्या उत्पन्नांत भर पडली आहे. याशिवाय आपटा, टेंभूर्णी, घाटबोरें, आंबें, बोरु, करंज बी, मोहारा फुलें, निर्गुंडी यांचीं झाडें आहेत.

जंगल विकासाच्या योजना

आजवर जंगलाकडे सतत दुर्लक्ष होऊन झाडांची बेसुमार तोड करण्यांत आली. त्यामुळें पुष्कळसे भाग जंगलहीन व ओसाड बनले आहेत. त्या जमिनीचा सुपिकपणा संपूर्णपणें गेला असून तो भाग अगदीं ओसाड-नापीक झाला आहे. घरगुती वापरासाठीं व औद्योगिक उपयोगासाठीं लागणाऱ्या जळाऊ व इमारतींच्या लांकडाकरितां झाडांची वाढ होणें अत्यंत महत्त्वाचे आहे. म्हणून या विभागांत जंगलाची वाढ करण्याच्या कार्यक्रमानुसार ४८०० एकर क्षेत्रांत जंगल वाढीचें काम सुरूं करण्यांत आलें. शिवाय आणखी ५ कुरणांचा विकास या जिल्ह्यांत करण्यांत आला असून त्याचा उद्देश गवताचें उत्पादन वाढविणें हा आहे. यासाठीं कोंटुर ट्रेंचिंग, गली प्लगिंग, चारा देणारी झाडें, अंजन, सिरस, सिसू झाडें लावणें या सारखे जमीन संरक्षणाचें कार्य सुरूं करण्यांत आलें. या कुरणांत बेकायदा गुरें चारण्यास प्रतिबंध करण्यासाठीं कुंपणाची व्यवस्थाहि करण्यांत आली आहे.

घायपात अथवा केतकीच्या कुंपणाची लागवड

घायपात झुडुपाची लागवड केली असतां जमीन संरक्षण योजनेच्या दृष्टीनें सरहद्द रेषा म्हणून व बंदिस्त विभागांत प्रवेश करण्यास गुरांना प्रतिबंध करणारें कुंपण म्हणून त्याचा उपयोग होतो. केतकीच्या पानापासून एक प्रकारचा जाडा भरडा तंतु निघतो. त्याचा उपयोग दोरखंडे वळण्याकडे होतो. त्यामुळें ग्रामोद्योगांस चालना देण्याच्या दृष्टीनेंहि त्याचा उपयोग होतो. याच्या लागवडीचा जमिनीची धूप थांबविण्याकडे उपयोगहि होतो. म्हणून केतकीच्या झुडुपांची लागवड करण्याची योजना आंखण्यांत आली असून त्यानुसार या जिल्ह्यांत सुमारें २६० मैल लांबीची लागवड करण्यांत आली.

जोपासना केंद्रें

जंगल जोपासना केंद्रें सर्व राज्यांत निरनिराळ्या ठिकाणीं स्थापण्यांत आलेलीं असून त्यामधून रोपांची जोपासना करून जंगलाच्या लागवडीसाठीं व जनतेला वनमहोत्सवासाठीं रोपें पुरविण्यांत येतात. एक जंगल संशोधन केन्द्र नवापूर येथें स्थापन करण्यांत आलें असून तेथें लावणी तंत्र व वृक्षांची निगा राखणें, बियांचा अंकुरोद्भव, लांकूड टिकविणें, किरकोळ जंगल जोपासना इत्यादि गोष्टींसंबंधीं प्रयोग करण्यांत गतात. बहुविध जंगलीकरणाच्या योजना लक्षांत घेतां, कायम स्वरूपाच्या व त्वरित वाढणाऱ्या रोपांचा पुरवठा करूं शकणाऱ्या केंद्रांची स्थापना करणें अत्यावश्यक आहे. त्यानुसार अशीं १० जोपासना केंद्रें या जिल्ह्यांत उघडण्यांत आलीं. या केंद्रांतून टीक, सादाद, महुडा, सिमल अडुळसा इत्यादि प्रकारचीं रोपें पुन्हा दुसरीकडे लावण्यासाठीं जोपासली जातात.

औषधी रोपें

पुष्कळ प्रकारचीं औषधोपयोगाचीं झाडें नैसर्गिकरीत्या जंगलांच्या कानाकोपऱ्यांतून मोठ्या प्रमाणांत वाढून पसरलेलीं असतात. ती गोळा करणें आर्थिक दृष्ट्या फायदेशीर होत नाहीं. हीं औषधोपयोगी झाडें-झुडपें व वनस्पति आयुर्वेदिक औषधांच्या निर्मितीसाठीं उपयोगी पडतात. अशा प्रकारच्या झाडांच्या वनस्पतीची लागवड एकत्र अशा विभागांतून करण्यांत आली आहे. निवडक विभागांत अशा झाडांची जोपासना प्रयोगादाखल म्हणून करण्यांत येत आहे. या जिल्ह्यांत ज्या औषधोपयोगी झाडांचा उपयोग नहमी केला जातो अशा झाडांची लागवड एका ८ एकराच्या क्षेत्रांत करण्याची योजना हातीं घेण्यांत आली आहे.

बांबूची लागवड

बांबू ही एक बहुविध उपयोगाची वस्तू असून तिचा उपयोग लहान व मोठ्या उद्योगधंद्यांना कच्चा माल म्हणून आणि गरीबांना घर बांधणीकडे होतो. म्हणून बांबूच्या लागवडीखालीं असणाऱ्या क्षेत्रांत वाढ करण्यास उत्तेजन देण्यासाठीं कार्यक्रम आंखण्यांत आला आहे. प्रयोगात्मक उपाय म्हणून या जिल्ह्यांत गोवा जातीच्या बांबूच्या लागवडीचा कार्यक्रम हातीं घेण्यांत आला आहे. या मार्गदर्शक योजनेचा बांबूच्या लागवडींत वाढ होण्यास उपयोग होईल.

टीकची लागवड

झाडांच्या बेसुमार तोडीमुळें टीक सारख्या कांहीं महत्त्वाच्या झाडांच्या जाती जवळ जवळ नाहींशा झाल्या आहेत. विस्तृत प्रमाणांत टीकची लागवड करण्याची योजना त्याकरितांच हातीं घेण्यांत आली. या योजनेनुसार जिल्ह्यांतील ११३४ एकर जमिनींत टीकची लागवड करण्यांत आली.

काडयाच्या पेटयांचें लांकूड

राज्यांत काडयाच्या पेटया बनविणारे बरेच कारखाने असून त्यांना नरम लांकडाची आवश्यकता असते. काडयाच्या पेटया व काडया बनविण्यास उपयोगी पडणारे सवार, बॉम्बॅक्स मलबारीकम या जातीच्या नरम लांकडाचीं झाडें लावण्यांत आलेलीं आहेत. ही लागवड ज्या ठिकाणीं मोकळी जागा मिळेल अशा तुरळक जंगली भागांत व ज्या ठिकाणीं टीक व इतर कठीण लांकडाच्या झाडांची योग्य प्रकारें वाढ होत नाही अशा भागांत करण्यांत येते. पश्चिम आणि उत्तर खानदेश जंगल विभागांतील ११३० एकर क्षेत्रफळाच्या जागेंत ही लागवड करण्यांत आली आहे.

लाखेची लागवड

भारतांत मोठया प्रमाणांत निर्यात होणाऱ्या वस्तूंपैकीं लाख ही एक वस्तू होय. लाखेच्या किडयांची वाढ पळस, बोर, कुसुम वगैरे झाडांवर उत्तम होते. लाखेचे किडे ज्या कोषांत राहातात तें घर म्हणजेच अशुद्ध प्रमाणांतील लाख होय. या विभागांतील जंगलांत पळस व बोर विपुल प्रमाणांत असल्यामुळें लाखेचे किडे रांचीहून (बिहार) आणून नुकतेच सांगवी व नवापूर येथील जंगलांत पळस, बोर व खैर या झाडांवर ठेवले आहेत.

डिपार्टमेंटल डेपो

जंगलालगतच्या खेडयांत सरपणासाठीं आणि शेतीच्या अवजारासाठीं व बांधकामास लागणाऱ्या लाकडांकरितां जंगल खात्यामार्फत शहादा, तळोदा व सांगवी येथें डेपो उघडले आहेत. त्यामुळें येथील लोकांची गैरसोय पुष्कळ प्रमाणांत कमी झाली आहे.

जमीन संरक्षणविषयक प्रात्यक्षिकें

या योजनेचा हेतू खेडूतांना व सर्व जनतेला शहराजवळ स्थापण्यांत आलेल्या खास भागांत जमीनसंरक्षण व जंगलीकरण यासंबंधीची माहिती प्रात्यक्षिकां-द्वारें देणें हा आहे. प्रारंभीं प्रत्येक जंगल विभागांत एक याप्रमाणें प्रात्यक्षिकें दाखविणारीं केंद्रें उघडण्यांत आलीं आहेत.

जंगलांतील दळणवळण

जंगलाची योग्य प्रकारें निगा राखण्यासाठीं, जंगलसंपत्तीच्या विकासासाठीं व ने-आणीकरितां उपयुक्त अशा दळणवळणाच्या सोयीची अत्यंत गरज असते. त्याकरितां अशा प्रकारचे ५८ रस्ते जंगल विभागांतून जातात. जंगलांतून रस्ते तयार करण्याच्या योजनेनुसार सुळे-अनेर या ११ मैल २ फर्लांग लांबीच्या रस्त्याची उंची वाढविण्यांत आली आहे व तो संपूर्ण खडीचा करण्यांत आला आहे. अक्राणी महालां-तील उत्तम प्रतीचा साग काढतां यावा म्हणून (१) कोठार ते चांदसैली, (२) मांडवी ते बिजरी, (३) बिजरी ते तेलखडी, (४) तेलखडी ते जयपाणी, (५) तोरणमाळ ते अवाशी बारी, (६) सोन ते हम्पेश्वर हे रस्ते तयार करण्यांत येणार आहेत.

जंगलांतील वन्यपशु व त्यांचें निवासस्थान

जंगल हा शब्द उच्चारला कीं साहाजिकच वाघ, चित्ता, अस्वल इ. श्वापदें नजरेपुढें येतात. त्याबाबतींत या जिल्ह्यांतील जंगलहि कांहीं अपवाद ठरत नाहीं. शिरपूर भागांत हिसाळा ते रोहिणी जंगलाच्या पट्ट्यांत चित्ते व वाघ हे जास्त प्रमाणांत आढळतात. सांगवी रेंज मधील बोराडी जंगलांत सफर केल्यास आपणांस हरणाचे कळप दिसतील. एकाद्या वेळेस नीलगायींचा कळप आपल्याकडे भेदरलेल्या दृष्टीनें पाहात असलेला दिसेल. त्याचप्रमाणें धडगांव ते तोरणमाळ रस्त्यावर सहलीचा योग आल्यास अस्वलाची भेट हमखास होणारच. इतर जंगलांप्रमाणें माकड, वानर, ससे, नाग, फुरसे, चितळ, सांबर, कोल्हे, लांडगे, रानडुकर हेहि इकडे आढतात. त्याचप्रमाणें खाटीक, खंड्या, टिटवी, कोकिळा, ससाणा, मैना, निळकंठ, तीतर, लाव्हे, पिंगळा, शिपीण, मोर वगैरे पक्षी आढळून येतात. सध्यां शिरपूर रेंजकडील कांहीं भाग वन्य पशु-पक्षी हत्येसाठीं बंद विभाग म्हणून जाहीर करण्याचें ठरत आहे.

८. उद्योगधंदे

जिल्ह्यांत प्रमुख उद्योग म्हणजे एक कापड गिरणी धुळें येथें आहे. तसेंच जिल्ह्यांतील प्रमुख ठिकाणीं शेंगदाण्याचें तेल काढण्याच्या गिरण्या, जिनिंग अँड प्रेसिंग कारखाने चालूं आहेत. चालूं असलेल्या तेल गिरण्यांची संख्या २९ आहे. तसेंच जिनिंग व प्रेसिंग कारखाने ३४ आहेत. धुळें, नंदूरबार, दोंडाइचा, शिरपूर या ठिकाणीं विडचा बांधण्याचे कारखाने आहेत; त्यापैकीं धुळें व शिरपूर या ठिकाणीं मोठें कारखाने आहेत. त्यांतील फॅक्टरी अॅक्ट खालील मजूरांची संख्या ९०० आहे, तसेंच शहादा व साक्री तालुक्यांत गुळउत्पादनाचे ४७ कारखाने आहेत. कापड गिरणी व विडचा वळण्याचे कारखानें सोडल्यास बाकीचे सर्व हंगामी कारखाने आहेत. त्यामुळें बऱ्याचशा कामगारांना ४–५ महिन्याच्या हंगामानंतर दुसरा रोजगार पाहावा लागतो.

ह्या जिल्ह्यांत छापखानेहि बरेच आहेत. परंतु फॅक्टरी अॅक्टच्या अंमलाखालीं येणारा एकच छापखाना धुळें येथें आहे. म्हणून छापखान्यांतील मजुरांना किमान वेतन कायदा लागू आहे.

जिल्ह्यांत खांडबारा येथें एक हातमागाचें केंद्र सर्वोदय केंद्रातर्फे सुरूं केलेलें आहे.

जिल्ह्यामध्यें शिरपूर व धुळें येथें सहकारी तत्त्वावर को-ऑपरेटिव्ह सोसायटीतर्फे प्रत्येकी एक जिनिंग व प्रेसिंग फॅक्टरी सुरूं करण्यांत येत आहे. शहादा येथें एक जिनिंग अँड प्रेसिंग फॅक्टरी सहकारी तत्त्वावर चालविली जाते.

धुळें येथें पेंडीपासून तेल काढण्याचा कारखाना लवकरच सुरूं होईल. त्याप्रमाणेंच दुसरेहि एक दोन कारखाने सुरूं होण्याची शक्यता आहे.

शहादे येथें सहकारी सोसायटीतर्फे खांडसरी साखर तयार करण्याचा कारखाना सुरूं झाला आहे. स्टेट ट्रॅन्स्पोर्ट कॉर्पोरेशनचे डिव्हिजनल वर्कशॉप धुळें येथें आहे.

१९४८ च्या फॅक्टरी अॅक्टखालीं ज्या कारखान्यांची नोंद झाली आहे असे चालू असलेले कारखाने पुढील प्रमाणें आहेत.

कारखान्याचें नांव	संख्या	कामगारांची संख्या
कापडाच्या गिरण्या	१	२,०००
तेल कारखाने	२९	१,७००
जिनिंग व प्रेसिंग फॅक्टऱ्या	३४	२,४००

कारखान्याचें नांव	संख्या	कामगारांची संख्या
विडी कारखाने	११	९००
मोटार दुरुस्तीचे कारखाने	३	१७१
भात आणि कडधान्य भरडणाऱ्या गिरण्या ..	४	१००
गुळउत्पादन केंद्र	७१	१,४००
स्टोन क्रशिंग फॅक्टरी	३	५०
डिंक कारखाने	१	५०
कातडी कमावण्याचे कारखाने	१	७०
छापखाने	१	१०
पेट्रोल पंपिंग अॅण्ड फिलींग	१	२५

अशा प्रकारें १६२ कारखाने असून ८,८९६ कामगार त्यांत काम करतात. औद्योगिक विकासाच्या कार्यक्रमांत कामगारांचें स्थान महत्त्वाचें आहे. त्या दृष्टीनें भारत सरकारनें फॅक्टरी अॅक्ट, पेमेंट ऑफ वेजेस अॅक्ट, किमान वेतन कायदा व प्रॉव्हिडंट फंड अॅक्ट यासारखे कायदे तयार केले व त्याचा अंमल सर्व राज्याप्रमाणें या जिल्ह्यांतहि होत आहे.

फॅक्टरी अॅक्ट, किमान वेतन कायदा व पगाराचा कायदा यांचा अंमल बरोबर होण्यासाठीं धुळें येथें फॅक्टरी इन्स्पेक्टरची कचेरी उघडण्यांत आली आहे. ह्या कचेरीतर्फे या जिल्ह्यांतील फॅक्टरी अॅक्टखालीं येणाऱ्या कारखान्यांवर व किमान वेतन कायद्याखालीं येणाऱ्या संस्थांवर देखरेख ठेवण्यांत येते.

कामगारांच्या हितासाठीं झटणारा धुळें येथें कापडाच्या गिरणी कामगारांचा प्रातिनिधिक संघ आहे. जिल्ह्यामध्यें फक्त धुळें येथें एक कामगार कल्याण केंद्र आहे. ह्या केंद्रामार्फत कामगारांसाठीं चित्रपट, रेडिओ, नाटकें, गायन व वादन, भजनें वगैरे बरेच सांस्कृतिक कार्यक्रम व वाचनालयें, ग्रंथालयें सुरू करणें या सारखे शैक्षणिक उपक्रम केले जातात.

कुटिरोद्योग

उद्योगधंद्याच्या विकासाच्या राज्य योजनेमधील प्रमुख गोष्ट म्हणजे त्यांत कुटिरोद्योग व ग्रामोद्योग यांना प्रमुख स्थान देण्यांत येत असून त्यासाठीं सुधारलेलीं उपकरणें व अवजारें वापरण्याचें कारागिरांना शिक्षण देणें, औद्योगिक सहकारी सोसायटयांची स्थापना करणें, बिन सरकारी संस्थांना ग्रामीण विभागांतहि कांहीं उद्योग सुरूं करण्यास उत्तेजन देणें, व्यक्तिगत कारागीर अगर त्यांच्या सहकारी सोसायटया यांना आर्थिक साहाय्य देणें इत्यादि गोष्टी करण्यांत येतात. या प्रयत्नामुळें जिल्ह्यांत डिस्ट्रिक्ट इंडस्ट्रियल को-ऑपरेटिव्ह असोसिएशन व्यतिरिक्त ११९ औद्योगिक सहकारी संस्था १९५९-६० अखेर स्थापन झाल्या असून त्या पुढीलप्रमाणें आहेत.

सहकारी संस्थेचा प्रकार	संख्या
जिल्हा औद्योगिक सहकारी संघ	१
हातमाग विणकर सहकारी संस्था	१४
बांबूकाम कारागीर सहकारी संस्था	२
बट-चप्पल कारागीर सहकारी संस्था	२
कातडी कमाविणें सहकारी संस्था	२
तेल घाणी सहकारी संस्था	७
धातुकाम कारागीर सहकारी संस्था	१०
सहकारी वर्कशॉप सहकारी संस्था	१
लोंकर विणकाम सहकारी संस्था	२
खादी उत्पादन सहकारी संस्था	३
सुतारकाम कारागीर सहकारी संस्था	१
इतर कारागीर सहकारी संस्था	५
जंगल कामगार सहकारी संस्था	५४
पॉवर लूम विणकर सहकारी संस्था	३
मजूर सहकारी संघ	७
गुळ खांडसारी उत्पादक संस्था	७

या संस्थांची सभासदसंख्या १०,३८७ असून भाग भांडवल २,१५,०९५ रु. आहे. राखीव व इतर फंड ८,५२,०३१रु. असून खेळतें भांडवल ३४,९४,९२८ रु. आहे. औद्योगिक सहकारी संस्थानां प्रामुख्यानें सरकार खेळत्या भांडवलासाठीं अल्प म्हणजे २.५ टक्के व्याजानें सहकारी बँकेमार्फत कर्जपुरवठा करते. अशा प्रकारे १,४२,९४९ रु. सरकारी कर्ज दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत वरील सहकारी संस्थाना देण्यांत आलें. कर्जाशिवाय उपकरणें अवजारें, यंत्र सामुग्री गुदामें इ. साठीं विविध योजनेच्या स्वरूपांत कर्ज व मदत म्हणून देण्यांत येतात. व्यवस्था खर्चासाठीं सहकारी सर्व संस्थांना त्यांच्या प्राथमिक अवस्थेंत तीन वर्षपर्यंत प्रत्येकी वार्षिक ६०० रु. मदत दिली जाते.

वैयक्तिक कारागीरांना आर्थिक मदत देण्याच्या योजनेनुसार जिल्ह्यांत ५ जन्मजात कारागीरांना २६०० रु., भटक्या जमातींतील ९ कारागीरांना २४७५ रु. व स्टेट एड इन्डस्ट्रीज रुलखालीं १३ कारागीरांना ८,१०० रु. ची. आर्थिक मदत देण्यांत आली. त्याच प्रमाणें मागासलेल्या जातींतील २० कारागीरांना १६,३७५ रु. व औद्योगिक शाळांतून शिक्षण घेतलेल्या कारागीरांना ७,४०० रु. मदत देण्यांत आली.

विविध प्रकारच्या कुटिरोद्योगांत हातमाग धंदा हा अत्यंत महत्त्वाचा आहे. या जिल्ह्यांत विणकरांच्या १४ सहकारी संस्था आहेत. त्यांचें गुंतलेलें भांडवल रु. ३,१९,९५२ इतकें आहे. हातमाग धंद्याच्या विकासासाठीं कर्जरूपानें आर्थिक साहाय्य देण्यांत येतें. हें कर्ज सुधारलेलीं उपकरणें व अवजारें, ताण फरेमी, खळीच्या कामाची उपकरणें, बॉबीनी, ड्रम वगैरे जिन्नस खरेदी करण्यासाठीं

देण्यांत येतें. त्याचप्रमाणें या संस्थाना नवीन प्रकारचे सुधारलेले माग व मागाचें सामान विकत घेण्यासाठीं ३९,९३० रु. मदत देण्यांत आली. हातमागाच्या १७,००,०७८ रुपये किंमतीच्या मालाची विक्री झाली असून त्यांत सहकारी संस्थांना १३,६५६ रु. निव्वळ नफा मिळाला.

हातमागाच्या धंद्याशिवाय दुसरें महत्त्वाचें कार्य म्हणजे जंगल कामगार सोसायटचांच्या चळवळीकडे बोट दाखवितां येईल. जिल्ह्यांत १९५१ सालीं फक्त ४ जंगल कामगार सोसायटचा होत्या. त्यांची संख्या आतां ५४ वर गेलेली आहे. अक्राणी महाल, नवापूर व अक्कलकुवा तालुक्याचा भाग दाट जंगलांनीं व्याप्त असल्यानें "मागासलेला भाग" म्हणून समजला जातो. त्याचप्रमाणें तळोदा, शिरपूर, साक्री, शहादा, नंदूरबार ह्या भागांत जंगल असल्यानें जंगल कामगार संघटित झाले असून कुपाचे मक्ते घेऊन काम करीत आहेत. सरकार जंगल कामगार सहकारी संस्थांना सवलतीच्या दरानें कूप देतें व संस्था नोंदविल्यावर शेअर भांडवल म्हणून रु. ३,००० दीर्घ मुदतीचें कर्ज म्हणून देतें व दोन वर्षेंपावेतो व्यवस्था खर्चासाठीं दरसाल १,२०० रु. या प्रमाणें मदत देते. तसेंच लोक कल्याणासाठीं ३ वर्षेंपावेतो १,५०० रु. प्रमाणें मदत देते. १९५५ ते ६० पावेतो एकूण ४४ संस्थांना वरील प्रमाणें आर्थिक मदत केली आहे.

सर्व जंगल कामगार सोसायटचांची सभासद संख्या ५,६०० असून त्यांचें सुमारें दोन लाख रुपये भाग भांडवल आहे.

वरील प्रकारच्या सहकारी तत्त्वांवर काम करणाऱ्या संस्थांव्यतिरिक्त इतर खाजगी संस्था ह्या जिल्ह्यांत बऱ्याच आहेत. त्या विशेषतः हातमाग, पॉवर माग, लोहारी, सुतारी, सोनारी, चर्मकार, बुरुड काम, साबण तयार करणारे कारखाने, विटा व कौले तयार करणें, कापड रंगविणें, व कापडावरील छपाई ह्या उद्योगधंद्याच्या आहेत.

शिक्षणाची सोय

आर्थिक कार्यक्रमाशिवाय तांत्रिक शिक्षणाचा कार्यक्रम पण उद्योगधंदे खात्यातर्फे अंमलांत आणला जात आहे. या कार्यक्रमानुसार विविध उद्योगधंद्याच्या फिरत्या शाळा काढण्यांत येऊन त्या शाळांतून कारागीरांना शिक्षण दिलें जातें. या शाळांतून सर्व साधारणपणें १२ ते ३० वर्षें वयांतील कारागीरांना प्रवेश दिला जातो. या शाळा शहरी भागांत असल्यास प्रत्येक विद्यार्थ्यांस शिक्षण घेत असतांना दरमहा २५ रु. व ग्रामीण विभागांत असल्यास २० रु. विद्यावेतन दिलें जाते. अशा प्रकारच्या फिरत्या ३ औद्योगिक शाळा, वूड टर्निग अँड लॅकर वर्क स्कूल, नवापूर; वूल विव्हींग स्कूल, निझामपूर; ट्रेनिंग कम प्रॉडक्शन सेंटर खांडबारा (यांत शिवण कामाचा विभाग व दुसरा सुतार कामाचा विभाग असे दोन विभाग सध्यां चालू आहेत.) जिल्ह्यांत काम करीत आहेत.

या शिवाय कारागीरांच्या गरजेप्रमाणें निरनिराळचा उद्योगधंदेविषयक शिक्षण देणाऱ्या २ ते ३ शाळा प्रत्येक विकास गटातर्फे सुरु करण्यांत आल्या आहेत.

जिल्ह्यांतील ग्रामोद्योग संघटित करून त्यांच्या विकासाच्या कार्यक्रमाची आंखणी व अंमलबजावणी करण्याचें व त्यांना आर्थिक साहाय्य देण्याचें कार्य एक बिन सरकारी संस्था–'राज्य खादी आणि ग्रामोद्योग मंडळ'–करते. पूर्वी ह्या जिल्ह्यासाठीं ह्या मंडळाची स्वतंत्र अशी शाखा नव्हती.

१९५८ च्या जुलैमध्यें धुळें येथें ह्या मंडळाच्या स्वतंत्र शाखेची कचेरी उघडण्यांत आली.

जिल्हा खादी आणि ग्रामोद्योग मंडळ

खादी व ग्रामोद्योग मंडळातर्फे या जिल्ह्यांत पुढील प्रमाणें योजना ठिकठिकाणीं चालू आहेत. त्यांना गेल्या दोन वर्षाच्या काळांत सुमारें ४ लाख रुपये आर्थिक साहाय्य करण्यांत आलें.

योजनेचें नांव	योजना राबविणाऱ्या संस्थांची संख्या	गांवांचीं नांवें
खादी योजना	४	धुळें, नंदूरबार, शहादे, खांडवारा.
ग्रामीण तेलोद्योग योजना	१७	धुळें ४, दोंडाइचा १, नंदूरबार २, शहादे १, शिरुड १, अक्कलकुवा १, खापर १, धनुर १, पाष्टे १, छडवेल-कोर्डे १, प्रकाशे १, खांडवारा १, शिरपूर १, साक्री एज्युकेशन संस्था.
अंबर चरखा कार्य	१	धुळें.
गॅस प्लँट	२	बोरीस, सोनगीर.
गुळ-खांडसरी	१०	न्याहाळोद, मालपूर, कासारे, साक्री, देशशिरवाडे, किरवाडे, दहिवेल, भाडणें, खेडा, बोरीस.
हात कागद योजना	२	बोराडी, खांडबारा.
साबण योजना	२	खांडवारा, धुळें.
चर्मोद्योग	१	नवापूर.
नीरा ताडगुळ योजना	१	धुळें.

९. सहकार

या जिल्ह्यांतील सहकारी चळवळीचा इतिहास मोठा मनोरंजक आहे. या चळवळीचा उगम १९०७ सालीं शिरपूर तालुक्यांतील होळनांथे ह्या गांवीं झाला. या गांवांतील २५ लोकांनीं एकत्र येऊन पहिली सहकारी सोसायटी स्थापन केली. त्यांतहि वैशिष्ठ्य असें कीं ज्यांनी ह्या कर्ज-पुरवठा करणाऱ्या सोसायटीच्या स्थापनेंत पुढाकार घेतला ते कै. चंद्रसिंह गिरासे मोठे सावकार होते. जीवनांत क्रांति घडवून आणणाऱ्या ह्या चळवळीचीं मूळें आज या जिल्ह्यांत समाजाच्या सर्व थरांत पसरली असून उद्योगधंद्यानुसार खालील प्रमाणें निरनिराळ्या सहकारी संस्था स्थापन झालेल्या आहेत.

मध्यवर्ती सहकारी बँक	१
लँड मॉर्गेज बँक	१
सेवा सहकारी संस्था	५७३
मोठ्या आकाराच्या विविध कार्यकारी सहकारी संस्था	९४
लहान विविध कार्यकारी सहकारी संस्था	९
शेतकी सहकारी पतपेढ्या	८
जिल्हा मध्यवर्ती सहकारी खरेदीविक्री संघ	१
तालुका सहकारी खरेदी विक्री संघ	८
कॉटन सेल सोसायट्या	२
सहकारी शेती व ग्राम स्वराज्य संस्था	३४
सहकारी पाणीपुरवठा संस्था	१२
अर्बन बँक व सोसायट्या	११
पगारदारांच्या सहकारी संस्था	१५
ग्राहकांच्या सहकारी संस्था	१५
पीकसंरक्षण संस्था	५४
सहकारी धान्य कोठारें	२४
दूधपुरवठा सहकारी संस्था	१२
जिनिंग व प्रेसिंग संस्था	१
गुळ व खांडसारी सहकारी संस्था	१
तालुका डव्हलपमेंट बोर्ड	३

पशुसंवर्धन संस्था	२
जीवनदर्जा सुधार संस्था	२
सहकारी शिक्षण संस्था	३
सहकारी वाचनालय	१
जंगल कामगार सहकारी संस्था	६१
सहकारी घरबांधणी संस्था	३८
जिल्हा औद्योगिक सहकारी संघ	१
सहकारी विणकर संस्था	२२
औद्योगिक सहकारी संस्था	३६
बीजपुरवठा सहकारी संस्था	२
सहकारी मच्छीमार संस्था	१
सुपरवायझिंग युनियन	१०
जिल्हा सहकारी मंडळ	१
	१,०५९


शेतकी कर्ज व पतपुरवठा

जिल्ह्यांत ८,०७,२९९ शेतकरी असून त्यापैकी ५५.५ टक्के शेतकरी सहकारी संस्थांच्या कार्यकक्षेंत समाविष्ट झाले आहेत. जिल्ह्यांतील सर्व खेडीं व गांवें सहकारी संस्थांच्या कार्यक्षेत्रांत सामील करण्यांत आलीं आहेत. ग्रामीण विभागांत कार्य करणाऱ्या एकूण ९३१ सहकारी संस्था असून त्यांची सभासद संख्या ७४,६५३ आहे. यावरून ग्रामीण विभागांतील ४३.१ टक्के लोक सहकारी संस्थांच्या कार्यक्रमांत प्रत्यक्ष सहभागी झाले आहेत. गरजू ग्रामीण जनतेस कर्जाचा पुरवठा करणें हा सहकारी चळवळीचा मूळ उद्देश समजला जातो आणि तो ह्या जिल्ह्यांत बहुतांशी सफल झालेला आहे. शेतकी पतपुरवठा सहकारी संस्थांमार्फत शेतीउत्पादन कर्जाचा पुरवठा होतो व म्हणूनच ह्या संस्थांची वाढ व विकास ह्यावरच ग्रामीण विभागाची आर्थिक उन्नति अवलंबून आहे. जून १९६० अखेर पावेतो शेतीस खतपुरवठा करणाऱ्या ७०८ सहकारी संस्था स्थापन झालेल्या होत्या. त्यांचे ६५,९७९ सभासद आहेत. ह्या संस्थांचें भाग भांडवल रु. ६०,२९,६१४ व खेळतें भांडवल रु. २,२३,३२,८८४ आहे. सरकारनें ह्या संस्थांचें एकूण रु. ४,३०,००० चे शेअर्स घेतले आहेत.

मध्यवर्ती सहकारी बँक

सहकारी बँका, इतर सहकारी संस्था व व्यक्तिगत बँकेचे सभासद यांना शेती, मालतारण, व्यापार व इतर घरगुती कारणासाठीं अल्प व मध्यम मुदतीचीं कर्जें पुरविण्याचें मुख्य कार्य करण्यासाठीं या जिल्ह्यांत धुळें येथें स्वतंत्र मध्यवर्ती सहकारी बँक स्थापन करण्यांत आली आहे. ह्या बँकेमार्फत सर्व प्रकारच्या शेती व इतर कामासाठीं कर्जाचा पुरवठा सहकारी संस्थांस करण्यांत येत असून या संस्थांनी ह्या बँकेंत ठेवींचीं खातीं उघडलेलीं आहेत. ठेवींच्या रूपानें उभारलेला पैसा आवश्यकतेनुसार जरूर

सहकारी संस्था व नियंत्रित बाजारपेठा



◉ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची मुख्य कचेरी
● जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची शाखा
✶ शेती सहकारी संस्था
✳ प्रमुख नियंत्रित बाजारपेठा

तेथें बँक पुरवीत असल्यानें आर्थिक दृष्ट्या ही बँक जिल्ह्यांतील सहकारी क्षेत्रांत संतुलन केंद्रच ठरली आहे. उभारलेल्या पैशापेक्षां शेतीउत्पादनकरितां जास्त रकमेची आवश्यकता असल्यानें बँकेनें रिझर्व्ह बँकेकडून कर्ज घेतलें आहे.

ग्रामीण विभागांत पैशाची देवाण घेवाण सुलभ व्हावी व जिल्ह्यांतील सर्व सहकारी संस्थांना व सभासदांना बँकींगच्या सोयी उपलब्ध व्हाव्यात म्हणून ह्या बँकेनें जिल्ह्यांत खालील २१ ठिकाणीं शाखा उघडल्या आहेत.

शिरपूर, शिंदखडा, नरढाणें, दोंडाईचे, नंदूरबार, शहादा, नवापूर, तळोदा, साक्री, पिंपळनेर, धडगांव, अक्कलकुवा, कुसुंब, खांडबार, शिरुड, निजामपूर, होळनाथे, वोरीस, वडाळी, सांगवी व रनाळे.

ग्रामीण विभागाच्या आर्थिक उन्नतीचा बराच मोठा भाग बँकेनें उचलला असून टप्प्याटप्प्यानें जिल्ह्यांत प्रमुख ठिकाणीं नवीन शाखा उघडण्याचें कार्य चालू आहे. पीकवार कर्जवांटप पद्धति बँकेनें अंगिकारली असून शेतकऱ्यांना त्यांचें पिकाखालील क्षेत्र विचारांत घेऊन कर्जपुरवठा करण्यांत येतो. मागील वर्षी बँकेनें रु. १,८०,३५,००० चीं शेतीउत्पादन कर्जें मंजूर केलीं. याशिवाय शेतकी खात्याच्या पीकउत्पादन मोहिमेस चालना मिळावी म्हणून शेतकऱ्यांस खत व बियाणें खरेदी करण्यासाठीं रु. १,५४,००० ची जादा कर्जें दिलीं. ऑडिट क्लासिफिकेशनमध्यें बँकेला "अ" वर्ग मिळाला असून राज्य सरकारनें ह्या बँकेचे एकूण १०,००,००० रु. चे शेअर्स घेतले आहेत. उत्तरोत्तर ह्या बँकेची झपाट्यानें प्रगति होत असून ती खालील माहितीवरून दिसून येईल.

भाग भांडवल	२८,६४,०००	रुपये
रिझर्व्ह व इतर फंड	२,००,०००	रुपये
एकूण ठेवी	१,१६,००,०००	रुपये
वांटण्यांत आलेलीं कर्जें ..	१,६०,००,०००	रुपये
खेळतें भांडवल	२,५०,००,०००	रुपये

सहकारी लँड मॉर्गेज बँक

शेतीउत्पादन वाढविण्याकरितां दीर्घ मुदतीच्या कर्जाची पूर्तता व्हावी म्हणून जिल्ह्यांत स्वतंत्र लँड मॉर्गेज बँक आहे. गेल्या वर्षी या बँकेमार्फत जमीनखरेदी, एंजिनखरेदी, जमीनसुधारणा व जुन्या कर्जाची फेड यांकरितां १६,०१,३९३ रु. चीं६४७ कर्जें देण्यांत आलीं. बँकेचे सभासद १८,५२१ असून भाग भांडवल २,८०,८४९ रु., रिझर्व्ह व इतर फंड रु. ६६,२४२ आहे.

नागरी सहकारी बँका

वरील दोन्ही बँकाशिवाय व्यापारी व इतर वर्गास व्यापारी माल, घरें अथवा तत्सम स्थावर मिळकतीच्या गहाणावर, तसेंच सोने, चांदी व सरकारमान्य सिक्युरिटीज यांच्या तारणावर कर्ज देणाऱ्या सहा अर्बन बँका ह्या जिल्ह्यांत आहेत. पैकीं पश्चिम खानदेश सरकारी कर्मचाऱ्यांची धुळें येथें सहकारी बँक आहे. याशिवाय राजवाडे मंडळ पीपल्स को-ऑपरेटिव्ह व धुळें अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक ह्या सुद्धां धुळें येथेंच आहेत. बाकी बँका शहादा, शिरपूर व दोंडाइचा ह्या ठिकाणीं आहेत. ह्या सर्व बँकांची

सभासद संख्या ५,८०६, असून भाग भांडवल ४,९६,८२० रु. व ठेवी १९,५१,६७४ रु. आहेत. ह्या बँकेचें खेळतें भांडवल ४३,०७,५६६ रु. असून रिझर्व्ह व इतर फंड ४९,७९१ रु. आहे.

सावकारी नियंत्रण

सावकारांच्या कारवायांना आळा घालण्याकरितां केलेला १९४६ चा सावकारी नियंत्रण कायदा ह्या जिल्ह्यांत नोव्हेंबर १९४७ ला लागू करण्यांत आला. कायद्यानें सावकारावर लायसेन्स काढणें, हिशेब ठेवणें व ते सादर करणें, नक्की केलेल्या दरानें व्याजाची आकारणी करणें ही प्रमुख बंधनें असल्यानें सावकारांच्या कारवायांना आळा बसला आहे. १९६० अखेर या जिल्ह्यांत २१९ लायसेन्सधारी सावकार होते. त्यांनीं मागील वर्षांत व्यापारी कर्जें रु. २६,१६,६३९ व बिगर व्यापारी कर्जें ४२,७३,३९६ रु. २६,३४४ कर्जदारांना दिलीं. ह्या जिल्ह्यांत सहकारी संस्थांमार्फत कमी व्याजाच्या दरानें कर्जें पुरविली जात असल्यानें खाजगी सावकारीस बराच आळा बसला आहे. बहुतांशी खाजगीरीत्या दिली जाणारीं कर्जें कायद्याच्या कक्षेंत येऊं लागलीं आहेत.

सेवा सहकारी संस्था

शेतकरी वर्गाशिवाय इतर ग्रामीण कारागीर वर्गास पतपुरवठा करतां यावा तसेंच जरूर ते इतर व्यवसाय हातीं घेतां यावे ह्या उद्देशानें अस्तित्वांत असलेल्या पतपुरवठा करणाऱ्या ३५१ सहकारी संस्थाचें व १९७ विविध कार्यकारी सहकारी संस्थांचें रूपांतर सेवा सहकारी संस्थांत करण्यांत आलें व नवीन २५ सेवा सहकारी संस्था स्थापन करण्यांत आल्या. अशा रीतीनें जिल्ह्यांतील ह्या संस्थांची संख्या आतां ५७३ झाली असून त्यांच्या कार्यक्षेत्रांत १०६९ गांवें येतात. ह्या सोसायटयांचे सभासदहि वाढले असून आतां ४२,८७० लोक त्यांचे सभासद आहेत. अर्थव्यवस्थेचे स्वयंभू घटक बनण्याच्या दृष्टीनें ह्या संस्था प्रयत्न करीत असून आज त्यांचें भाग भांडवल ३५,०१,०६० रु. आहे, व खेळतें भांडवल १,३२,८२,८८८ रु. आहे. ह्या संस्थांचे स्वतःचे १६,७२,७८५ रु. रिझर्व्ह व इतर फंड असून १,१८,३४,८३५ रुपयांच्या कर्जाची बाकी येणें आहे.

मोठ्या आकाराच्या विविध सहकारी संस्था

अशा प्रकारच्या संस्था जिल्ह्यांत ९४ असून त्यांचे २५३ गांवांतील १९,४७३ लोक सभासद आहेत. बहुतेक संस्थांनीं कर्जवांटपाच्या व्यवहाराव्यतिरिक्त स्वस्त धान्याचीं दुकानें चालविणें, साखर व खतवांटप हीं कामें हातीं घेतलीं आहेत. ह्या संस्थांचें भाग भांडवल १३,८२,६८५ रु. असून सरकारनें ह्या संस्थांचे ४२,८०,००० रु. चे शेअर्स घेतले आहेत. ह्या संस्थांचें खेळतें भांडवल ८५,२९,२५६ रु. आहे. ह्या संस्थांपैकीं कांहीं संस्थांनीं स्वतःची गुदामें देखील बांधण्यास घेतली आहेत. ह्या गिऱ्हाईकांस संस्थांनीं २८,९७,७८७ रु. किंमतीचा घरगुती व इतर माल पुरविला.

शेती सहकारी संस्था

जिल्ह्यांत पांच संयुक्त शेती, एक खंडकरी, चौदा सामुदायिक व एक शेती सुधारक अशा एकूण २० शेती सहकारी संस्था आहेत. ह्यापैकीं एक खांडकरी सहकारी संस्था सोडून १३ संस्थांना ३,७९९ एकर सरकारी जमीन मिळाली असून सात सहकारी संस्थांच्या सभासदांनीं स्वतःची ११४० एकर जमीन सहकारी संस्थांमध्यें सामील केली आहे. वरील संस्थांपैकीं पांच संस्थांनीं जवळ जवळ ३३० एकर जमिनीला पाणीपुरवठा करून बागायती पिकें घेतलीं. वरील संस्थांना जमीन सुधारण्यासाठीं व लागवडी खाली आणण्या-

साठीं सरकारनें २,६०,९५६ रु. मदत केली. साक्री तालुक्यांतील पानखेडे येथें आदिवासींची अशा प्रकारची सहकारी संस्था असून त्यांत तिच्या मार्फत आदिवासी कुटुंबाची आदर्श वसाहत स्थापन करण्यांत आली आहे.

पाणीपुरवठा सहकारी संस्था

शेतीस एंजिनच्या साहाय्यानें पाणीपुरवठा करणाऱ्या ११ सहकारी संस्था ह्या जिल्ह्यांत असून एका संस्थेनें कच्चा बंधारा बांधून पाणीपुरवठा योजना हातीं घेतली आहे. ब्राह्मणपुरी येथील सहकारी पाणी पुरवठा संस्थेनें नदीस कच्चा बंधारा बांधून ४०० एकर जमिनीला पाणीपुरवठा केला. वरील ११ संस्थांपैकीं ४ संस्थांनीं विहिरीं-वर व बाकी संस्थांनीं नदीवर एंजिन्स बसवून पाण्याची सोय केली आहे. ह्या सर्व संस्थांनीं ५,६५६ एकर जमीन पाण्याखाली आणली आहे. वरील संस्थाना १०,८५,३६० रु. कर्ज व अनुदान सरकारनें मंजूर केलें आहे.

पीकसंरक्षण सहकारी संस्था

भटकी व जंगली जनावरें यांच्या पासून पिकाचें संरक्षण करण्याकरितां जिल्ह्यांत एकूण ५४ पीकसंरक्षण संस्था स्थापन झाल्या आहेत. ह्यापैकीं कांहीं संस्थांना बंदुकीचीं लायसेन्स देण्यांत आलीं आहेत. ह्या सर्व संस्थांची आर्थिक परिस्थिति चांगली असून त्यांच्या संरक्षणाखालीं १,२७,८१९ एकर जमि-नीचें क्षेत्र आहे.

घर बांधकाम सहकारी संस्था

अशा प्रकारच्या या जिल्ह्यांत ३८ संस्था आहेत. त्यापैकीं २७ संस्था मागासलेल्या जमातीच्या व ११ इतर लोकांकरितां स्थापन करण्यांत आल्या आहेत. मागासलेल्या जमातीच्या ९ संस्थांना सरकारकडून घरें बांधण्यासाठीं जमीन मिळाली असून १३ संस्थांच्या सभा-सदांच्या घरांची जागा स्वतःची आहे. ज्या संस्थांना सरकारी जमीन मिळाली आहे त्यापैकीं ७ संस्थांना १,९८,६१८ रु. ची सरकारी मदत मिळाली असून त्यांनीं १३४ घरांचें बांधकाम हातीं घेतलें आहे.

इतर मागासलेल्या वर्गांतील लोकांच्या ३ संस्थांनीं ५१ घरें बांधलीं आहेत.

शेतमालावर प्रक्रिया करणाऱ्या सहकारी संस्था

ह्या जिल्ह्यांत शहादा तालुका खरेदी-विक्री संघानें स्वतःची एक जिनींग व प्रेसिंग फॅक्टरी चालविली आहे. ह्या फॅक्टरींत सभासद व इतर शेतकऱ्यांचा कापूस एकत्र करून सर्व माल लिलावानें विकला जातो नंतर तो माल जिन करण्यांत येतो. मागील वर्षीं कपाशीचें पीक चांगले नसल्यानें ही संस्था फक्त १६० बोज कपाशी पिळून देऊं शकली. जिल्ह्यांत शिरपूर येथें ता. २५-१०-५८ रोजीं शिरपूर ता. को-ऑप. कॉटन जिनींग अँड प्रेसिंग या नांवानें स्वतंत्र प्रक्रिया करणारी संस्था स्थापन करण्यांत आली असून या संस्थेचें ५०,००० रु. चें भाग भांडवल सरकारनें घेतलें आहे. संस्थेचें स्वतःचें भाग भांडवल १,००,१०० रु. आहे. ह्या संस्थेचें कार्य लवकरच सुरू होणार आहे.

साक्री तालुक्यांत पाट बंधाऱ्याच्या योजनांमुळें व ठिकठिकाणीं विहिरींवर एंजिन्स बसविल्यामुळें सुमारें ३,००० एकरापर्यंत उंसाची लागवड करण्यांत येते. शिवाय चालू असलेल्या पाटबंधाऱ्याच्या योजनांमुळें पुष्कळ एकर जमिनीवर बागायती पिकें घेतां येतील. उंसाची लागवड होऊ शकेल. तेथें सहकारी साखर कारखाना काढावा असा प्रयत्न चालू आहे. त्यासाठीं "पांझरा कान संस्था" स्थापण्याचें ठरलें असून तालुक्यांतून ह्या संस्थेचे १,८६,२५० रु. जमा झाले आहेत व आणखी ७,४५,००० रु. जमा करण्यांत येत आहेत.

सहकारी साखर कारखाना

त्याच प्रमाणें शहादे तालुक्यांत गोमाईच्या बागायती क्षेत्रांत उंसाची लागवड मोठ्या प्रमाणांत करण्यांत येते.

या जिल्ह्यास समुद्र किनारा नाहीं. तरी पण २०-९-५१ पासून तालुक्यांत असणाऱ्या तीन तलावांत मच्छीमारीचा धंदा सहकारी तत्वावर करण्याकरितां धुळें येथें एक मच्छीमार संस्था स्थापन झाली आहे. सभासदांनीं आणलेल्या मासळीची विक्री करण्याचें कार्यहि संस्थेनें हातीं घेतलें आहे.

मच्छीमार सहकारी संस्था

दोंडाइचे व नरढाणे येथें वीजपुरवठा करण्याकरितां सहकारी संस्था स्थापन केल्या आहेत. पैकीं दोंडाइचे येथील सहकारी संस्थेनें २५० किलोवॅट वीज निर्माण केली असून वीजवांटपाच्या कामास सुरवात झालेली आहे. दोंडाइचे येथील संस्थेस सरकारकडून मदत म्हणून शेअर रु. १०,०००; कर्ज रु. ४०,००० व अनुदान रु. ३०,००० अशी मिळाली आहेत. ह्या दोन्ही संस्थांचें भाग भांडवल रु. २,२०,४०० असून खेळतें भांडवल रु. ३,९०,४०० आहे. दोन्ही योजनांचा खर्च १२.५ लाख रु. च्या आसपास आहे.

वीजपुरवठा सहकारी संस्था

धुळें शहरास दुधाचा पुरवठा सहकारी संस्थांमार्फत करण्याकरितां धुळें तालुक्यांत एकूण ११ दूध उत्पादक सहकारी संस्था काम करीत आहेत. ह्या संस्थांनीं दुधाचें वांटप करण्याकरितां त्यांची एक मध्यवर्ती युनियन स्थापन केली असून तीमार्फत दुधाची विक्री केली जाते. ह्या संस्थांची सभासद संख्या ५०० आहे. शहादे येथें अशा प्रकारचा एक संघ स्थापन झाला आहे. मध्यवर्ती दूध उत्पादक सहकारी संघानें स्वतःचें भांडवल रु. ५,९२० उभारले असून संघाला सरकारी मदत रु. २६,०२५ मिळाली आहे. संघानें मागील वर्षांत ७९,२८१ पौंड दुधाचें वांटप केलें.

दूध उत्पादक सहकारी संस्था

अशा संस्थांची संख्या ३ आहे व त्या शहादा, शिंदखेडा व नंदूरबार येथें स्थापन झालेल्या आहेत. त्यांची सभासद संख्या ६१ असून शिंदखेडा व शहादा येथील शिक्षण संस्थांनीं ४ शाळा चालविल्या आहेत. शहादा येथील शिक्षण संस्थांनीं प्रकाशा या ठिकाणीं विद्यार्थ्यांकरितां एक वसतिगृह चालविले आहे. या सर्व संस्थांचें खेळतें भांडवल रुपये १,१३,९९१ आहे.

सहकारी शिक्षण संस्था

सहकारितेचा प्रचार व मार्गदर्शन हीं कार्यें प्रामुख्यानें ह्या जिल्ह्यांतील जिल्हा सहकारी मंडळामार्फत केली जातात. सहकारी संस्थांना प्रशिक्षित असे कर्मचारी मिळावे म्हणून जिल्ह्यांतील प्रमुख ठिकाणीं ह्या मंडळामार्फत वर्षांत निरनिराळ्या वेळीं शिक्षणाचे वर्ग चालविले जातात. हे वर्ग चालविण्याकरितां राज्य सहकारी संघानें ह्या मंडळाकरितां ट्रेनिंग इन्स्पेक्टरची नेमणूक केली आहे. ह्या शिक्षणाच्या कार्यक्रमांत प्रामुख्यानें सहकारितेची मूलतत्त्वें, सहकारी कायद्यांतील प्रमुख तरतुदी, निरनिराळ्या प्रकारच्या सहकारी संस्थासंबंधींची माहिती व सोसायटयांचे हिशेब ठेवण्याची पद्धति ह्या बाबींचा अंतर्भाव करण्यांत आला आहे. ह्याशिवाय सहकारी संस्थांच्या चालकांना व इतर सामान्य सभासदांना सहकारी संस्थांच्या व्यवहारासंबंधीं त्यांचीं वैयक्तिक कर्तव्यें व जबाबदारी ह्यासंबंधी माहिती करून देण्याकरितां वर्ग भरविले जातात.

सहकारी प्रशिक्षण वर्ग

सहकारी पतपेढया व विविध कार्यकारी संस्था यांच्या सेक्रेटरींकरितां ४२ व सहकारी संस्थांचे कार्यकारी सभासद आणि इतर सभासद यांच्याकरितां ७३ शिक्षणाचे वर्ग मंडळानें मागील वर्षी चालविले.

सहकारी शिक्षण वर्गांत शिक्षण घेऊन उत्तीर्ण झालेल्या इसमांना शेतकी सहकारी पतपेढयांचे सेक्रेटरी म्हणून नेमणूक करतांना प्राधान्य दिलें जातें.

निरनिराळ्या सहकारी कायद्यांची अंमलबजावणी व जनतेला सहकारी तत्त्वांबाबत मार्गदर्शन करण्याकरितां जिल्हा पातळीवर जिल्हा सहकारी संस्थांचे अधिकारी आहेत. तालुका व ग्राम पातळीवर यांना साहाय्यक नेमण्यांत आलेले आहेत. त्याच प्रमाणें सहकारी संस्थांचे हिशोब तपासणें व त्यांच्यावर देखरेख ठेवणें यासाठीं ऑडिटर्स व सब् ऑडिटर्स यांची नियुक्ती करण्यांत आली आहे. सावकारी नियंत्रण कायद्याची व ॲग्रिकल्चर प्रोडयूस मार्केट ॲक्टची अंमलबजावणीहि ह्या कार्यालयातर्फेंच केली जाते. त्यासाठीं जादा कर्मचारी देण्यांत आले आहेत.

सहकारी अंमल-बजावणी व मार्गदर्शन

बॉम्बे ॲग्रिकल्चर प्रोडयूस मार्केट ॲक्ट सन १९३९ चा कायदा मुख्यत्वेंकरून शेतमाल उत्पादकाच्या मालाला योग्य भाव मिळावा व बाजारांत प्रचलित असलेल्या वाम मार्गांना आळा बसावा ह्या हेतूनें पास करण्यांत आला. त्यानुसार ह्या जिल्ह्यांत सहा मार्केट कमिटया धुळें, दोंडाइचे, शिरपूर, नंदूरबार, शहादा व नवापूर येथें स्थापन करण्यांत आल्या. जिल्ह्यांत एकूण १४ नियंत्रित बाजार पेठा आहेत. त्यांपैकीं वरील सहा ठिकाणीं मुख्य बाजार पेठा आहेत व ८ ठिकाणीं पोट बाजार पेठा आहेत. अशा तऱ्हेनें सर्व जिल्हा ह्या कायद्याच्या अंमलबजावणीखालीं आला आहे.

नियंत्रित बाजार पेठा

हा जिल्हा प्रामुख्यानें शेती प्रधान असून जमिनीची उत्पादनक्षमता चांगली आहे. तरी पण जिल्ह्यांतील निरनिराळ्या विभागांत विशिष्ट पिकाची लागवड जास्त होत असल्यानें अशा विशिष्ट पिकांचे खरेदी-विक्रीचे व्यवहार त्या त्या भागांत नियंत्रित केलेले आहेत. धुळें, दोंडाइचे, नंदूरबार, शिरपूर, शहादा, नवापूर, तळोदा, नरढाणें, शिंदखेडा व खांडबारा बाजार पेठांतून मागील वर्षी दि. ३१-८-६० पर्यंत

निरनिराळ्या पेठांत होणारी आवक

पुढील प्रमाणें मालाची आवक झाली. (बंगाली मणांत) गहूं २,९४,५८९, बाजरी ८३,६२१, भुईमूग २१,८०,१८५; कापूस५,७५,५२१; चणा ८३,१०३; उडीद १,५६,४८०; मूग २,४०,८९६; मठ ५३,८९०; तीळ ६३,७२५; तूर १,८९,०७३; जवस ५,४०९; मिरची ४,३५,३०९; मिरची सुकी ६६,३७५; ज्वारी ५,२१,८०४.

जिल्ह्याच्या उत्तरेस सातपुडा व पश्चिमेस सह्याद्रि ह्या पर्वतांच्या रांगा असल्यानें ह्या हद्दी-जवळच्या प्रदेशांतील उत्पादन जिल्ह्याच्या बाहेर जात नाहीं. परंतु मध्यप्रदेशांतून शिरपूर भागांत राष्ट्रीय भूमि मार्ग जात असल्यानें ह्या विभागांत मध्यप्रदेशांतून मालाची कांहीं अंशीं ने-आण होते. दक्षिण व पूर्व विभागांतून नाशिक व जळगांव जिल्ह्यांतील अनुक्रमें सटाणें व अंमळनेर येथील बाजार पेठेंत थोड्या प्रमाणांत मालाची जावक होते. जिल्ह्याचें एकूण उत्पादन व बाजार पेठांचें स्थान व उपलब्ध वाहतुकीचीं साधनें लक्षांत घेतां एकूण मालापैकीं ९८ प्रतिशत माल जिल्ह्यांतील नियंत्रित बाजार पेठांतूनच विकला जातो. जिल्ह्यांतील नियंत्रित बाजार पेठांची शास्त्रीय दृष्टीनें वाढ व विकास व्हावा म्हणून धुळें, दोंडाइचे, नंदूरबार, शिरपूर व शहादा ह्या प्रमुख ठिकाणीं असलेल्या मार्केट कमिटचांनीं बाजार पेठांकरितां जागा मिळवून त्या ठिकाणीं स्वतःच्या इमारती बांधल्या आहेत. त्या पेठांमधील खरेदी विक्रीचे व्यवहार ह्या कमिटचांच्या प्रत्यक्ष देखरेखीखालीं बाजाराच्या ठिकाणीं होतात. मार्केट कमिटचांनीं स्थानिक सहकारी संस्थांना गुदामाकरितां मार्केट यार्डावर जागा दिल्या आहेत. पावसाळी हंगामांत मात्र माल साठविण्याच्या सोयीच्या अभावामुळें आतांपर्यंत मार्केट कमिटचांच्या संमतीनें गांवांत मालाचें वजन केलें जातें. तथापि वेअर हाऊसिंग कॉर्पोरेशन ह्या सहकारी संस्थांचीं गुदामें जसजशीं उपलब्ध होतील तसतसा ह्या परिस्थितींत बदल होईल.

जिल्ह्यांत नियंत्रित बाजार पद्धति उपयुक्त व्हावी तसेंच उत्पादक दलाल व खरेदीदार यांना मार्केट यार्डावर व्यवहार करणें सुलभ व्हावे या दृष्टीनें मार्केट कमिटचांनीं सर्वसाधारणपणें शेतकऱ्यांस व जनावरांस पिण्याचें पाणी, दिवाबत्ती, विश्रांतीची जागा, माल मापण्याच्या जागेवर शेडस्, बैलगाडी व इतर वाहनांसाठीं वाहतुकीचे रस्ते वगैरे सोयी केल्या आहेत. इतकेंच नाहीं तर धुळें, दोंडाइचे शिरपूर व नंदुरबार या मुख्य बाजार पेठांतील मालाचे दररोजचे भाव दूरध्वनीक्षेपित करण्यासाठीं व तारेनें मुंबईस कळविण्याकरितां व्यवस्था केली आहे. त्यांतल्या त्यांत दोंडाइचे मार्केट कमिटीनें दोंडाइचे येथील बाजारभाव शिंदखेडा तालुक्यांत जेथें जेथें रोज पोस्टाची सोय आहे अशा ठिकाणच्या ग्रामपंचा-यतींना दर दिवशीं कळविण्याची व्यवस्था केली आहे.

सहकारी बाजार व्यवस्था

ज्या गतीनें नियंत्रित बाजार पेठांची वाढ व विकास करण्यांत आला त्याच गतीनें किंबहुना त्याहिपेक्षां अधिक जोमानें या बाजार पेठांत कार्य करीत असलेल्या सहका ी संस्था शेतमालाची सह-कारी पद्धतीनें विक्री करण्यासाठीं पुढें सरसावल्या आहेत व त्यांनीं मार्केट यार्डावर गुदामें बांधण्यासाठीं मार्केट कमिटचांकडे जागेची मागणी केलेली आहे. विशेष नमूद करण्यासारखी गोष्ट म्हणजे तळोदे येथील मागासलेल्या विभागांतील सहकारी खरेदी विक्री संघान तेथील सब्यार्डावर मध्यम आकाराची गुदामें बांधलीं असून शिरपूर येथें दखील खरेदी विक्री संघानें गुदाम बांधलें आहे. धुळें, शिरपूर, दोंडाइचे, तळोदा, शहादा ह्या ठिकाणचे सहकारी खरेदी-विक्री संघ व साक्री, नंदूरबार येथील शेतकरी सहकारी संघ या संस्था नऊ ठिकाणच्या नियंत्रित बाजार पेठेंत जनरल कमिशन एजंट म्हणून

शेतमालाच्या विक्रीचें काम करीत आहेत. ह्या संस्थांनीं गेल्या वर्षीं धुळें बाजार पेठेंत १२ टक्के, दोंडाइचे बाजार पेठेंत ११ टक्के, शिरपूर बाजार पेठेंत १५ टक्के, नंदूरबार बाजार पेठेंत ४.२५ टक्के, शहादा बाजार पेठेंत ३७ टक्के, तळोदा बाजार पेठेंत २५ टक्के, शिंदखेडा बाजार पेठेंत ६६ टक्के, व नरढाणें बाजार पेठेंत ३६ टक्के मालाची विक्री केली आहे.


जिल्ह्यांत शेती, पतपुरवठा व शेतमाल विक्रीपद्धति यांची सांगड घालण्याच्या दृष्टीनें प्रत्येक तालक्यास एक याप्रमाणें सहकारी खरेदी-विक्री संस्थांनीं मार्केट यार्डावर स्वतःचीं गुदामें बांधण्याची योजना आंखली असून त्यामुळें तालुक्यांतील संघांना व सामील सहकारी संस्थांच्या सभासदांना आपला माल गुदामांत सांठवून त्याच्या तारणावर कर्ज उभारण्याची सोय करून घेतां येईल व ते आपला माल बिगर हंगामांत देखील विकूं शकतील. अशा रीतीनें शेतमालाच्या भावांस स्थैर्य येण्यास ह्या संस्थांचें कार्य मोठ्या प्रमाणांत उपयोगी पडणार आहे. सर्व जिल्ह्यांकरितां एक मध्यवर्ती सहकारी खरेदी-विक्री संस्था असावी ह्या उद्देशानें तालुका सहकारी खरेदी-विक्री संघ व इतर पतपेढ्यांनीं जिल्हा मध्यवर्ती सहकारी खरेदी-विक्री संघ ता. २२-९-१९५९ रोजीं स्थापन केला. सहकारी खरेदी विक्री-संघांची सर्व साधारण माहिती खालील प्रमाणें आहे.

१.	सहकारी खरेदी-विक्री संस्थांची संख्या			१०
२.	सभासद संख्या	सहकारी संस्था		१,००८
		व्यक्तिगत		३,४७३
३.	भाग भांडवल		रु.	४,४१,४१४
४.	पैकी सरकारनें घेतलेल्या शेअरची किंमत		रु.	१,६८,१०५
५.	खेळतें भांडवल		रु.	१७,३४,४६६
६.	रिझर्व्ह व इतर फंड		रु.	५,५५,३३५
७.	खरीदलेल्या मालाची वर्षांतून विक्री		रु.	१,०९,२३,४६९
८.	दलाल म्हणून केलेली मालविक्री		रु.	१,७९,४५,८५१

सभासदांच्या शेतमालाची विक्री सहकारी संस्थांमार्फत व्हावी व जरूर तेव्हां सभासदांना त्यांच्या शेती मालाच्या तारणावर कर्जहि देतां यावे ह्या उद्देशानें प्राथमिक शेतीस सहकारी संस्थांनींहि पाऊल टाकले आहे. तसेंच ही व्यवस्था करतां यावी म्हणून ५९ संस्थांनीं गुदामें बांधण्याचें काम हातीं घेतलें आहे. त्यामुळें मार्केट यार्डावर बांधल्या जाणाऱ्या गुदामावरील ताण कमी पडून मालाची सांठवण खेड्यांत देखील होणार आहे. तीन-खरेदी विक्री संघ व ५९ विविध कार्यकारी आणि सेवा सहकारी संस्थांनीं मोठ्या आकाराचे एक, मध्यम आकाराचीं १२ व लहान आकाराचीं ४९ अशी एकूण ६२ गुदामें बांधण्याकरितां घेतलीं असून त्यांना ५,४३,११२ रुपयांची सरकारनें मदत दिली आहे.

शेतमाल सांठवण्याची व्यवस्था व्हावी व सांठवलेल्या मालावरील मिळालेल्या पावतीच्या आधारावर कर्ज मिळण्याची सोय व्हावी ह्या उद्देशानें मुंबई राज्य वेअर हौसिंग कॉर्पोरेशननें हातीं घेतलेल्या योजनेनुसार कॉर्पोरेशननें धुळें, दोंडाइचे, नंदूरबार व शिरपूर येथें गुदामें स्थापन केलीं आहेत. ह्याबरोबरच सहकारी संस्थांनीं देखील योजनाबद्ध गुदामें बांधण्याचें कार्य हातीं घेतल्याने शेतमाल सांठविण्याच्या अडचणी दूर होऊन शिवाय माल तारणावर कर्ज मिळण्याच्या सोयी उपलब्ध झालेल्या आहेत.

दळणवळणाची सोय


तोरणमाळ
धडगांव
आग्राकडे
शहादे
तळोदे
अक्कलकुवा
शिरपूर
नंदुरबार
सिंदखेडे
भुसावळकडे
जळगांवकडे
नवापूर
साक्री
धुळे
पिंपळनेर
चाळीसगांवकडे
चाळीसगांवकडे
राष्ट्रीयमार्ग
मोटाररस्ते
रेल्वेमार्ग
तालुक्याचें मुख्य ठिकाण
जिल्ह्याचें मुख्य ठिकाण
थंड हवेचें ठिकाण

१०. वाहतुकीचे मार्ग व बांधकाम

कोणत्याहि जिल्ह्याच्या आर्थिक प्रगतीचें मूल्यमापन मुख्यत्वें करून तेथें उपलब्ध असलेल्या वाहतुकीच्या व दळणवळणाच्या सोयीवरून करतां येतें. दळणवळणाचे मार्ग हे जनता संपर्काचीं प्रमुख साधनें आहेत. म्हणून रस्तेविकासाच्या कार्यक्रमाला सरकार प्राधान्य देत आहे. ग्रामीण रस्त्याच्या विकासामागील मुख्य हेतु महत्त्वाचीं खेडीं बाजार पेठांना व जिल्हा केंद्रांना जोडण्याचा आहे.

खेडीं जोडणारे रस्ते :–– ग्रामीण अर्थव्यवस्था विकसित करण्याच्या दृष्टीनें आंतील भागांत असणारीं खेडीं मुख्य रस्त्यांना जोडणारे रस्ते तयार करण्यांत येत आहेत. हे रस्ते बांधण्याचें त्यांची निगा राखण्याचें व त्यांची दुरुस्ती करण्याचें कार्य जिल्हा लोकल बोर्ड ग्रामपंचायत या सारख्या स्थानिक संस्थांवर सोपविण्यांत आलें आहे व ह्या कार्यासाठीं ग्रामीण जोड रस्त्यांच्या योजनेखालीं वरील संस्थांना खास मदत देते. तसेंच या कामासाठीं सामूहिक विकास व राष्ट्रीय विस्तार योजना व स्थानिक विकास योजना यामधून आर्थिक मदत पुरविण्यांत येते. या कामाचें महत्त्व ग्रामीण जनतेलाहि पटले असून ती देखील श्रमदानानें ह्या कार्यांत मदत करीत आहे. या जिल्ह्यांत अशा प्रकारचे ६६० मैल लांबीचे रस्ते असून ते लोकल बोर्डाच्या ताब्यांत आहेत.

प्रमुख रस्ते :––जिल्ह्यांत प्रमुख असे ५६४ मैल लांबीचे रस्ते आहेत. ह्या रस्त्यांची सुधारणा करण्याचें कार्य व आवश्यक असलेले नवीन मार्ग बांधण्याचें काम बांधकाम खात्या-मार्फत केलें जातें. वरील प्रमुख रस्त्याचे **राष्ट्रीय मार्ग – राज मार्ग–जिल्हा मार्ग** असे तीन भाग आहेत. जिल्ह्यांतून दोन राष्ट्रीय मार्ग जातात. पहिला राष्ट्रीय मार्ग मुंबई आग्रा रोड असून त्याचा ३० मैल लांबीचा भाग ह्या जिल्ह्यांतून जातो. धुळें, सोनगीर, नरढाणें सुकवर व शिरपूर, पळासनेर ही ह्या मार्गा-वरील प्रमुख गांवें आहेत. पळासनेरच्या पुढें त्याचा मध्यभारतांत प्रवेश होतो. हा रस्ता धुळें शहराच्या मध्य भागांतून जातो. या मार्गावरील वाढत्या वाहतुकीमुळें व शहरांतील पांझरा नदीवरील अरुंद पुलामुळें फार अपघात होतात. म्हणून हा रस्ता धुळें शहराच्या बाहेरून नेण्यांत येणार आहे. त्यासाठीं अदमासे १५ लक्ष रुपये खर्च येईल. पूर्वीं ह्या रस्त्यावरील डांबरी भागची रुंदी फक्त १० फूट होती व त्यामुळें वाहतुकीस फार अडथळा निर्माण होत असे. म्हणून त्याची रुंदी आतां १२ फूट करण्यांत आली आहे.

दुसरा राष्ट्रीय मार्ग धुळें-एदलाबाद-नागपूर हा होय. त्यांतील १२ मैलांचा भाग या जिल्ह्यां-तून जातो. हा रस्ता डांबरी असून पुरेसा रूंद आहे. पण ह्या रस्त्यावर फागणे व मुकटी येथें पूल

नसल्यामुळें फार त्रास होतो. म्हणून लवकरच येथें पूल बांधण्यांत येणार असून ही अडचणहि दूर करण्यांत येणार आहे.

राज मार्गः——जिल्ह्यांतून एकूण चार प्रमुख राजमार्ग जातात. ते पुढें दिले आहेत.

बऱ्हाणपूर-रावेर-शिरपूर-शहादा-तळोदा-सागबारा

ह्या रस्ता खडीचा करण्यांत येत असून तळोदा-अक्कलकुवा विभागांतील १२ मैलांच्या रस्त्यापैकीं १० मैलांचें काम साडेआठ लक्ष रुपये खर्च करून पार पडलें आहे. त्याचप्रमाणें शिरपूर-शहादा विभागांतील ३० मैलांच्या रत्यांपैकीं २४ मैलाचें काम पूर्ण झालें आहे. ह्यावर अदमासे ८ लक्ष रुपये खर्च करण्यांत आला. अक्कलकुवा-सागवार विभागांतील १२ मैलाचें काम मात्र अजून चालू आहे.

सुरत-धुळें रस्ता

ह्या रस्त्यावर पूल व मोऱ्या नसल्यामुळें वाहतुकीस अडथळा होतो. ह्या रस्त्यावरील नवापूर ते सोनगड हा ११ मैलांचा रस्ता ३ लक्ष रुपये खर्च करून बांधण्यांत आला आहे. ह्या रस्त्यावर रायगण, साकरथा, सोमनाथ ह्या ठिकाणीं पूल बांधण्यांत आले आहेत. शिवाय लहान मोऱ्या बांधण्याचें काम चालू आहे. या रस्त्यावदील १७ मैलांचा भाग डांबरी करण्यासाठीं घेतला असून १० मैलाचें काम पूर्ण झालें आहे. बाकी राहिलेलें काम व लहान मोऱ्या बांधण्याचें काम जोरांत चालू आहे.

धुळें-चाळीसगांव रस्ता

ह्या रस्त्यापैकी १९ मैलाचा भाग या जिल्ह्यांतून जातो. हा खडीचा रस्ता असून तो डांबरी करण्याकरितां घेतला आहे. हा रस्ता डांबरी करण्यांत आला असून त्यासाठीं अदमासे २ लक्ष रुपये खर्च करण्यांत आले आहेत.

तळोदा-नंदूरबार-साक्री-सटाणा

हा रस्ता स्टँडर्डच्या मानानें अरुंद असून त्यावर पूल व मोऱ्या बांधणें आवश्यक आहे. त्याशिवाय बाराहि महिने वाहतुक चालूं शकणार नाहीं. ह्या रस्त्यावर पिंपळनेरजवळ पूल बांधण्याचें काम जोरांत चालू आहे. हा रस्ता डांबरी करण्याचें काम चालू आहे.

जिल्हा मार्ग

वरील राजमार्गाशिवाय ह्या जिल्ह्यांत जिल्हा मार्ग व खेड्यांस जोडणारे बरेच रस्ते आहेत. ते वाढत्या वाहतुकीस योग्य व्हावेत म्हणून त्यांची सुधारणा करण्यांत येत आहे. आतांपर्यंत सुमारें १८ लक्ष रुपये खर्च करून जवळ जवळ १२४ मैलांचे जिल्हा मार्ग सुधारण्यांत आले. त्यांत कांहीं नवीन रस्तेहि तयार करण्यांत आले आहेत. त्यापैकी पुढील आठ महत्त्वाचे रस्ते होत.

दोंडाइचे-शहादा-खेतीया रस्ता, दोंडाइचे-विरदेल रस्ता, नंदूरबार-कोरीट रस्ता, आर्वी-हेंद्रुण-बोरकूंड-पाटोळा रस्ता, नवापूर-नारायणपूर रस्ता, कुसुंबा-मालेगांव रस्ता चिमठाणें-शेवाडे रस्ता व आष्टा-खांडबारा रस्ता.

याशिवाय दोन लक्ष पंधरा हजार रुपये खर्च करून सुमारें २० मैल लांबीचे लहान खेड्यांना जोडणारे रस्ते बांधकाम खात्यानें तयार केले. वर उल्लेखिलेले राजमार्ग डांबरी करण्याच्या कार्यक्रमाशिवाय खालील ८७ मैल लांबीचे रस्तेहि डांबरी करण्याचें काम चालू आहे. त्यासाठीं १४ लक्ष रुपये खर्च येईल.

दोंडाईचे-खेतीया नंदूरबार-साक्री सोनगीर-दोंडाईचे खानदेश-हैद्राबाद स्टेट बॉर्डर रोड शिरपूर-रावेर रोड

या जिल्ह्याच्या मध्य भागांतून तापी नदी पूर्व-पश्चिम वाहात जाते. त्यामुळें जिल्ह्याचे नैसर्गिक दोन भाग पडले आहेत. ह्या नदीवर दोन ठिकाणीं पूल बांधण्यांत आले आहेत. त्यापैकी

सेतु बंधन

साईक्स ब्रिज (सुकवदचा पूल) हा फार जुना आहे. १९५४ पर्यंत तापी नदीवरील ह्या जिल्ह्यांत हा एकमेव पूल होता. १६ सप्टेंबर १९५९ रोजीं तापीला आलेल्या महापुरामुळें ह्या पुलाचा शिरपूरकडील भाग कोसळला व मुंबई-आग्रा रोडवरील महत्त्वाचें दळणवळण तुटलें. तें तात्पुरते जोडण्याकरितां दाभाशीजवळ एक हंगामी पूल बांधण्यांत आला होता. परंतु पावसाळी हंगामांत त्याचा कांहींहि उपयोग झाला नसता; म्हणून रात्रंदिवस खपून हा पूल पूर्ववत् केला. त्यासाठीं ७लक्ष रुपये खर्च झाले आहेत.

तापीनदीवरील सारंगखेडे येथील पुलानें जिल्ह्याच्या प्रगतीचें दालन खुलें केले आहे. तापी

सारंगखेडा पूल

किनाऱ्यावरील शहादे, तळोदे, अक्राणी, अक्कलकुवा हे जे चार तालुके जिल्ह्याच्या प्रमुख विकसित भागापासून पावसाळ्यांत बाजूस पडत ते आज एकमेकास जोडले गेले आहेत. १९५३-५४ मध्यें ह्या पुलाच्या बांधकामास सुरवात करण्यांत आली व ६-१०-५७ रोजीं हा पूल वाहतुकीस खुला करण्यांत आला.

याशिवाय शिरपूरजवळील अरुणावती नदीवर ९ लक्ष रु. खर्च करून एक पूल बांधण्यांत येत आहे. त्याच प्रमाणें शहादे तालुक्यांतील लोणखेड गांवाजवळील गोमाई नदीवर अंदाजें साडे सात लाख रु. खर्चाच्या पुलासाठीं मंजूरी आली आहे. तेथील काम लवकरच सुरू होईल.

नंदूरबार-साक्री रस्त्यावरील राकी नदीवर एक व बुराई नदीवर एक असे दोन पूल बांधण्यांत येणार आहेत. सुरत-धुळें रोडवरील लोंढ्या नाल्यावरहि एक पूल व्हावयाचा आहे.

सामान्य जनतेच्या सोयीच्या दृष्टीनें व राज्यकारभाराकरितां आवश्यक आणि उपयुक्त अशा इमारतींचें बांधकाम जिल्ह्यांत सार्वजनिक बांधकाम खात्यामार्फत केलें जातें. आरोग्याच्या सोयीच्या दृष्टीनें बांधलेली धुळे येथील सिव्हिल हॉस्पिटलची इमारत रोग्यांच्या वाढत्या गर्दीमुळें

इमारतींचे बांधकाम

कमी पडत होती. ही अडचण दूर व्हावी म्हणून एक लक्ष एक हजार रुपये खर्च करून एक स्वतंत्र इमारत पूर्वीच्या दवाखान्याच्या आवारांत बांधण्यांत आली. धनुर्वात झालेल्या रोग्यांसाठीं ३०,००० रु. खर्च करून वॉर्ड बांधण्यांत आले. त्याच प्रमाणें नवापूर तालुक्यांतील विसरवाडी येथें एक दवाखान्याची इमारत बांधण्यांत

आली. शिरपूर तालुक्यांतील बोराडी ह्या गांवीं एक दवाखाना बांधण्यांत येत आहे. शिरपूर येथें एक कॉटेज हॉस्पिटलची इमारत बांधण्यांत येत असून त्यासाठीं अंदाजें ५ लक्ष रु. खर्च येणार आहे. धुळें शहरांत टेक्निकल स्कूलच्या आवारांतील जुन्या झालेल्या इमारतींच्या जीर्णोद्धाराचें कामहि ८७,५०० रु. खच करून पूर्ण झालें आहे. त्याच प्रमाणें गरूड हायस्कूलच्या इमारतीस लागन कर्मशियल वर्गासाठीं २८,००० रु. खर्च करून तीन खोल्या बांधण्यांत आल्या आहेत. जिल्ह्यांत कायदा व सुव्यवस्था यांची सांगड घालून लोकांच्या जीवितास व संपत्तीस संरक्षण देणाऱ्या पोलीस दलांतील कर्मचाऱ्यांची एके ठिकाणीं राहाण्याची सोय व्हावी म्हणून धुळें, नंदूरबार, नवापूर, शहादे येथें ४,७९,८०० रु. खर्च करून क्वार्टर्स बांधण्यांत आले. त्याचप्रमाणें धुळें, दोंडाईचे, धडगांव, अक्कलकुवा, नंदूरबार, तळोदे व साक्री येथें पोलीसांच्या इमारतींचीं १३,७३,४२२ रु. खर्चाचीं कामेंहि सुरूं झालीं.

धुळें येथें कोर्टाच्या आवारांत रेसिडेंट मॅजिस्ट्रेटसाठीं व साक्षीदारांना थांबण्यासाठीं ३०,५००रु. खर्चाची इमारत उभारण्यांत आली. नंदूरबार येथेंहि कोर्टाच्या जुन्या इमारतीस जोडून नवी इमारत ५३,४०० रु. खर्च करून बांधण्यांत आली. धुळें येथील जिल्हा तुरुंगाच्या आवारांत तेथील कर्मचाऱ्यांच्या सोयीसाठीं ९०,००० रु. खर्चाच्या इमारती बांधण्यांत आल्या आहेत.

त्याच प्रमाणें शेतकी फार्मवर शेतकी खात्यांतील कर्मचाऱ्यांसाठीं ३१,५०० रु. खर्च करून इमारती बांधण्यांत आल्या. दोंडाईचे, रनाळे व पळासनेर येथें गुरांचे दवाखाने बांधण्यांत येणार आहेत.

जिल्ह्यांतील तोरणमाळ या थंड हवेच्या ठिकाणीं हौशी प्रवाश्यांना राहाण्यासाठीं सहा कॉटेजेस बांधण्यांत आल्या असून आणखी सहाचें काम चालूं आहे.

दळणवळणाचीं साधनें

रेल्वे वाहतूक

जिल्ह्यांतून दोन रेल्वे मार्ग जातात. त्यापैकीं चाळीसगांव-धुळें हा सेंट्रल रेल्वेचा फाटा ३५ मैलांचा आहे. त्यावर धुळें, बोरविहिर, शिरुड हीं या जिल्ह्यांतील तीन स्टेशनें लागतात. भुसावळ-सुरत हा ताप्ती व्हॅली चा दुसरा रेल्वे मार्गाचा ९४ मैल लांबीचा भाग ह्या जिल्ह्यांतून जातो. त्यावर बेटावद, नरडाणें, शिंदखेडे, विरदेल, दोंडाईचे, रनाळे, तिसी, नंदूरबार, पाचोराबारी, खांडबारा खातगांव चिंचपाडा, नवापूर हीं १३ स्टेशनें लागतात.

रस्ते वाहतुक

पूर्वी जिल्ह्यांतील वाहतूक (रस्त्यावरची) केवळ नफ्यावर दृष्टि ठेवून धंदा करणाऱ्या व्यक्तींच्या हातीं होती. आपआपसांतील अनिष्ट चढाओढ व प्रवासाची रेल्वेसारखी अपुरी साधनें यामुळें प्रवाश्यांना फार त्रास होत असे तो दूर करण्याच्या उद्देशानें सरकारनें रस्ते वाहतुकीचे राष्ट्रीयीकरण करण्याचा निर्णय घेतला व बॉम्बे स्टेट रोड ट्रॅन्स्पोर्ट कॉर्पोरेशनची १९४८ मध्यें स्थापना केली व तिच्याकडे सरकारनें ताब्यांत घेतलेल्या मार्गावरील प्रवाश्यांच्या सोईचें काम सोंपविलें. १ मार्च १९५२ रोजीं ह्या जिल्ह्यांत एस्. टी. ची पहिली गाडी धावूं लागली. या वेळेस एस्. टी. च्या फक्त १९ गाड्या या जिल्ह्यांत होत्या.

यानंतर एस्. टी. चें कार्यक्षेत्र बरेंच वाढलें आणि १९६० अखेर या जिल्ह्यांतील गांवांतून सुरूं होणारे अथवा या जिल्ह्यांत संपणारे एस्. टी. चे ८२ मार्ग असून त्यावरून दररोज ६६ बसेस ८,०३४ मैल धांवतात व सुमारे वीस हजार उतारुंची दळणवळणाची गरज भागवितात. याशिवाय जिल्ह्यांतील गांवांत सुरूं होऊन दुसऱ्या जिल्ह्यांत जाणारे असे एस्. टी. चे ९ मार्ग आहेत. धुळें व जळगांव ह्या दोन जिल्ह्यांसाठीं एस्. टी. चा एक विभाग आहे. ह्या विभागाचें कार्यालय ह्या जिल्ह्यांतील प्रमुख शहर धुळें येथेंच आहे. याशिवाय विभागाचें वर्कशॉप देखील येथेंच आहे. त्यांत सर्व प्रकारचे लहान मोठे दुरुस्तीचें काम करतां यावे म्हणून आधुनिक यंत्रसामुग्री व दुरुस्तीचीं इतर साधनें आहेत. ह्या वर्क शॉपच्या सोयीसाठीं मोठी इमारत बांधली आहे. बसेसच्या ताबडतोब दुरुस्तीसाठीं ५ पथकें ठेवण्यांत आलीं आहेत. धुळें, नंदूरबार, शिरपूर, साक्री, शहादा ह्या ठिकाणीं एस्. टी. चे डेपो आहेत. प्रवाश्यांच्या सोयीसाठीं एस् टी. कॉर्पोरेशननें बस स्टँड, पिक-अप स्टँड, विश्रांतिगृहें, उपहारगृहें, संडास, मुताऱ्या, पाणी पिण्याच्य सोयी व इतर सोयी बऱ्याच ठिकाणीं केल्या आहेत. वर्षांतून दोनदा स्थानिक मागणीनुसार व रेल्वेचें वेळापत्रक लक्षांत घेऊन लोकांच्या मागणीप्रमाणें एस्. टी. च्या वेळापत्रकांत थोडाफार बदल करण्यांत येतो.

११. स्वास्थ्य आणि वैद्यकीय चिकित्सा

जिल्ह्यांतील रहिवाशांचें सर्वसाधारण आरोग्य त्यांच्या आरोग्यदायी आणि आरोग्यविघातक संवयी कशा व कोणत्या यावर अवलंबून असते. ह्या जिल्ह्यांतील अक्कलकुवा, धडगांव, नवापूर व साक्री तालुक्यांत आदिवासींतून खरूज, नायटे वगैरे त्वचेचे रोग जास्त प्रमाणांत आढळतात. ह्याची कारणें शारीरिक अस्वच्छता व जीवनसत्त्वांचा आहारांतील अभाव ही होय. सर्वसाधारण समाजांत बऱ्याच प्रमाणांत आरोग्यविघातक संवयी आढळून येतात. देवीची सांथ दैवी कोप समजून लपवून ठेवतात. डी. डी. टी. फवाऱ्याच्या वेळीं बऱ्याच ठिकाणीं विरोध करण्यांत येतो. कॉलरा वगैरे-सारख्या साथींच्या वेळीं प्रतिबंधक लस स्वेच्छेनें फार थोडे लोक टोचून घेतात. जिल्ह्यांतील बराचसा भाग जंगलव्याप्त असल्यामुळें मागासलेला आहे. त्यामुळें आरोग्यदायी जीवनाची लोकांना कल्पना नाहीं. संडास व मुतारीचा वापर खेड्यांतून मुळींच होत नाहीं. जीं गांवें नदीकांठीं आहेत तेथें नदीच्या पाण्याचा उपयोग पिण्यासाठीं करण्यांत येतो. त्याचप्रमाणें कांहीं गांवांत अजूनहि पायऱ्याच्या विहिरींचा वापर होत असलेला पाहावयास मिळतो. तरीसुद्धां नैसर्गिकरीत्या मोकळी हवा व एकमेकापासून दूर राहाण्याची संवय असल्यामुळें आपोआप आरोग्य सुरक्षित राहाते. त्याचप्रमाणें दूरदूर घरें करून राहाण्याच्या सवयीमुळें रोगाचा फारसा प्रसार होत नाहीं.

या जिल्ह्यांत जनतेच्या आरोग्याचें संरक्षण, संवर्धन आणि उपचाराचें काम सार्वजनिक आरोग्य खात्याच्या मार्फत दोन प्रकारांनीं केलें जातें. एक म्हणजे सामुदायिक आरोग्य चांगलें व सुदृढ राहावे म्हणून प्रतिबंधक उपाययोजना आणि दुसरा म्हणजे जिल्ह्यांत ठिकठिकाणीं दवाखानें व इस्पितळें उघडून रोग पिडितांची उपचारव्यवस्था करणें. सार्वजनिक आरोग्य खात्याच्या मार्गदर्शनाखालीं ग्रामीण विभागापर्यंत जनतेच्या आरोग्याची काळजी स्थानिक संस्था व ग्रामपंचायतीहि घेत असतात. या जिल्ह्यां-तील आरोग्याधिकाऱ्याची कचेरी धुळ्यास असून जिल्ह्याचे सिव्हिल सर्जन देखील धुळ्यासच असतात.

उपचार व्यवस्था

वैद्यकीय मदत मिळावी म्हणून धुळें येथें एक सिव्हिल हॉस्पिटल असून खुद्द सिव्हिल-सर्जन त्याचें काम पाहातात. त्यांच्या हाताखाली ४ डॉक्टर्स मदतनीस म्हणून देण्यांत आले आहेत. शिवाय धुळें येथील ६ खाजगी डॉक्टर्स सिव्हिल हॉस्पिटलच्या रोजच्या कार्यांत कांहीं तास विनामूल्य मदत करतात. सिव्हिल हॉस्पिटलमध्यें रोग्यांसाठीं ७० खाटांची सोय आहे. त्याचप्रमाणें क्ष किरणाची सोय आहे. वर्षांतून ह्या हॉस्पिटलमध्यें लहान मोठी जवळ जवळ एक हजार तरी ऑपरेशन्स पार पडतात. ह्या हॉस्पिटलमध्यें एक प्रयोग शाळा देखील आहे. सिव्हिल हॉस्पिटल व्यतिरिक्त जिल्ह्यांत ३ सरकारी, ८ नगरपालिकेचे, ५ जिल्हा लोकल बोर्डाचे असे १६ दवाखाने व ३१ एस्. एम्. पी. सेंटर्स, व २५ उपदवाखाने आहेत. ह्या जिल्ह्यांत खाजगी दवाखाने जवळ जवळ ७० आहेत. ह्या सर्व

दवाखान्यांतून रोग्यांसाठीं २३० खाटांची सोय आहे. सर्व तालुक्यांच्या मुख्य ठिकाणीं दवाखान्याची सोय करण्यांत आली आहे. त्यापैकीं धुळें येथील तीन आणि नंदूरबार व नवापूर मिळून एकूण ५ ठिकाणीं मोठ्या ऑपरेशनची व्यवस्था आहे. जिल्ह्यांतील ४ ते ४॥ लाख लोक वरील दवाखान्यांचा दरवर्षी फायदा घेतात. धुळें येथील सिव्हिल हॉस्पिटलला एक ॲम्ब्युलन्स देण्यांत आली असून त्यामुळें दूरवरच्या गंभीर स्थितींतील रोग्यांना हॉस्पिटलमध्यें आणणें सोयीचें झालें आहे. या जिल्ह्यांत तीन फिरते दवाखानेहि ठेवण्यांत आले आहेत.

जिल्ह्यांत वैद्यकीय व्यवसाय करणारे एकूण २२३ लोक आहेत. त्यांचें प्रमाण ५ हजार लोकसंख्येस एक डॉक्टर असें पडते. परंतु वैद्यकीय व्यवसाय करणारे लोक शहरांतून जास्त प्रमाणांत असल्याने हें प्रमाण शहरांतून ३००० लोकसंख्येस एक डॉक्टर असें पडते. तेंच खेडेगांवांतून १२ ते १३ हजारांस एक डॉक्टर असें आहे.

प्राथमिक आरोग्य केंद्रें

आरोग्यविषयक सेवा कार्यक्रमांतील महत्त्वाची गोष्ट म्हणजे प्राथमिक आरोग्य पथकें, प्रसूतिगृहें व बाल आरोग्य केंद्रें यांची स्थापना ही होय. भारत सरकारनें नेमलेल्या भोरे कमिटीनें अशी शिफारस केली आहे की राज्य जिल्हा आणि तालुका पातळीवरील प्रतिबंधक व निवारक अशा दोन्हीं योजनांचें एकत्रीकरण करण्यांत यावें. या शिफारसी अंमलांत आणण्याच्या दृष्टीनें पहिलें पाऊल म्हणून प्राथमिक आरोग्य पथकें स्थापन करण्याची योजना सुरू झाली. या योजनेनुसार ह्या जिल्ह्यांत शहादा, धडगांव आणि साक्री तालुक्यांतील निझामपूर व दहिवेल येथें अशी ४ प्राथमिक आरोग्य केंद्रें स्थापन करण्यांत आलीं आहेत. ह्या योजनेचा फायदा जवळ जवळ एक लाख लोकसंख्येस होतो. १९६१ अखेर अशीं एकूण आठ केंद्रें स्थापन करण्यांत येतील. प्राथमिक आरोग्य केंद्र ही क्लिनिक्सच्या स्वरूपाची असून २० खेड्यांच्या सुमारें ६०,००० लोकसंख्येमागें एक केंद्र ठेवण्यांत आलें आहे. ह्या केंद्रामध्यें डॉक्टर, मिडवाइव्हज्, परिचारिका व हेल्थ व्हिजिटर्स असून प्रत्येक केंद्राचीं तीन उपकेंद्रें असतात. प्रमुख केंद्रांत एक कुटुंब नियोजन केंद्र, प्रसूतिविषयक क्लिनिक व एक बालकल्याण केंद्र असते. माता व बालसंगोपन केंद्रें साक्री व पिंपळनेर येथें असून त्यांचा २० हजार लोकसंख्येला फायदा होतो.

कुटुंब नियोजन

वाढती लोकसंख्या ही देशासमोरील एक मोठी समस्या होय. त्यासाठीं राज्यांत कुटुंबनियोजनाचें कार्य जोरानें चालू आहे. जिल्ह्यांत धुळें, शहादा, धडगांव, पिंपळनेर, दहिवेल, निझामपूर येथें अशी सहा कुटुंबनियोजन केंद्रें कार्य करीत असून धुळें शहरांतील कुटुंब नियोजन केंद्र नगरपालिकेमार्फत चालविलें जातें. ह्या केंद्रामार्फत हजारों लोकांना कुटुंब नियोजनासंबंधींची माहिती करून देण्यांत येत आहे. गेल्या वर्षीं झालेल्या शस्त्रक्रिया शिबिरांत जवळजवळ १०० लोकांनीं संतती प्रतिबंधक शस्त्रक्रिया करून घेतल्या व नुकत्याच जिल्ह्यांत शहादा, पिंपळनेर, धुळें येथें झालेल्या शस्त्रक्रिया शिबिरांत ११३ इसमांनीं स्वेच्छेनें संतती प्रतिबंधक शस्त्रक्रिया करून घेतली आहे. खेडें विभागांतील लोकांत या विषयासंबंधी माहिती मिळविण्याची उत्सुकता दिसून येते.

जिल्ह्यांतील बहुतेक मोठ्या दवाखान्यांतून स्त्रियांसाठीं खास व्यवस्था असून प्रसूतिचाहि विभाग अकरा दवाखान्यांस जोडण्यांत आला आहे. त्यांत प्रसूतीनंतर व प्रसूतिपूर्वी तसेंच बालआरोग्य सुधारणा या बाबत सल्ला देण्यांत येतो. धुळें सिव्हिल हॉस्पिटलमध्यें एक प्रसूति विभाग असून

दरमहा सुमारें ५० बाळंतपणें येथें करण्यांत येतात. शिवाय या जिल्ह्यांत खाजगी अशी १५ प्रसूतिगृहें असून खाटांची संख्या ८७ आहे.

कॉटेज हॉस्पिटल

जिल्ह्यांत शिरपूर व दोंडाईचे या ठिकाणीं अशी दोन कॉटेज हॉस्पिटल्स सरकारी मालकीची आहेत. त्यांच्या इमारतींचें बांधकाम जोरांत सुरू आहे. दोंडाईचे येथील हॉस्पिटलची इमारत तयार झाली आहे. सदर हॉस्पिटल तेथील नगर-पालिकेमार्फत चालविलें जाणार आहे.

प्रतिबंधक उपाययोजना

जिल्हा आरोग्याधिकारी हे रोग प्रतिबंधक उपाययोजनेचे प्रमुख असून शहरी व ग्रामीण भागांतील सर्वसामान्य आरोग्याबाबतची परिस्थिति, यात्रा व उत्सव प्रसंगीं आरोग्याची व्यवस्था, सांथींच्या रोगांचा प्रादुर्भाव झाल्यास त्यांचा प्रतिबंध करणें आदि महत्त्वाचीं कामें त्यांच्याकडे असतात. यासाठीं त्यांच्या हाताखालीं सांथीच्या रोगांचे आरोग्याधिकारी व नर्सेस फिल्ड वर्कर्स, सॅनिटरी इन्स्पेक्टर्स असा फार मोठा नोकरवर्ग असतो. या जिल्ह्यांत ३२ व्हॅक्सिनेटर्स असून ते सांथीच्या काळांत देवीप्रतिबंधक लस टोंचण्याचें कार्य करीत असतात.

जिल्ह्यांतील सॅनिटरी पथकें

सांथीच्या काळांत आरोग्य पथकें घरें, मलमूत्र, विहिरी, रोग्यांचे कपडे वगैरे जंतुरहित करतात व सर्व साधारण काळांत विहिरी जंतुरहित करण्यासाठीं औषधें टाकणें, रस्ते साफ करणें, मलमूत्र व काडी कचऱ्याचे कंपोस्ट बनविणें व ग्रामीण जनतेला आरोग्य-विषयक संवयी लावण्याचें काम करतात. प्रत्येक पथकांत एक मुकादम व तीन मजूर असतात. ग्रामीण भागांत स्वच्छता राखण्यासाठीं उपाय-योजना करणें; घरें, रस्तें, पाणवठे यांची स्वच्छता ठेवणें; केरकचरा व मलमूत्र यांचा खतें बनविण्याकडे उपयोग करणें; जनतेस प्रात्यक्षिकांद्वारें शिक्षण देणें इ. कामांची जबाबदारी जिल्ह्यांतील सॅनिटरी इन्स्पेक्टर्सवर असते. त्याप्रमाणें जन्ममृत्युच्या नोंदी तपासणें, स्वच्छतेच्या दृष्टीनें खानावळी व हॉटेल्स तपासणें व साथींच्या वेळीं रोगप्रतिबंधक उपाययोजना करण्याचीं कामेंहि त्यांना करावीं लागतात.

याशिवाय जिल्हा आरोग्याधिकारी शाळेंतील मुलांच्या आरोग्याचीहि तपासणी करतात. तसेंच कारखाने, गिरण्या, सिनेमागृहें, पाणीपुरवठ्याच्या जागा आदींची स्वास्थ्यदृष्टीनें पाहाणी करून सल्ला देतात.

कुष्ठ रोग प्रतिबंध

ह्या जिल्ह्यांत कुष्ठरोगाचें प्रमाण साधारणपणे सरासरी ०.२ ते ०.३ टक्के आढळून येतें. साक्री येथें या बाबतींत पाहणी व उपचार करण्यासाठीं एक केंद्र उघडण्यांत आलें आहे. त्याच्यावर एक असिस्टंट नेमण्यांत आला आहे. तसेंच धुळें येथें अशा प्रकारचे केंद्र उघडण्यास मंजुरी देण्यांत आली आहे. एक बिन सरकारी प्रचारक नेमण्यांत आला आहे. व तो ह्यासंबंधी प्रचार कार्य करतो. जिल्हा व तालुका शेंड्ळेंखदतायववांस्पनेमधून कुष्ठरोग्यांवर उपचाराची व्यवस्था करण्यांत आली आहे.

परिचारिकांचें शिक्षण

नर्सेसना शिक्षण देण्यासाठीं धुळें येथील सिव्हिल हॉस्पिटलमध्यें सोय आहे. ह्या वर्षीं ह्या कोर्सला २३ विद्यार्थिनी आल्या होत्या.

पाणीपुरवठा योजना

नगरपालिकेच्या पाणीपुरवठा योजना सार्वजनिक आरोग्य खात्याच्या कार्यापैकींच असल्यामुळें त्यांचाहि निर्देश करणें जरूर आहे. या बाबत सांगावयाचे म्हणजे जिल्ह्यांत अशा प्रकारच्या योजनांचीं कामें चालूअसून स्थानिक संस्थांना ह्या कामां-वरील खर्चासाठीं कर्ज व अनुदान हीं दिलीं जातात.

ग्रामीण विभागांना पाणीपुरवठा करण्याची योजना पहिल्या पंचवार्षिक योजनेंत समाविष्ट करण्यांत आली. या योजनेंत विहिरी, व तळीं बांधणें व स्वच्छ ठेवणें या सारखीं कामें व नळांद्वारें पाणीपुरवठा करण्याची खास व्यवस्था समाविष्ट करण्यांत आली आहे. प्रत्येक खेड्यांत पिण्याच्या पाण्याची एक तरी विहीर असावी असें सरकारचें धोरण आहे. म्हणून खेड्यांतील पहिली विहीर सरकार आपल्या खर्चानें खोदून देते व नंतरच्या जादा विहिरींसाठीं सरकार कमीत कमी एकूण खर्चाच्या २५ टक्के मदत देते. ही मदत दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या कालांत चालू ठेवण्यांत आली असून त्यासाठीं ब्लॉक्सची तरतूद करण्यांत आली आहे.

रेडक्रॉस

रेडक्रॉस संस्थेची या जिल्ह्यांतील शाखा १९२३ सालीं स्थापन झाली. बालसंगोपन, प्रसूतिपूर्व उपचार, अल्ट्राव्हायोलेट लाईट देणें, कुटुंब नियोजनाच्या कामीं आरोग्य विषयक प्रचारकार्य ह्या संस्थेमार्फत केलें जातें. ह्या संस्थेमार्फत चष्मा बँक नांवाची नवी योजना सुरू करण्यांत आली आहे. त्यांत जुने चष्मे गोळा करून गरजू अशा गरीब लोकांचे डोळे तपासून त्यांस मोफत चष्में वाटण्यांत येतात व लहान ऑपरेशन्सदेखील मोफत करण्यांत येतात.

मलेरिया प्रतिबंधक व निर्मूलन कार्य

१९४८-४९ सालीं झालेल्या पाहाणीवरून हा जिल्हा हिंवतापानें पीडित असल्याचें सिद्ध झालें. म्हणूनच १९५० सालापासून या जिल्ह्यांत हिंवताप प्रतिबंधक योजनेस सुरवात झाली. १९५३ मध्यें राष्ट्रीय हिंवताप प्रतिबंधक कार्यक्रमानुसार जिल्ह्याची चार उपविभागांत वांटणी झाली. ती १९५८ पर्यंत तशीच अस्तित्वांत होती. अवघड आणि विस्तृत अशा धडगांव भागांतहि १९५९ साली पांचवा उपविभाग उघडण्यांत आला आणि महाराष्ट्र राज्याची स्थापना झाल्यावर १९६० मध्यें कांहीं गांवें गुजरांत राज्यांत गेल्यामुळें पुन्हां उपविभागांत बदल करण्यांत आले. त्याचप्रमाणें हल्ली जिल्ह्यांत धुळें (धुळे-शिंदखेडा), शहादा (शहादा-शिरपूर), धडगांव (अक्राणी महाल-काठी), नंदूरबार (तळोदा-अक्कलकुवा), साक्री (साक्री-नवापूर) असे कामाच्या सोयीच्या दृष्टीनें उपविभाग पाडण्यांत आले आहेत. या जिल्ह्यांतील रोगप्रसाराचा काळ मुख्यत्वें पावसाळ्यांत म्हणजे जुलै ते डिसेंबर होय. १९५० सालापासून या जिल्ह्यांतील सर्व गांवांतील घरें-गोठें हीं डी. डी. टी. नें जून ते ऑक्टोबर या महिन्यांत फवारली जाऊ लागली आहेत. नियमित डी. डी. टी. फवारल्याने हिंवताप खूपच कमी झाला आहे हे पुढील आंकड्यांवरून निदर्शनास येईल. डी. डी. टी. फवारण्यापूर्वीं १९४८ सालीं ९ सरकारी दवाखान्यांतून एकूण ७३,६७९ रोग्यांपैकीं १६,२६५ रोगी हिंवतापानें पछाडलेले दिसून आले. उलट-पक्षीं १९४९ सालीं त्याच दवाखान्यांतून एकूण ८६,८०७ रोग्यांपैकीं १,८००च रोगी हिंवतापानें पछाडलेले होते. म्हणजे १९४८ साली जें प्रमाण शेकडा २२ होते तें १९५९ मध्यें २.०७ टक्क्या पर्यंत आल्याचें दिसून आलें. त्याचप्रमाणें प्लीहाचें १९४८ मधील प्रमाण ३४.९ टक्के होते. तें १९६० साली ०.६९ टक्क्या पर्यंत आले. त्याचप्रमाणें मुलें व अर्भकें यामधील रोगांच्या व हिंवतापाने झालेल्या


मृत्यूच्या प्रमाणांत फरक दिसून येतो. १९४८ सालीं ५३९० रोगी हिंवतापानें मेले तर १९५९ साली २१२ ची नोंद झाली. म्हणजे हिंवतापानें मृत्यचें प्रमाण ५.३१ वरून ०.२ पर्यंत खाली आले.

राष्ट्रीय हिंवताप प्रतिबंधक कार्यानें केवळ मलेरियाचाच प्रतिबंध झाला असे नव्हे तर इतरहि कीटकांपासून होणारे रोग कमी झाले. या जिल्ह्यांत डी. डी. टी. फवारण्याची सुरुवात झाल्यापासून प्लेगचें समूळ उच्चाटन झालें आहे. हगवण, आव वगैरेंचें प्रमाण बऱ्याच अंशी कमी झालें आहे.

१९५७ मध्यें मलेरियाचें संपूर्णतः उच्चाटन करण्याची योजना व कार्यक्रम आंखण्यांत आला व योजनेच्या कार्यक्रमानुसार जिल्ह्याच्या सर्व तालुक्यांतून प्रत्येक घरीं डी. डी. टी. फवारण्याचें काम सुरूं करण्यांत आलें. या कामाकरितां अधिक नोकरवर्ग मिळाला असून मलेरियानिर्मूलन अधिकाऱ्यांकरितां धुळें येथें स्वतंत्र कचेरी सुरूं करण्यांत आली आहे.

मलेरियानिर्मूलन योजनेंतील दुसरा महत्त्वाचा भाग म्हणजे मलेरिया खात्याचे नोकर महिन्यांतून दोनदां त्यांना नेमून दिलेल्या विभागांतील प्रत्येक घरास भेट देतात आणि तापासंबंधी चौकशी करतात. चौकशींत एखाद्यास ताप आल्याचें किंवा येऊन गेल्याचें समजल्यास ते त्या माणसाचे रक्त तपासण्यास नेतात आणि रक्तांत मलेरियाचे जंतु आढळून आल्यास रोग्यास औषध देण्याची वेगळी व्यवस्था करतात. ह्या औषधोपचारासाठीं पैसे घेतले जात नाहींत.

शैक्षणिक प्रगति



पाडळदें
तळोदें
शहादें
प्रकाशें
बोरडी
रनाळें
नंदुरबार
खांडबारा
दोंडाईचें
शिरपूर
थाळनेर
शिंदखेडें
नवापूर
छडवेल कोर्डे
चिमठाणें
नरडाणे
बेटावद
निजामपूर
बोरीस
बुईझड
सोनगीर
नेर
कुसुंबें
कापडणे
पिंपळनेर
साक्री
देवपूर
कासार
धुळें
बोरविहीर
शिरुड
दुय्यम शाळा
शेतकी शाळा, महाविद्यालयें व संशोधन केन्द्रें

१२. शैक्षणिक प्रगतीची वाटचाल

इ. स. च्या १२-१३ व्या शतकापासून १८ व्या शतकापर्यंतच्या धामधुमीच्या काळांत कुणाहि राज्यकर्त्याला जनतेच्या शिक्षणाकडे लक्ष देण्यास वेळ मिळाला नाहीं. परंतु इंग्रजांचें आसन स्थिर झाल्यावर या जिल्ह्यांत व्हर्नाक्युलर शाळांची स्थापना करण्यांत आली. पण स्वातंत्र्यपूर्व काला-पर्यंत ह्यांत विशेष प्रगति झाली नाहीं. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर मात्र विविध योजनांद्वारें शिक्षणाची प्रगति झपाटयानें होऊं लागली.

प्राथमिक शिक्षण

१९४७ सालामध्यें सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा कायदा झाला. त्यानुसार १,००० लोक-संख्येच्या प्रत्येक गांवांत मोफत व सक्तीचें शिक्षण सुरूं करण्यांत आलें. त्याच्याहि पुढें जाऊन ह्या काय-द्यांत १९५४ मध्यें दुरुस्ती करण्यांत येऊन ही सवलत ५०० पेक्षां कमी वस्तीच्या खेडयांस लागू करण्यांत आलीं. आज ह्या जिल्ह्यांत प्राथमिक शिक्षणाच्या एकूण ११६३ शाळा असून त्यापैकीं २८ म्युनिसिपल स्कूल बोर्डाच्या व ११३५ जिल्हा स्कूल बोर्डाच्या आहेत. त्यांत एकूण १,३९,९७७ विद्यार्थी शिक्षण घेत असून त्यापैकीं ४१,५५८ मुली २६ शाळांमधून शिक्षण घेत आहेत. मागासलेल्या विद्यार्थ्यांची संख्या ४७,७७४ आहे. प्राथमिक शिक्षणावर एकूण ५९,९६,३११ रु. खर्च होत असून ह्यांत सरकारचा वांटा ५४,४९,१६७ रु. चा आहे. ह्या प्राथमिक शाळांमधून ४,०१७ शिक्षक विद्यार्थ्यांना विद्यादान करीत आहेत. यापैकी जिल्हा स्कूल बोर्ड शाळांतील प्रशिक्षित शिक्षकांची संख्या २,७७४ आहे.

प्राथमिक शिक्षण महाविद्यालयें

प्राथमिक शिक्षणाच्या प्रसाराबरोबरच प्रशिक्षित शिक्षकांची वाण भासू नये ह्याकरितां ह्या जिल्ह्यांत दोन प्रशिक्षण महाविद्यालयें स्थापन केलीं गेलीं. यापैकीं एक सरकारी म्हणजे गव्ह. प्रायमरी ट्रेनिंग कॉलेज व दुसरे आघाव प्रायमरी ट्रेनिंग कॉलेज. हें खाजगी आहे. मूलोद्योग शिक्षण पद्धतीवर ह्या संस्थांची पुनर्रचना करण्याच्या सरकारी धोरणानुसार घरगुती व्यवसायाचें प्रशिक्षण यांतून देण्यांत येते. ट्रेनिंग कॉलेजमधील शिक्षणांत प्रगतीच्या दृष्टीनें पुढील प्रमाणें बदल करण्यांत आले.

१. बिगर सरकारी ट्रेनिंग कॉलेजेसना मिळणारी मदत ५० टक्क्यापासून ६६$\frac{2}{3}$ टक्क्यांपर्यंत वाढविण्यांत आली.

२. स्कूलबोर्डाकडील शिक्षण व मागासलेल्या वर्गांतील विद्यार्थ्यांच्या खाजगी कॉलेजांतील शिक्षण फी दरवर्षी ६० रु. पासून ७२ रु. पर्यंत वाढविण्यांत आली.

३. प्रायमरी ट्रेनिंग कॉलेजसाठीं नवा अभ्यासक्रम तयार करण्यांत आला असून पी. एस्. सी. व एस्. एस्. सी. साठीं वेगवेगळा अभ्यासक्रम दोन वर्षें मुदतीचा करण्यांत आला. तो जून १९५६ पासून अंमलांत आणला जात आहे.

४. सन १९५६ पासून खाजगी ट्रेनिंग कॉलेजेसमधील ६० टक्के जागा स्कूल बोर्डाकडून पाठविण्यांत येणाऱ्या शिक्षकांसाठीं राखून ठेवल्या जात आहेत.

मूलोद्योग

मूलोद्योग शिक्षणपद्धतीनुसार शिक्षणाच्या विकासाचें उद्दिष्ट डोळ्यापुढें ठेवून ही योजना १९४९ सालीं कार्यान्वित करण्यांत आली. आज मितीस सूतकताई, विणकाम, बागायती, शेती, पुठ्ठाकाम, सुतारकाम ह्यांचा या शिक्षणांत समावेश आहे. जिल्ह्यांत सध्या मूलोद्योगाच्या २२३ शाळा असून त्यांत १,७७३ शिक्षक ५८,७९६ विद्यार्थ्यांना शिक्षण देत आहेत. ह्या शिक्षणावर ८६,३७४ रु. खर्च होत आहे. जिल्ह्यांत सध्या संपूर्णतः कताईच्या ५२, कताई व शिवणकामाच्या १२७, बागाईत व शेतीच्या २९ व पुठ्ठाकाम व सुतारकामाच्या १५ शाळा सुरू आहेत. ह्या शाळांतील एकूण शिक्षकांपैकी १२३९ शिक्षक प्रशिक्षित आहेत आणि शाळांतून घरगुती व्यवसायाचें सामानहि मुबलक प्रमाणांत आहे.

शालेय इमारती

शिक्षणासाठीं अत्यंत आवश्यक बाबी म्हणजे शालेय इमारती. ह्यासाठीं जुन्या इमारती वाढविणें किंवा नव्या बांधणें आवश्यक आहे. हें काम जिल्हा स्कूल बिल्डिंग कमिटीकडे सोपविण्यांत आलें असून त्यासाठीं सरकार पैसा देते. जनतेच्या साहाय्यानेंहि विकास योजनेमध्यें शाळा इमारतीचें बांधकाम केलें जातें. आतांपर्यंत स्कूल बोर्डाच्या मालकीच्या ३२१ इमारती असून ५०४ भाड्यानें घेतल्या आहेत, ८८७ इमारतींवर भाडे आकारले जात नाहीं. तरी ह्या इमारती विद्यार्थ्यांच्या गरजा भागविण्यास अपुऱ्या पडत असल्यामुळें सकाळीं व दुपारीं शाळांच्या दोन पाळ्या भरविल्या जातात.

दुय्यम शिक्षण

पूर्वीच्या मुंबई राज्यांतील दुय्यम शिक्षण मुख्यत्वे खाजगी संस्थांनींच चालविलें आहे. सरकारनें केवळ मार्गदर्शनात्मक जबाबदारीच उचलली होती. ही जबाबदारी मदत, नियतकालिक तपासणी, शैक्षणिक दर्जा सुधारण्याच्या दृष्टीनें सूचना व दुय्यम शिक्षकांचे पगार इत्यादि मार्गानें पार पाडण्यांत आली. घाटे-परुळेकर कमिटी या नांवानें प्रसिद्ध असलेल्या सेकंडरी स्कूल्स कमिटीच्या शिफारशीची अंमलबजावणी करून राज्यांतील दुय्यम शिक्षणाला उत्तेजन देण्याच्या दृष्टीनें पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत महत्त्वाचें पाऊल टाकण्यांत आलें. खाजगी शाळांना मिळणाऱ्या मदतीमध्यें नागरी विभागांत संमत खर्चाच्या ३० टक्के व ग्रामीण विभागांत ३३$\frac{1}{3}$ टक्के याप्रमाणें दुरुस्ती करण्यांत आली. दुय्यम शिक्षण सुधारण्याच्या दृष्टीनें टाकण्यांत आलेलें दुसरें महत्त्वाचें पाऊल म्हणजे या शाळांतील शिक्षणक्रम वेगवेगळे करण्यांत आले. त्यासाठीं सरकारी व खाजगी दुय्यम शाळांचें रूपांतर बहुउद्देशीय शाळांत करण्यांत येऊन तांत्रिक शिक्षण देणाऱ्या शाळांची सोय करण्यांत आली.

या जिल्ह्यांत गेल्या कांहीं वर्षांत दुय्यम शिक्षणांत झपाट्यानें प्रगति झाली आहे. सरकारकडून सढळपणें मिळणाऱ्या मदतीमुळें १९६० मध्यें दुय्यम शाळांची संख्या ४६ पर्यंत वाढली. ह्यांत एक सरकारी दुय्यम शाळाहि आहे. ह्या दुय्यम शाळांत एकूण ११,६९३ विद्यार्थी असून शिक्षकांची

संख्या ४९० आहे. दुय्यम शिक्षणावर एकूण २३,०२,८४९ रु. खर्च होत असून सरकारचा वांटा ५०८,३७३ रु. चा आहे. आर्थिक दृष्टचा मागासलेल्या विद्यार्थ्यांना फी माफ करण्याच्या योजनेचा फायदा देण्याच्या दृष्टीनें सरकारला २,९०,४९७ रु. ची रक्कम द्यावी लागते. जून १९५३ साली धुळें येथें पदवीधरांचें एक बेसिक ट्रेनिंग कॉलेज सुरू करण्यांत आलें. येथें पदवीधर दुय्यम शिक्षकांना बी. टी. च्या कोर्सचें शिक्षण दिलें जातें. शिवाय मूलोद्योग, कताई-विणकाम, शेती, सुतार काम व्यायाम, संमेलनें, नाटकें, शिबिरें आदि कॉलेजमध्यें विद्यार्थ्यांच्या फायद्यासाठीं करण्यांत येतात.

दुय्यम शिक्षण सुधारणेचा २ ऱ्या पंचवार्षिक योजनेंतील कार्यक्रम पहिल्या पंचवार्षिक योजनें-तील कार्यक्रमाप्रमाणेंच आहे. ज्या अधिक सवलती देण्यांत आल्या त्यामध्यें जादा स्कॉलरशिप्स, फ्री-स्टुडंट शिप्स, परत फेडीच्या स्कॉरलशिप्स, वसतिगृहांची व्यवस्था, क्रीडांगण, धंदेशिक्षण शाळा इत्यादींचा समावेश आहे. हा विकास कार्यक्रम बऱ्याच प्रमाणांत अंमलांत आणला गेला. विद्यार्थ्यांना आर्थिक व इतर साहाय्य दिलें जात आहे.

तांत्रिक शिक्षण

तांत्रिक शिक्षणाच्या सोयीसाठीं धुळें येथें एक टेक्निकल हायस्कूल असून त्यांत मेकॅनिकल इंजिनियरिंग, टर्नर, फीटर, कारपेंटरी, मिस्तरी, हँडलूम विव्हिंग, वायरमन व इलेक्ट्रिशियन इ. विषयांचें धंदेशिक्षण दिलें जातें. ह्या शाळत एकूण ७२२ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. त्याचप्रमाणें कमलाबाई गर्ल्स हायस्कूलचें बहुउद्देशीय हायस्कूल-मध्यें रूपांतर करण्यांत आलें असून येथें गृहशास्त्र हा मुख्य विषय आहे. मुलींकरितां व्यावसायिक शिक्षणाची सोय या शाळेमुळें झाली आहे.

उच्च शिक्षण

कॉलेजच्या शिक्षणाची व्यवस्था धुळें येथें पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत एक आर्टस् व सायन्स कॉलेज उघडून करण्यांत आली आहे. ह्याची विद्यार्थी संख्या १,००० आहे. याशिवाय डिप्लोमाचा अभ्यासक्रम शिकविणारे एक इंजिनियरिंग कॉलेजहि सुरूं करण्यांत आलें. धुळें येथें शेतकी कॉलेज २० जुलै १९६० पासून सुरूं झालें असून सध्यां शेतकी शाळेंतच भरत आहे. प्रात्यक्षिकांसाठीं आर्टस् अँड सायन्स कॉलेजच्या प्रयोग शाळेचाच उपयोग केला जातो. त्याचप्रमाणें ह्या कॉलेजच्या ३० विद्यार्थ्यांची राहाण्याची सोय आर्टस् आणि सायन्स कॉलेजच्या वसतिगृहांत करण्यांत आली आहे. कॉलेजमध्यें यंदा ५० विद्यार्थ्यांस प्रवेश देण्यांत आला आहे. कॉलेजच्या उपयोगासाठीं लवकरच ३७३ एकर जमीन ताब्यांत घेण्यांत येणार आहे.

वाचनालयें

या जिल्ह्यांत १९७ ग्राम-वाचनालयें, ८८ फिरती वाचनालयें, ७ तालुका वाचनालयें व १८ सामुदायिक केंद्रें आहेत. यापैकीं १४ समाज शिक्षण केंद्रें आहेत. येथें एक बहिःशाल व्याख्यानमालेचें केंन्द्रहि आहे. जिल्ह्यांतील ग्राम-वाचनालयांना राज्य सरकारची मदत जिल्हा एज्युकेशनल इन्स्पेक्टर ह्यांच्यामार्फत व तालुका वाचनालयांना क्युरेटर ऑफ लायब्ररीज ह्यांच्याकडून दिली जाते. मध्यवर्ती सरकार-कडून चालविण्यांत आलेली फिरती वाचनालयें धुळें तालुक्यांतील प्राथमिक शाळांना जोडलेलीं आहेत. हीं वाचनालयें सरकारी मूलोद्योग प्रशिक्षण केंद्र, धुळें मार्फत चालविलीं जातात. प्रत्येक वाचनालयांत १२० ते १२५ पुस्तकें दिलीं गेलीं आहेत.

ज्या लोकांना विद्यापीठ शिक्षणाचा लाभ मिळाला नाहीं त्यांना ज्ञानांच्या विविध शाखांचा परिचय करून द्यावा, त्यांची बौद्धिक पातळी वाढवावी ह्या उद्देशानें पुणें विद्यापीठानें बहिःशाल

शिक्षणाच्या विविध सोयी

शिक्षण मंडळ स्थापून त्याचीं केंद्रें ठिकठिकाणीं उघडलीं आहेत. येथील बहिःशाल शिक्षण केंद्र १९५२ मध्यें स्थापन झालें. हें केंद्र गरुड वाचनालयाच्या आवारांत सरकारी प्राथमिक प्रशिक्षण महाविद्यालय व्याख्यानमाला चालवीत आहे. या केंद्राचें कार्य गेलीं ८ वर्षे चालू आहे. केंद्राच्या कार्यकारी मंडळावर पुणें विद्यापिठाचे धुळ्यांतील सदस्य, गरुड वाचनालयाचे अध्यक्ष, वनिता मंडळाचे अध्यक्ष, मुख्याध्यापक वर्गांतील एक, वृत्तपत्रकारांपैकी एक, नगरपालिकेचे अध्यक्ष असे प्रातिनिधिक सभासद आहेत.

दरवर्षी पांच वक्ते निवडून बोलविले जातात व त्यांची धर्म तत्त्वज्ञान, इतिहास, संस्कृति, अर्थशास्त्र, शासनव्यवस्था, वैद्यकीय वैज्ञानिक विषय, शेती व उद्योगधंदे इत्यादि सर्वसामान्य जनतेच्या जीवनाशीं निगडित विषयांवर उद्‌बोधक पंधरा व्याख्यानें होतात. व्याख्यानाचा लाभ मुख्यत्वें करून प्राथमिक शिक्षक, प्रशिक्षण महाविद्यालयाचे विद्यार्थी, गृहिणी व इतर लोक घेत असतात.

ह्या जिल्ह्यांत साक्षरतेचें प्रमाण सन १९६१ च्या शिरगणतीप्रमाणे २४.७५ टक्के आहे.

हा जिल्हा शैक्षणिक दृष्ट्या मागासलेला असून त्यांतील तीन ते चार तालुक्यांत भिल्ल व पावरा यांची वस्ती आहे. जिल्हा स्कूल बोर्डानें मागासलेल्या मुलांसाठीं १५ छात्रालयें चालविलीं आहेत. प्रत्येक छात्रालयांत चाळीस ते पन्नास मुलें असतात व ते

साक्षरतेचें प्रमाण

प्राथमिक व दुय्यम शिक्षण घेतात. तसेच बोर्डानें नेमलेले फिरते शिक्षक अशा भागांत फिरून हजेरी वाढविणें, जनतेला शिक्षणाचें महत्त्व पटविणें हीं कामें करतात. गेल्या २० ते २५ वर्षांत अशा छात्रालयांतून शिकून नोकरीला लागलेल्या विद्या-र्थ्यांची संख्या बरीच आहे. या लोकांना मात्र आतां शिक्षणाचें महत्त्व पटलें आहे. एकूण २८२ वाचनालयें असून खेड्यांतील सुशिक्षित व साक्षर झालेले लोक त्यांचा फायदा घेत आहेत. जिल्ह्याच्या ठिकाणीं एक रजिस्टर्ड गायन व नृत्य शाळा आहे. तेथें २० ते २५ विद्यार्थी शिकतात. तेथें शिक्षण-क्रम संपल्यावर प्रमाणपत्रें दिलीं जातात. तसेंच येथें राजवाडे संशोधन मंदिर आहे. तेथें ऐतिहासिक संशोधनाच्या दृष्टीनें उपयुक्त अशीं कांहीं पुस्तकें, शिलालेख, ताम्रपट इत्यादि साधनें उपलब्ध आहेत.

जिल्ह्यांत एकूण राज्य सरकारनें चालविलेलीं १४ समाज शिक्षण केंद्रें व जी. बी. टी. सी. धुळें, ह्या संस्थेनें ४ समाज केंद्रें चालविलीं आहेत. सदर समाज केंद्रांमध्यें प्रौढ पुरुष व स्त्रिया ह्यांना निरनिराळ्या प्रकारचें व्यावसायिक शिक्षण दिलें जातें व जनतेसाठीं मधून मधून शैक्षणिक, सांस्कृतिक व लोकरंजनाचे कार्यक्रम होतात. प्राथमिक शाळांतील व दुय्यम शाळांतील विद्यार्थी देखील त्यांत हौसेनें भाग घेतात. कार्यक्रमाचा मुख्य उद्देश जनता जागृति हा असतो. सदर केंद्रामध्यें किरकोळ रोगांवर तात्कालिक उपाय करण्याकरितां एक औषधी पेटी ठेवली आहे.

जिल्ह्याच्या ठिकाणीं धुळें येथें वेधशाळा चालविली आहे. तेथें संस्कृत भाषेच्या दृष्टीनें अभ्यासक्रम शिकविला जातो व परीक्षा पण होतात. विद्यार्थ्यांना उत्तीर्ण झाल्यावर प्रमाणपत्रें दिलीं जातात.

बालवीर चळवळ लोकप्रिय होत आहे. बऱ्याचशा प्राथमिक व दुय्यम शाळांमधील विद्यार्थी त्यांत भाग घेतात. जिल्ह्यांत एकूण २१ ए. सी. सी. युनिटस् असून ७४८ कॅडेट आहेत आणि २१ ए. सी. सी. अधिकारी आहेत.

सन १९५९-६० ह्या सालांत एकूण १२१ सामाजिक शिक्षण वर्ग उघडण्यांत आले. निरक्षर प्रौढांना साक्षर करणें हा ह्या वर्गांचा उद्देश असतो. तसेंच शैक्षणिक व सांस्कृतिक दृष्ट्या महत्त्वाचे कार्यक्रमहि ह्या वर्गामार्फत होत असतात. सन १९५९-६० मध्यें एकूण ९६७ निरक्षर प्रौढांना साक्षर करण्यांत आले.

१३. समाज सेवा

स्वातंत्र्योत्तर काळांत आपल्या देशांत विविध क्षेत्रांत आणि परिस्थितींत राहाणाऱ्या लोकांचें जीवनमान उंचविण्याच्या दृष्टीनें अनेक योजना हातीं घेण्यांत आल्या आहेत. लोकसंख्येचा

समाज कल्याण

फार मोठा भाग सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक दृष्टीनें मागासलेला असल्याचें आढळून आल्यामुळें त्यांच्यासाठीं समाजकल्याणाची खास योजना हातीं घेण्यांत आली. या योजनेनुसार हरिजन, आदिवासी व इतर मागासलेल्या वर्गांतील लोकांची सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक परिस्थिति सुधारण्याचे प्रयत्न करण्यांत येत असून प्रत्येक क्षेत्रांत या जमातीच्या उन्नतीसाठीं खास योजना व सवलती देण्यांत येत आहेत.

या जिल्ह्यांत एकूण लोकसंख्येपैकीं ६५,३४२ लोक अस्पृश्य; ४,५१,७५१ आदिवासी; अगर गिरीजन व ६६,८८४ इतर मागासलेले लोक आहेत. त्यांच्या जवळ जवळ ४२ जाती या जिल्ह्यांत आहेत. त्यांच्या कल्याणासाठीं विविध योजना आंखण्यांत आल्या आहेत. त्या प्रामुख्यानें दोन प्रकारच्या असून पहिला प्रकार म्हणजे स्पृश्यास्पृश्य, उच्चनीच, लहानथोर आदि जुन्या परंपरागत भेदभावाच्या रूढींचें प्रचार कार्यानें उच्चाटण करणें, व दुसरा प्रकार म्हणजे मागासलेपणा दूर करण्यासाठीं शैक्षणिक, सांस्कृतिक व आर्थिक सुखसोयी उपलब्ध करून देणें. स्पृश्यास्पृश्य भेदभाव मनांत मूळ धरून असल्यामुळें मतपरिवर्तन करण्यासाठीं ग्रामीण भागांतून कीर्तनें, पोवाडे आणि सामुदायिक मेळावे भरवून सर्व समाजाला एकत्र आणण्यांत येतें. त्याचप्रमाणें या बाबतींत जनजागृति व्हावी म्हणून दरवर्षी जिल्ह्यांतील अस्पृश्यता निवारणाचें काम उत्कृष्टपणें करणाऱ्या दोन खेड्यांना १००० रु. व ५०० रु. चें पहिलें व दुसरें याप्रमाणें बक्षिसें प्रोत्साहन म्हणून देण्यांत येतात. या जिल्ह्यांत श्री. गाडगे महाराज मिशन, भारतीय डिप्रेस्ड क्लास लीग, महाराष्ट्र हरिजन सेवक संघ, भिल्ल सेवा मंडळ या चार सरकारमान्य संस्था असून प्रचारक मागासलेल्या वर्गांतील जनतेंत जागृतीचें कार्य करीत आहेत.

चांगले संस्कार मुलांवर लहानपणापासून व्हावेत या उद्देशानें जिल्ह्यांत अस्पृश्यता निवारण योजनेसाठीं नंदूरबार येथें एक व शिरपूर तालुक्यांतील मांजरोद येथें एक अशा दोन बालवाड्या

बालवाडी, संस्कार केंद्रें व वसतिगृहें

खाजगी संस्थेमार्फत चालविल्या जात आहेत. तसेंच खाजगी संस्थेमार्फत दोन संस्कार केंद्रें नंदुरबार व थाळनेर या गांवीं चालविलीं जात आहेत. या जिल्ह्यांत भटके व निमभटके लोक पुष्कळ आहेत. त्या सर्व जमातींना स्थायिक करण्याच्या योजनेनुसार खास सवलती दिल्या आहेत. त्यांच्यासाठीं धुळें येथें बालवाडी

चालविली जात आहे. शहादे येथें एक संस्कार केंद्र चालू करण्यांत आलें आहे. विमोचित जातींच्या लोकांसाठीं नंदुरबार येथें मनोरंजन केंद्र चालविलें जात आहे. या जिल्ह्यांत मागास वर्गाच्या मुलांमुलींना राहाण्यासाठीं सोय असलेलीं ४० वसतिगृहें आहेत.

मागासलेल्या वर्गांतील समाजाला सुशिक्षित करण्याकरितां सर्व सवलती व सोयी उपलब्ध करून देण्यांत आल्या आहेत. यांत फी माफी, शिष्यवृत्त्या, शाळासाहित्याचा मोफत पुरवठा, वसतिगृहांत राहाण्या-खाण्याची मोफत सोय इ. गोष्टींचा समावेश होतो.

शैक्षणिक सवलती

उच्च व परदेशीय शिक्षणाकरितांहि मागासलेल्या वर्गांतील विद्यार्थ्यांस खास सवलती देण्याची तरतूद करण्यांत आली आहे. शिक्षण क्षेत्रांतील दालनें केवळ मागासलेल्या जमातीस नव्हे तर आर्थिक दृष्टीनें मागासलेल्या सर्व वर्गांतील लोकांस खुली व्हावीं असें धोरण १९५९ सालापासून महाराष्ट्र सरकारनें स्वीकारल्यामुळें वार्षिक उत्पन्न (निव्वळ) १२०० रु. पेक्षां कमी असलेल्या पालकांच्या मुलांना धर्म, जात वगैरे कसल्याहि प्रकारची आडकाठी न ठेवतां सर्व तऱ्हेच्या शाळा कॉलेजमधून फी सवलत (नादारी) दिली जात आहे.

या जमातींतील वर्गास आर्थिक स्थैर्य प्राप्त करून देण्याच्या दृष्टीनें किरकोळ धंद्याकरितां बिनव्याजी व दीर्घ मुदतीचीं कर्जे देण्यांत येतात आणि दूधदुभत्याचा व्यवसाय करण्यासाठीं गाई, म्हशी खरेदी करण्यास आर्थिक साहाय्य देण्यांत येते. पूर्वी या जिल्ह्यांतील नवापूर, अक्कलकुवा व अक्राणी महाल हा भाग अविकसित मानला जात असे. पण गेल्या वर्षापासून साक्री, नंदूरबार, शहादा, तळोदे तालुके व शिरपूर तालुक्याचा उत्तर भाग सरकारनें अविकसित विभाग म्हणून जाहीर केला असून या विभागांतील ग्रामीण जनतेच्या विकासासाठीं छोटचा, घरगुती व ग्रामीण उद्योगधंद्यास व्यक्तिगत मदत देण्याची योजना सुरू करण्यांत आली आहे. या योजनेखाली दिल्या जाणाऱ्या रकमेपैकीं तीन चतुर्थांश बिनव्याजी कर्ज व एक चतुर्थांश मदत म्हणून दिली जाते. शिवाय ह्या विभागांतील शेतकऱ्यांना शेती व्यवसायासाठीं लागणारीं सर्व अवजारें, बैल, ऑईल पंप्स यांकरितां आर्थिक मदत दिली जाते व सुधारलेल्या पद्धतीचीं बी-बियाणीं यांचा पुरवठा केला जातो.

हरिजन व आदिवासी लोकांची पिण्याच्या पाण्याची फार गैरसोय होती. त्यासाठीं नव्या विहिरी खोदण्यांत आल्या असून जुन्या विहिरींची दुरुस्ती केली जात आहे. तसेंच या वर्गांतील लोकांस कामधंदा मिळावा म्हणून समाज कल्याण खात्यांत त्यांचीं नांवें नोंदविली जातात व नोकऱ्यांत सवलती देऊन जागा राखून ठेवल्या जातात.

मागासलेल्या वर्गांतील लोकांस घरें बांधण्यासाठीं जमीन आणि घर बांधकामास आर्थिक साहाय्य देण्यांत येत असून त्यासाठीं जिल्ह्यांत सहकारी संस्था स्थापन करण्यांत येत आहेत.

आदर्श आदिवासी वसाहत पानखेडा

अशा प्रकारच्या १५ आदिवासी कुटुंबांची एक आदर्श वसाहत साक्री तालुक्यांतील पानखेडें या गांवीं सुरू करण्यांत आली आहे. त्यांत प्रत्येक कुटुंबास राहाण्यास १,५७५ रु. पर्यंतचें घर, लागवडीस १० एकर जमीन, एक बैलजोडी, नांगर, गुरांसाठीं गोठा आणि इतर शेतीचीं अवजारें यांचा पुरवठा समाज कल्याण खात्यामार्फत करण्यांत आला आहे. ह्या लोकांची सामुदायिक शेती सहकारी

संस्था स्थापन करण्यांत आली असून ते सामुदायिक पद्धतीनें शेती करीत आहेत. या वसाहतीसाठीं पिण्याच्या पाण्याची विहीर, दवाखाना, मुलांच्या शिक्षणाची सोय, दुधदुभत्या जनावरांचा पुरवठा व पोल्ट्री फार्महि सरकारी खर्चानें करण्यांत येणार असून त्यासाठीं एक लाख रुपयांची तरतूद करण्यांत आली आहे.

ग्रामीण विभागांतील स्त्रिया व मुलें यांचा सर्वांगीण विकास व्हावा म्हणून मध्यवर्ती समाज कल्याण मंडळाचा या जिल्ह्यांत सप्टेंबर १९५५ सालीं पहिला विकास प्रकल्प सुरूं झाला. त्याचा धुळें व शिंदखेडें तालुक्यांतील ३७,९२१ लोकांना फायदा मिळत आहे. प्रथम योजनेंत कापडणे, सोनगीर, नरडाणे, वारुड, लांबकानी हीं केंद्रें व धनुर, दापुरी, पिंपराड, मेलाणे, बोरसुळे हीं उपकेंद्रें सुरूं करण्यांत आलीं. दुसरी योजना फेब्रुवारी १९५७ रोजीं सुरूं होऊन त्यांत न्याहाळोद, वर्शी, बोरीस, बुरझड, चिचवार ह्या केंद्रांचा, व कवढळ, दताणे, रामी, निकुंभे, नवळाणे ह्या उपकेंद्रांचा समावेश करण्यांत आला. या केंद्रांचें काम, प्रॉजेक्ट इंप्लिमेंटेशन कमिटी पाहाते. प्रत्येक केंद्रांत एक प्रशिक्षित नर्स व दायी नेमण्यांत आली असून तेथें बाळंतपणाचें काम केलें जातें. दुधवांटप, बालवाडी चालविणें, हस्तकला व हस्तव्यवसायाचे वर्ग चालविणें इत्यादि कामेंहि केंद्रामार्फत करण्यांत येतात. या खेरीज या केंद्रामार्फत ग्रामीण स्त्रियांचे सांस्कृतिक कार्यक्रम करण्यांत येतात. अशाच प्रकारचे प्रकल्प अक्राणी, नंदुरबार, तळोदे, नवापूर ह्या तालुक्यांतहि आहेत.

मध्यवर्ती समाज कल्याण मंडळ

बाल गुन्हेगारी आणि स्त्रिया व मुलें यांच्या कल्याणासाठीं या जिल्ह्यांत रिमांड होम्स व सर्टिफाईड शाळा असून तेथें बाल गुन्हेगारांना विविध व्यवसायांचें शिक्षण देऊन या संस्थांतून बाहेर पडल्यावर चांगलें जीवन जगण्यासाठीं लायक बनविण्यांत येते. कांहीं संस्था खाजगी संघटनांच्याद्वारें चालविण्यांत येत असून त्यांना सरकार सढळपणें मदत देते.

रिमांड होम्स

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर देशाच्या विकास योजना तयार होऊं लागल्या. शेतीप्रधान व बहुसंख्येनें ग्रामीण भागांत राहाणाऱ्या लोकांचें जीवनमान–राहाणीचा दर्जा सुधारावा असा या नियोजनामागील हेतू आहे. जनजागृति व जनसहकार्याशिवाय विकास योजना-यशस्वी होणें कठीण असते. बाल्यावस्थेंत असलेल्या आपल्या लोकशाहीला आर्थिक शक्तीच्या जोडीला ग्रामीण जनतेंतील विधायक शक्तीची नियोजनाव्दारें सांगड घालण्यांत आली आहे. ग्रामीण भागांतील सुप्त शक्ति जागृत करून समाज विकासाच्या कामीं तिचा उपयोग करून घेण्यांत येत आहे.

सामुदायिक विकासानें जनजागृति

जिल्ह्यांतील जनतेचे प्रतिनिधी आणि सरकारी अधिकारी जिल्हा विकास मंडळ व तालुका विकास मंडळांना मार्गदर्शन करतात. जिल्हा विकास मंडळाचे एकूण ९२ सभासद असून त्यांत सरकारी २६, बिन सरकारी ६६ (आमदार ९, खासदार २ व एम्. एल्. सी. १) आहेत. जिल्हा विकास मंडळाची कचेरी धुळें येथें असून त्याच्या दहा उपसमित्यांमार्फत जिल्ह्यांतील विविध खात्यांच्या

जिल्हा विकास मंडळ

समाजकल्याणाच्या योजनांना गति, पूर्तता व मार्गदर्शन करण्यांत येतें. त्याचप्रमाणें जनतेच्या सहकार्यानें विविध स्थानिक विकासकामें करण्यासाठीं राज्य सरकारकडून व भारत सरकारकडून आर्थिक साहाय्य मिळतें. ग्रामीण भागांत अशीं कामें पार पाडण्याकरितां एकूण खर्चाच्या कांहीं टक्के रक्कम रोख अथवा सामुदायिक श्रमदानाच्या रूपानें द्यावयाची असते. मागासलेल्या वर्गांकरितां लोक वर्गणी २५ टक्केंपर्यंत कमी करण्यांत येते. १९५३-५४ पासून या जिल्ह्यांत विहिरी, ग्रामपंचा-यतीच्या इमारतीचें बांधकाम, जोडरस्ते, गटारे, धक्के, लहान पूल, संडास, शाळा, समाज कल्याण केंद्रें, फरश्या, वाचनालय, व्यायाम शाळा, बंधारे, धर्मशाळा, खडीचे रस्ते अशी १०,१७,२८५ रु. चीं एकूण ४६४ कामें झालीं आहेत.

वरील स्वरूपाची स्थानिक कामें जिल्ह्यांत विकास गट नसेल त्या ठिकाणीं जिल्हा विकास मंडळामार्फत हातीं घेतली जातात व जिल्हा बांधकाम खातें अथवा लोकल बोर्डाच्या देखरेखीखालीं पूर्ण केली जातात. आवश्यक ती लोकवर्गणी पूर्ण करण्यास जनतेनें तयारी दर्शविली तर अशा कामांची जबाबदारी गांव समिति अथवा ग्रामपंचायत समितीवर सोपविण्यांत येते.

याशिवाय ग्रामीण भागांत पिण्याच्या पाण्याची सोय करून देण्याची व ग्रामीण भागांतील जोडरस्त्यांची अशा दोन स्वतंत्र योजनाहि जिल्हा विकास मंडळातर्फें कार्यान्वित करण्यांत येतात. पिण्याच्या पाण्याच्या व ग्रामीण जोडरस्त्यांच्या योजनेकरितां लोकवर्गणी २५ टक्के असते. मागास-लेल्या भागाकरितां मात्र लोकवर्गणीचें बंधन या बाबतींत सैल करण्यांत येते.

समाज विकास गट

ग्रामीण भागांतील समाजाचें अज्ञान आणि दारिद्रच नष्ट व्हावें यासाठीं शेतीचें उत्पादन त्वरेनें वाढावें, शिक्षणाचा प्रसार व्हावा, आरोग्यसंवर्धन व संरक्षणाची सोय व्हावी, ग्रामीण कला व व्यवसायांत वाढ व्हावी म्हणून सर्वांगीण विकासाचा कार्यक्रम खेडयांचा गट घेऊन त्यांत सुरूं करण्यांत येतो. या कार्यक्रमास प्रत्येक कुटुंबाचा हातभार लागावा म्हणून विविध समाजविकास कामांत लोकवर्गणी, व श्रमदान या व्दारें घेतली जाते. ग्रामीण विकासाच्या कार्यक्रमाची योजना २ ऑक्टोबर १९५२ पासून देशांत सुरू झाली. त्यावेळीं या जिल्ह्यांतील शहादे तालुक्यांतील १७२.५ चौ. मैल प्रदेशांतील ६९५०६ लोकवस्तीच्या ७२ गावांचा समावेश करण्यांत आला होता. हा विभाग मूळ सामूहिक विकास योजना विभाग म्हणून २-१०-१९५३ पासून सुरूं करण्यांत आला व नंतर ३ वर्षें पूर्ण झाल्यावर १-१०-५६ पासून तो राष्ट्रीय विस्तार योजनेच्या धर्तीवर अंतिम पायरीचा गट म्हणून घेण्यांत आला. १९५८ पासून हा भाग द्वितीय अवस्थेचा विभाग म्हणून ओळखला जात आहे. कारण एप्रिल १९४८ पासून या कार्यक्रमास सामूहिक विकास योजना असे संबोधण्यांत येऊं लागले. त्याच्या तीन अवस्था करण्यांत आल्या. (१) पूर्व प्राथमिक, (२) प्रथम अवस्था, (३) दुसरी अवस्था. सध्यां या जिल्ह्यांतील सर्व भाग ह्या कार्यक्रमाखाली आला आहे. त्यापैकीं अक्राणी महाल हा वन्य विभाग आहे. व तेथील लोक आर्थिक व सामाजिक दृष्टचा मागासलेले आहेत. त्या विभागांतील सुधारणेकडे अधिक लक्ष देणें अत्यावश्यक होते म्हणून मध्यवर्ती सरकारच्या मदतीवर सामूहिक विकास योजनेप्रमाणेंच १-११-१९५६ पासून बहुउद्देशीय विकास प्रकल्प म्हणून सुरू करण्यांत आला आहे. आतां ह्या जिल्ह्यांत वेगवेगळचा अवस्थेंतील अकरा विकास गटांमार्फत

जनतेच्या सहकार्यानें समाज विकासाचें कार्य चालू आहे. जिल्ह्यांतील विकास गट, त्यांच्या कार्याची सुरवात, त्याखाली येणारें क्षेत्र व खेडीं, विकास गटांचा खर्च व अवस्था पुढील प्रमाणें आहे.

क्रमांक	विकास गटाचें नांव	सुरू झाल्याची तारीख	क्षेत्र	खेडीं	३१ ऑगस्ट ६० अखेर खर्च	अवस्था
१	अक्राणी	१–११–५६	२३२	१५३	२२,०९,३४३	बहुउद्देशीय प्रकल्प
२	साक्री	२–१०–५५	९२६.२	१५४	२०,४१,४८६	प्रथमावस्था
३	शहादा	२–१०–५३	१७९.४	७३		द्वितीय अवस्था
४	शहादा	२–१०–५६	२६७.९	११०	७,५६,०१४	प्रथमावस्था
५	अक्कलकुवा	१–४–५७	६७२	१६१	६,४३,४२४	प्रथमावस्था
६	तळोदे	१–४–५८	१९७.९	८९	४,९१,४०९	प्रथमावस्था
७	नवापूर	१–१०–५९	४२१.८	८५	२,२७,७०२	प्रथमावस्था
८	नंदुरबार	१–४–५९	५०६	१२६		प्रथमावस्था
९	शिरपूर	२–१०–५९	७५६	११९		पूर्व प्राथमिक
१०	धुळें	१–५–६०	७५१.६	१५०		पूर्व प्राथमिक
११	शिंदखेडें	२–१०–५९	५०६	१४२		पूर्व प्राथमिक

जिल्ह्यांतील संपूर्ण भाग विकास योजना क्षेत्रांत आला असून धुळें, शिरपूर, शिंदखेडें ह्या विकास गटांत कोणत्या ठिकाणीं कोणतें कार्य होईल याची पूर्व प्राथमिक पाहाणी चालू असून सहा पहिल्या अवस्थेंत आणि एक दुसऱ्या अवस्थेंत आहे. अक्राणी महालांत विविध लक्ष्यी विकास प्रकल्प चालू आहे. विकास योजनेंत आतांपर्यंत ग्रामीण भागांत झालेल्या कार्याची प्रगति पुढील कांहीं कामावरून दिसून येईल.

शेती

कंपोस्ट खड्डे खणले	२१,२५४
खतवांटप (बं. मण)	१,८८,१४४
सुधारलेलीं बी-बियाणीं वांटप (बं. मण)	५५,४९३
जातीवंत वळूंचें वांटप	९४
जातीवंत कोंबडया वांटप	२,४६८
शोष खड्डे तयार केले	४,७६८
फळ व भाजीपाला या खाली आणलेलें क्षेत्र	३,३९८ एकर

पाणीपुरवठा

पाण्याखाली आणलेली जादा जमीन	९,१७५ एकर

बांधबंदिस्ती

लागवडीखाली आणलेलें क्षेत्र	५०,००१ एकर

आरोग्य

विहिरी (नवीन)	१६५
विहिरी (दुरुस्ती)	१०१
संडास बांधले	२०१
जनावरांना लस टोचण्यांत आली	२,३५,०९७
पक्क्या गटारांचें बांधकाम	१२,८७५ यार्ड

शिक्षण

शाळागृहांचें बांधकाम	११४
प्रौढ साक्षर केले	७,३६२
शेतकरी मंडळांची स्थापना	६४७
महिला मंडळाची स्थापना	९६
युवक मंडळाची स्थापना	२५२

इतर

जोडरस्तें बांधकाम	१,७६५ फर्लांग
वरील कार्यासाठीं लोक वर्गणी (श्रमदानानें व पैशाच्या रूपानें)	९,४०,६१५ रुपये

विकास गटांतून झालेल्या कार्याचें खरें यश तेथील जनतेच्या सहकार्यावरच अवलंबून असल्यामुळें जिल्ह्यांतील वरील कार्यावरून ग्रामीण भागांत जनजागृतीचें काम प्रगतिपथावर असल्याचें दिसून येतें.

१४. सर्वोदय

मागासलेल्या भागांत राहाणाऱ्या जनतेचा सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक विकास जनतेच्या सहकार्यानें साध्य व्हावा आणि तेथें राहाणाऱ्या जनतेला स्वावलंबनानें जगतां यावे याकरितां कांहीं खेडयांचा एक सलग गट निवडून त्या भागाच्या सर्वांगीण विकासाचा कार्यक्रम तयार करण्यांत येतो. अशा कार्यक्रमाला सर्वोदय असें नांव देण्यांत येते. या जिल्ह्यांतील नवापूर तालुक्यांतील खांडबारा विभागांत ४ जुलै १९४९ पासून सर्वोदय योजना सुरूं करण्यांत आली. त्यांत २१,७८५ लोकसंख्येच्या ३० खेडयांचा समावेश करण्यांत आला आहे. खांडबारा येथें सर्वोदय केंद्राची मुख्य कचेरी असून त्या ठिकाणीं सर्वोदय संचालकाच्या देखरेखीखाली समाज विकासाचें कार्य चालतें. खातगांव, करंजाली, भादवड, तलवीपाडा ह्या चार ठिकाणीं ह्या केंद्रांचीं उपकेंद्रें आहेत.

शिक्षण

सर्वोदय केंद्र सुरू होण्यापूर्वीं ह्या भागांत स्कूल बोर्ड व भिल्ल सेवा मंडळाच्या तुरळक शाळा सोडल्या तर शिक्षण संस्थांचा अभाव होता. म्हणून या लोकांना शिक्षण दिल्यास इतर सुधारणा ते पुढें स्वतः होऊनच करतील हें लक्षांत घेऊन शिक्षणावर भर देण्यांत आला. आतां या विभागांतील सर्व ठिकाणीं प्राथमिक शिक्षणाची सोय झाली असून एकूण ३४ शाळा चालू आहेत. ह्या सर्व शाळांतून सूत कताईचें शिक्षण सुरूं करण्यांत आले आहे. ह्या शिक्षणाच्या प्रगतीची वाढ झपाटयानें होत असून आज खांडबारा येथें शेतकी हायस्कूल चालविलें जात आहे व तेथें १६१ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. तसेंच खांडबारा येथें प्राथमिक शिक्षकांसाठीं शिक्षण खात्यानें प्रशिक्षण महाविद्यालय उघडले आहे. सहा वर्षांच्या आंतील मुलांमलींसाठीं ३ बाल मंदिरें चालविलीं जात आहेत. आदिवासी मुलींना व मुलांना शिक्षणाच्या काळांत राहाण्याची सोय व्हावी म्हणून खांडबारा येथें मुलांचें एक व मुलींचें एक अशीं दोन छात्रालयें चालविलीं जात आहेत. श्रावणी येथेंहि एक वसतिगृह उघडण्यांत आलें आहे. शाळांसाठीं स्वतःची इमारत असणें आवश्यक असते म्हणून ३० खोल्या असलेल्या शाळा बांधण्यांत आल्या आहेत.

स्त्रियांना शिक्षणाची गोडी लागावी व त्या सुसंस्कृत व्हाव्यात यासाठीं स्त्रीकार्यकर्त्या ठेवण्यांत आल्या आहेत. त्या शिवणकाम, भरतकाम आदि शिकवीत असतात.

आदिवासी शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिति सुधारण्यासाठीं त्यांना त्यांच्या व्यवसायांत मदत करणें व योग्य असें मार्गदर्शन करणें अत्यंत महत्त्वाचें आहे. त्या दृष्टीनें शेतकऱ्यांना आधुनिक पद्धतींच्या अवजारांचा वापर करण्यासाठीं माहिती देण्यांत येते. नवीन बी-बियाणांचा पुरवठा करण्यांत येतो.

१९५९-६० सालीं त्यासाठीं ५,००० रु. ची तरतूद करण्यांत आली होती. अधिक उत्पन्न काढण्याच्या दृष्टीनें जमिनीस पाणी देण्याची सोय करणें जरूर आहे. म्हणून ११४ विहिरी खोदण्यांत आल्या व ५ कच्चे बंधारे बांधण्यांत आले. शिवाय गांवकऱ्यांच्या सहकार्यानें मौजे मोग्राणी व निंबोणी ह्या गांवीं दोन पक्के बंधारे बंधाण्यांत येत आहेत. त्यापैकीं एका बंधाऱ्याचें काम पूर्ण झालें आहे. वरील सोयीमुळें सुमारें ५०० एकर जमीन पाण्याखाली भिजत आहे. शेतीसुधारण्याच्या दृष्टीनें बांधबंदिस्तीचें महत्त्व फार आहे. म्हणून ४१८ एकर जमीनीची बांधबंदिस्ती करण्यांत आली.

१९५७-५८ सालीं खांडबारा ग्राम पंचायतीनें खांडबारा गांवासाठीं नळाच्या पाण्याची योजना आंखली. ती योजना पूर्ण होऊन हल्ली खांडबारा गांवांत नळानें पाणी-
पुरवठा करण्यांत येत आहे. याशिवाय सर्वोदय केंद्रानें लोकांच्या मदतीनें **पिण्याच्या पाण्याची सोय**
११ गांवांना पिण्याच्या पाण्याच्या विहिरी खोंदून दिल्या.

दळणवळणाच्या सोयीच्या दृष्टीनें ठिकठिकाणीं जोडरस्ते तयार करण्यांत आले. गेल्या वर्षी खांडबारा ते काकरापाडा हा तीन मैलांचा जोडरस्ता तयार करण्यांत आला. त्याशिवाय खांडबारा येथील ग्रामपंचायतीनें गांवांतील सर्व रस्ते चांगल्या प्रकारे तयार करून घेतले आहेत.

सर्वोदय केंद्र स्थापन झाल्यापासून ह्या भागांत सहकारी चळवळीस चांगली चालना मिळाली आहे. आज त्या भागांत १४ विविध कार्यकारी सहकारी संस्था, ३ औद्योगिक संस्था, ६ धान्य संस्था, तीन गृहनिर्माण संस्था, ३ जंगल कामगार संस्था एकूण ३० गांवांतून कार्य करीत आहेत.

सरकारच्या धोरणानुसार सर्वोदय केंद्रानें खांडबारा येथें ८-७-५६ पासून नवापूर तालुका विधायक समिति नांवाची संस्था स्थापन केली व ती रजिस्टर करण्यांत आली. ह्या समितीच्या विद्य-
मानें एक परिश्रमालय (वर्कशॉप) चालविलें जात आहे. त्यांत पेटी चरखा, अंबर चरखा इ. बनविण्याचें
काम हातीं घतलें आहे. ग्रामोद्योगाचा विकास या समितिमार्फत करावा ह्या दृष्टीनें खादी कमिशन
तर्फे हात कागद बनविण्याचा उद्योग, साबण उद्योग, तेल घाणी, सरंजाम कार्यालय आदि कार्ये करण्यांत
येत आहेत. सर्वोदय केंद्रामार्फत खातगांव येथें खादी केंद्र चालविलें जात आहे. आरोग्य व्यवस्थेच्या
दृष्टीनें एक लहानसा दवाखानाहि चालविला जात आहे व त्यांत एक प्रशिक्षित सेविकाहि ठेवण्यांत
आली आहे. ही सेविका केंद्रांतील खेडोपाडीं जाऊन स्त्रिया व मुलें यांना तपासून औषधोपचार करते.

सर्वोदय केंद्र पुरस्कृत नवापूर तालुका विधायक समितीनें खांडबारा येथें एक लहानसें इलेक्ट्रिक पॉवर हाऊस निर्माण केले आहे व गांवांत विजेचे दिवे लावण्यांत आले आहेत. ह्या लहानशा गांवांत विजेची व्यवस्था झालेली पाहून खरोखरीच कौतुक वाटतें.

१५. प्रेक्षणीय स्थळें व महत्त्वाचीं शहरें

ह्या जिल्ह्यांत प्रेक्षणीय अशी फार थोडी स्थळें आहेत. त्यांत तोरणमाळ हें एक महत्त्वाचें स्थळ आहे. तोरणमाळ हें ठिकाण सातपुडयाच्या डोंगरांत अक्राणी महालांत वसलेलें आहे. तें अक्राणी महालांतील सर्वांत उंच डोंगरावर वसलें असून त्याची उंची समुद्रसपाटीपासून ३४०० फुट आहे. हें पूर्वीं मांडू घराण्याच्या राज्याच्या राजधानीचें ठिकाण होतें. ह्या डोंगरावर विस्तीर्ण पण अरुंद असे १६ चौ. मैलांचें पठार व एक सुंदर असें तळें आहे. ह्या तळ्याचें नांव "यशवंत तळें" असें ठेवण्यांत आलें आहे. हें ठिकाण धुळ्यापासून सुमारें ८० मैलांवर आहे. हा प्रदेश हिरव्यागार वनश्रीनें नटलेला असून उन्हाळ्यांत येथील हवा अगदी थंड असते.

थंड हवेचें ठिकाण तोरणमाळ

सरकारच्या १९५८ च्या योजनेनुसार तोरणमाळ ह्या ठिकाणाचा धुळें व जळगांव ह्या दोन्हीं जिल्ह्यांसाठीं सुट्टींतील थंड हवेचें निवासस्थान म्हणून विकास करण्याचें ठरलें. त्यानुसार सुट्टींतील निवासस्थानें बांधण्याचें काम हातीं घेण्यांत आलें. मागच्या वर्षींच त्यापैकीं ६ भाग बांधून झाले. सर्व खोल्या फर्निचर, कॉटस्, गाद्या व भांडी वगैरेंनीं युक्त आहेत. ह्या शिवाय १५-१२ चे चार तंबू पण येथें ठेवण्यांत आलेले आहेत. ह्या थंड हवेच्या ठिकाणाचा विकास करावयाचा असून त्या दृष्टीनें सरकारी यंत्रणा काम करीत आहे. लवकरच तेथें पाणी, दिवे खेळाचें मैदान, वाचनालय वगैरे सोयी करण्यांत येणार आहेत. बंगले व बागबगिचे करण्यासाठीं तेथें प्लॉटस् पाडण्यांत येत आहेत व त्यांच्या विक्रीचें काम महसूल खात्याकडे सोपविण्यांत आलें आहे.

तोरणमाळला जाण्याच्या दृष्टीनें पहिली महत्त्वाची गोष्ट तेथपर्यंत जातां येईल असा रस्ता करणें. सध्यां तेथपर्यंत जीप गाडीच जाऊ शकेल असा रस्ता तयार करण्यांत आला असून लवकरच त्यावरून एस्. टी. गाडी जाऊ शकेल अशी सुधारणा करण्यांत येत आहे. धुळ्यापासून या ठिकाणीं जावयाचे म्हणजे धुळें ते शहादा ५२ मैल, शहादा ते रानीपूर १८ मैल आणि रानीपूर ते तोरणमाळ १५ मैल असा मार्ग आहे. ह्यापैकीं धुळें ते शहादा एस्. टी. बसनें जाता येतें. शहादा ते रानीपूर पावसाळ्यांत सोडून केव्हाहि बसनें जाता येते. रानीपूर ते तोरणमाळ हा १५ मैलांचा मार्ग जीपनें जाता येण्यासारखा आहे.

तोरणमाळ येथें एप्रिल १९५९ पासून सुट्टीचें शिबिर उघडण्यांत आलें असून तेथील वसतिगृहांत राहाण्यासाठीं जिल्ह्याचे एक्झिक्युटीव्ह इंजिनिअर ह्यांच्याकडून दहा दिवसाचें रिझर्व्हेशन मिळू शकते.

फरुकी राजांची खानदेशची पहिली राजधानी ह्या ठिकाणीं होती. ८०० वर्षांपूर्वी गवळी अथवा अहिर राजांच्या काळांत याची चांगली भरभराट झाली होती. थाळनेर हें ठिकाण शिरपूर तालुक्यांत असून तापीकाठीं वसलेलें आहे. पूर्वी ते सुरत बऱ्हाणपूर रस्त्यावरील एक महत्त्वाचे व्यापारी शहर होतें. आतां पूर्वीचें महत्त्व नसले तरी येथील किल्ला अजून मजबूत आहे.

थाळनेरचा किल्ला

ऐतिहासिक स्मृतिस्थळें

हा किल्ला धुळयाच्या दक्षिणेस सहा मैलांवर डोंगरावर बांधला आहे. लळिंग हें ठिकाण प्राचीन असून पहिल्या फरुकी राज्यांच्या कारकीर्दीत चौदाव्या शतकांत येथील किल्ला बांधला गेला; पण तो आज मोडक्या स्थितींत आहे. त्याचप्रमाणें लळिंग येथें दोन हेमाडपंथी देवालयें असून तींहि बरीच जीर्ण झालीं आहेत.

लळिंग किल्ला

अशाच प्रकारचे किल्ले साक्री तालुक्यांतील भामेर, धुळें तालक्यांतील सोनगीर व नंदुरबार येथेंहि आहेत. पण ते सर्व पडिक अवस्थेंत आहेत.

साक्री तालुक्यांत पिंपळनेरच्या पूर्वेस चौदा मैलांवर बळसाणे येथें गुहा व हेमाडपंथी तसेच वहामनी पद्धतीचीं जुनीं देवळें आहेत. त्याचप्रमाणें शिंदखेडा तालुक्यांत सोनगीर-दोंडाईचे रोडवर मेथी ह्या गांवीं देवळें आहेत. तेथील देवळें पडित अवस्थेंत असून त्यांचे फक्त अवशेष शिल्लक आहेत. शहादे तालुक्यांत प्रकाशे हें गांव तापी नदीच्या कांठीं वसलें असून तें एक तीर्थक्षेत्र मानलें जातें. तेथील केदारेश्वर महादेव व संगमेश्वर मंदिरें प्रसिद्ध आहेत. सिंहस्थांत येथें फार मोठी यात्रा भरते. जिल्ह्यांत सुलतानपूर, भोनंग, शिरुड, विखरण, वाघापूर, धाबादेव येथें जुनीं देवळें आहेत. शिरपूर तालुक्यांत अहिल्यापूर येथें अहिल्याबाई होळकरांनीं बांधलेली विहीर फार मोठी असून प्रेक्षणीय आहे. अशाच प्रकारची मोठी विहीर शहादे तालुक्यांत टवळाई ह्या गांवींहि आहे.

देवळें

ह्या जिल्ह्यांत अनेक ठिकाणीं लहान मोठ्या यात्रा भरतात. ह्या यात्रा भरविण्यामागें एक प्रकारची श्रद्धा जरी असली तरी जिल्ह्यांतील कानाकोपऱ्यांत वस्ती करून राहाणाऱ्या लोकांना जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा करण्यास वर्षांतून एकदां तरी त्यामुळें सोय होते. जिल्ह्यांत लाखाच्यावर लोक ज्या ठिकाणीं जमतात अशा मोठ्या यात्रा सारंगखेडा, शिरपूर, मुळावद व बोरीस ह्या ठिकाणीं भरतात. जिल्ह्यांत सारंगखेडा ह्या गांवीं सर्वांत मोठी दत्ताची यात्रा दरवर्षी मार्गशीर्ष शुद्ध पौर्णिमेस भरते. ह्या यात्रेंत प्रामुख्यानें इमारती लांकूड, घोडें, बैल, शेतकऱ्यांना लागणाऱ्या जीवनावश्यक वस्तु व शेतीचीं अवजारें यांचा मोठ्या प्रमाणावर व्यापार होतो. शिरपूर येथेंहि अशाच प्रकारची खंडेरावाची यात्रा माघ शुद्ध पौर्णिमेस भरते. त्यावेळेस रथाची मोठी मिरवणूक निघते. शिंदखेडे तालुक्यांतील मुडावद ह्या गांवीं महाशिवरात्रीच्या दिवशीं कपिलेश्वराची मोठी यात्रा भरते. ह्या सर्व यात्रा आठ ते पंधरा दिवसपर्यंत भरतात. जंगल सान्निध्यामुळें जिल्ह्यांत इमारती लांकडाचें उत्पादन मोठें आहे. म्हणून यात्रांतून इमारती लांकडाचा मोठ्या प्रमाणावर व्यापार होतो. तसेच हौशी लोकांसाठीं फार लांबच्या प्रदेशांतून घोडे विक्रीसाठीं येतात.

यात्रा

ह्या जिल्ह्यांत धुळें, नंदुरबार, शिरपूर व दोंडाइचे हीं चार महत्त्वाची शहरें आहेत.

धुळें

हा भाग ब्रिटिशांच्या ताब्यांत आल्यावर खानदेश जिल्हा बनविण्यांत आला व सन १८१९ मध्यें पुणें आणि उत्तर भारत ह्यास जोडणाऱ्या हम रस्त्यावरील धुळें या गांवीं जिल्ह्याचें मुख्य ठिकाण करण्यांत आलें. या भागाची झपाटयानें वाढ होत असून महाराष्ट्रांत पुण्यासारखे हेहि एक सांस्कृतिक केंद्र बनलें आहे. हें गांव पांझरा नदीच्या कांठीं वसलें असून नदीवर मोठा पूल आहे. १९६१ च्या खानेसुमारीप्रमाणें ह्या गांवाची वस्ती ९८,३४२ आहे. देवपूर, नेहरूनगर, विष्णुनगर, जुनें धुळें, नवी पेठ, माधवपुरा, मोगलाई, कुमारनगर असे धुळ्याचे विभाग आहेत. नवे धुळें चौकोनी पद्धतीनें वसलें असून व्यापारी दृष्टचा आग्रा रोड या भागांत फार महत्त्वाचा आहे. येथून ६ मैल दूर असलेल्या डेडरगांव तलावाचें पाणी येथें येतें. नगरपालिकेची बाग व कॉंग्रेस भुवन आणि शेतकरी संघ यांच्या इमारती पाहाण्यासारख्या असून बागेंतील मनोरा बराच उंच आहे. येथील समर्थ वाग्‌देवता मंदिर, राजवाडे संशोधन मंदिर, ग्रंथालय, गांधी तत्वज्ञान मंदिर, टेक्निकल हायस्कूल, शेतकी शाळा, आर्टस् आणि सायन्स कॉलेज, पांजर पोळ, गरुड लायब्ररी, राममंदिर, जैनमंदिर, इंजिनियरिंग कॉलेज, शेतकी कॉलेज, एकविरा देवी या संस्था धुळ्याच्या वैभवांत भर घालीत आहेत. धुळें हें महत्त्वाचे शैक्षणिक केंद्र असून येथें पुष्कळ शिक्षण संस्था, अनेक छात्रालयें व महाविद्यालयें आहेत.

व्यापारी दृष्टचाहि धुळें हें महत्त्वाचे केंद्र आहे. मालाची आवक जावक येथें मोठ्या प्रमाणावर होते. येथें कापड गिरणी, जिनींग प्रेस, ऑईल मिल्स्, प्रिंटींग प्रेस, विडयाचे, लाकडी वस्तु तयार करण्याचे तसेच लुगडीं तयार करण्याचेहि छोटे मोठे अनेक कारखाने आहेत. येथील आडत व्यापार फार मोठा आहे. जिल्हा पातळीवर असलेल्या सर्व सरकारी अधिकाऱ्यांच्या कचेऱ्या धुळें येथेंच आहेत. सेंट्रल रेल्वेच्या चाळीसगांव–धुळें या फांटयाचें हें एक महत्त्वाचे स्टेशन व स्टेट ट्रॅन्स्पोर्ट सर्व्हिसचेंहि एक मोठें केंद्र आहे.

नंदुरबार

हें नंदुरबार तालुक्याचें मुख्य ठिकाण असून त्याची लोकसंख्या ४१,१०३ आहे. प्राचीन काळापासून प्रसिद्ध असलेलें हें एक शहर आहे. "नंदीगृह" म्हणून याचा निर्देश कान्हेरी लेण्यांतील शिलालेखांत केला आहे. नंद या गवळी राजानें हें शहर वसविलें अशी पण आख्यायिका आहे. गवळी राजांच्या (यादवांच्या) हातीं तें बराच काळपर्यंत होतें. पूर्वीं ह्या गांवचा सुंदर शहर म्हणन निर्देश केलेला बराच ठिकाणीं आढळतो. तापी व्हॅली रेल्वेमुळें ह्या गांवाचें महत्त्व फार वाढलें आहे. व्यापारी दृष्टचासुद्धां या शहरास फार महत्त्व आहे. कारण येथून मुंबई व गुजरातकडे मिरची, तूर, उडीद, मूग, अंबाडी, तीळ, तेल, लांकूड निर्यात होते. विशेषतः मिरचीचा व्यापार फार जोरांत चालतो. नंदुरबारची मिरची महाराष्ट्रांत फार प्रसिद्ध आहे. येथें लहान मोठे निरनिराळ्या प्रकारचे बरेच कारखाने आहेत. ॲग्रिकल्चर मार्केट कमिटीची भव्य इमारत प्रेक्षणीय आहे.

१९४२ च्या चळवळींत नंदुरबार येथें झालेल्या गोळीबारांत स्वातंत्र्यासाठीं ज्यानें आपल्या प्राणाची आहुती दिली तो १४-१५ वर्षाचा बाळ शिरीषकुमार हा येथलाच. ज्या चौकांत त्यानें आपलें पवित्र रक्त सांडलें तेथें शिरीषकुमार स्मारक म्हणन एक छोटासा स्तंभ उभारला आहे. येथे नगरपालिका असून विजेची व्यवस्था आहे. येथील दोन तीन मशिदी प्रसिद्ध आहेत.

शिरपूर

हें तालुक्याचें मुख्य ठिकाण असून अरुणावती नदीच्या कांठीं वसलेलें आहे. मध्यभारताची सरहद्द येथून २३-२४ मैलांवर असून मुंबई-आग्रा रस्त्यावरील मोठा पूल जवळच आहे. ह्या गांवची लोकसंख्या सुमारें वीस हजार असून नळाचें पाणी, वीज, शैक्षणिक व इतर महत्त्वाच्या सोयी उपलब्ध आहेत. येथें लांकडाचा मोठा व्यापार चालत असून कापूस, तेलबिया व कडधान्यें यांचाहि मोठ्या प्रमाणांत व्यापार चालतो. येथ जिनींग, प्रेसिंग फॅक्टरीज, ऑईल मिल्स व विडचाचे बरेच कारखाने आहेत.

दोंडाइचे

ह्या गांवची लोकसंख्या सुमारें पंधरा हजार आहे. हे जिल्ह्यांतील मध्यवर्ती ठिकाण असून व्यापारी दृष्टचा फार महत्त्वाचें आहे. धुळच्याच्या खालोखाल शेंगा, कपाशी, कडधान्य, मिरची, गूळ यांचा मोठा व्यापार येथें चालतो. येथून शेंगदाण्याचें तेल, पेंड, कपाशी वगैरे निर्यात होते. हें गांव अमरावती व भोगावती या नद्यांमध्यें टेकडीवर वसलें असून तापी व्हॅली रेल्वेमुळें त्याला फार महत्त्व प्राप्त झालें आहे. आतां स्टेशनच्या बाजूस आधुनिक पद्धतीनें वस्ती होत आहे. कांहीं वर्षापूर्वींच येथें नगरपालिका गांवच्या विकासाच्या दृष्टीनें नगरपालिकेनें चांगली प्रगति केली आहे. येथेहि स्थापन झाली असून गांवच्या विकासाच्या दृष्टीनें नगरपालिकेनें चांगली प्रगति केली आहे. येथेहि ऑईल मिल्स्, जिनींग, प्रेसिंग फॅक्टरीज, डाळीचे कारखाने आहेत येथें विजेचीहि सोय आहे.

राजवाडे संशोधन मंदिर, धुळें

या मंदिरांत इतिहासाचार्य श्री. व्ही. के. राजवाडे यांनीं संग्रहीत केलेल्या बऱ्याच वस्तु व वेळोवेळीं त्यांत भर टाकण्यांत आलेल्या इतर वस्तूंचा मोठा संग्रह आहे. हें संग्राहालय ५ जानेवारी १९३२ रोजीं स्थापन करण्यांत आलें. आज त्याची एक भव्य इमारत आहे. येथील वस्तूंमध्यें मोगल व राजपूतकालीन रंगीत चित्रें, नाणीं, ताम्रपट, दगडी पुतळें, धातूंच्या मूर्ति, जुनीं हस्तलिखितें, ऐतिहासिक दस्तऐवज, दगडी उपकरणें आणि मातीची भांडीं इत्यादि इतिहासपूर्वकालीन वस्तु, ऐतिहासिक उपकरणें आणि ऐतिहासिक विषयांवरील चित्रप्रदर्शन विभाग आहे. येथें सुमारें २,००० पुस्तकांचें एक चांगलें संदर्भ ग्रंथालयहि आहे. हें संग्रहालय मंगळवार सकाळ आणि कांहीं सुटचांचे दिवस या खेरीज इतर सर्व दिवशीं सकाळीं साडेआठ ते अकरा आणि संध्याकाळीं साडे चार ते आठ वाजेपर्यंत उघडें असतें. संग्रहालय पाहावयास येणाऱ्या लोकांना ते दाखविण्यांत येते व निरनिराळ्या वस्तूंची माहिती देण्यांत येते. राजवाडे संशोधन मंडळातर्फे "संशोधन" नांवाचें एक त्रैमासिक प्रसिद्ध केलें जातें.

श्री समर्थ वाग्देवता मंदिर, धुळें

सत्कार्योत्तेजक सभेचे संचालक कै. शं. श्री. देव यांनीं संशोधन करून जमविलेल्या हस्तलिखितांचें संरक्षण व यथावकाश प्रकाशन करण्याच्या हेतूनें ही संस्था १४ जून १९३५ मध्यें स्थापन करण्यांत आली. हस्तलिखितें सुरक्षित ठेवण्यासाठीं धुळचांस महाराष्ट्रांतील धनिक व संशोधनप्रेमी जनतेच्या आश्रयानें एक भव्य इमारत उभारण्यांत आली आहे. या इमारतींत सुमारें ३४०० हस्तलिखितांचा संग्रह असून त्यांत महाराष्ट्रीय संत कवींचें वाङमय व विशेषतः श्री समर्थांचें सर्व वाङमय आहे. याशिवाय शिवाजी महाराजांच्या हातचें लिखाण असलेलीं कांहीं पत्रें, आणि सचित्र गीता असे बहुमोल वाङमय या संस्थेच्या संग्रहीं आहे. श्री समर्थांचें बहुतेक वाङमय प्रकाशित झालें आहे.

या जिल्ह्यांत प्रवासी दरवर्षी फार मोठ्या संख्येनें येत असून बहुतेक रहदारी रस्त्यांच्या मार्गानेच होत असते. त्याच प्रमाणें मुंबई-आग्रा, मुंबई-नागपूर मार्गानें जाणारे प्रवासीहि याच जिल्ह्यांतून प्रवास करीत असतात.

प्रवाश्यांचीं विश्रामस्थानें प्रवाश्यांची कमी खर्चांत निवासाची व विश्रांतीची अधिक चांगली सोय व्हावी म्हणून या जिल्ह्यांत ३५ विश्रामस्थानें निरनिराळ्या गांवांतून बांधण्यांत आलेलीं आहेत.

या जिल्ह्यांत खालील २२ गांवांतून विश्रामस्थानें असून प्रत्येक बंगल्यांत दोन खोल्या ठेवण्यांत आल्या आहेत.

इन्स्पेक्शन बंगले धुळें, सुळें, पळासनेर, नेर, साक्री, मालनगांव, विसरवाडी, नवापूर, विंचूर, चिमठाणे, दोंडाइचे, रनाळा, नंदुरबार, तळोदे, शहादा, हिसाळा, खेड, पिंपळनेर, छडवेल, खेड (ता. धुळें), आर्वी, शेलबारी.

प्रवासी बंगला : धुळें येथें एक प्रवासी बंगला असून त्यांत चार खोल्या आहेत.

वरील बंगल्यांत प्रवाश्यांना राहावयाचे असेल तर त्यांना एक्झिक्युटिव्ह इंजीनियर, बांधकाम खातें, धुळें यांचेकडून परवानगी देण्यांत येतें.

जिल्हा बंगले : जिल्ह्यांत अशा प्रकारचीं तीन विश्रामस्थानें गांवांत असून धुळें येथें एक रेस्ट हाऊसहि आहे.


नंदुरबारचा बंगला सोडल्यास प्रत्येक बंगल्यांत दोन खोल्या आहेत. या बंगल्यांत राहावयाची परवानगी आगाऊ अर्ज केल्यास जिल्हाधिकारी, धुळें यांचेकडून देण्यांत येते.

जंगल विभागाचे बंगले : जिल्ह्यांत अशा प्रकारचे ७ बंगले खालील गांवांत असून त्यांत राहाण्याची परवानगी डिव्हिजनल फॉरेस्ट ऑफिसर, धुळें यांच्या कडून दिली जाते.

रोहिणी, लळिंग, बोराडी, मालनगांव, धडगांव, उखाला, तोरणमाळ यापैकीं लळिंग, बोराडी व उखाला येथील बंगल्यांत प्रत्येकी एक खोली असून बाकीच्या सर्व बंगल्यांत दोन खोल्या आहेत.

वरील बंगले सोडल्यास लोकल बोर्डाचा एक बंगला शिंदखेडा येथें व माजी सैनिक मंडळाचा एक बंगला धुळें येथें आहे. या बंगल्यांत राहाण्याची परवानगी, अध्यक्ष जिल्हा लोकल बोर्ड व अध्यक्ष जिल्हा माजी सैनिकी मंडळ यांच्या कडून मिळू शकते.

विविध सुखसोयी



● तार ऑफीस
✕ सब् पोस्ट ऑफीस
■ टेलिफोन एक्सच्‌चेंज
▲ प्रवाश्यांना उतरण्यासाठीं बंगल्याची सोय असलेलीं ठिकाणें

१६. विविध माहिती

टपाल, तार व टेलिफोन व्यवस्था

धुळें येथें पोस्ट व तार खात्याची मुख्य कचेरी असून १७ सब् पोस्ट ऑफिसेस, १४१ ब्रँच पोस्ट ऑफिसेस, १६ तार कचेऱ्या आहेत. जिल्ह्यांत १० ठिकाणीं दूरध्वनीची व्यवस्था आहे. दूरध्वनीचीं स्वतंत्र केंद्रें (एक्स्चेंजेस) धुळें, दोंडाइचा व नंदुरबार या महत्त्वाच्या शहरीं आहेत.

१ धुळें, २ दोंडाइचा, ३ नंदुरबार, ४ नरढाणा, ५ नवापूर, ६ साक्री, ७ शहादा, ८ शिरपूर, ९ शिंदखेडा, १० तळोदा, ११ अक्कलकुवा, १२ धडगांव, १३ धुळें शहर, १४ धुळें स्टेशन, १५ दोंडाइचे रेल्वे स्टेशन, १६ नंदुरबार कचेरी, १७ सोनगीर, १८ पिंपळनेर. या ठिकाणीं सब् पोस्ट कचेऱ्या आहेत.

त्यापैकीं वरील १ ते १७ ठिकाणाहून तार पाठविण्याची व १ ते १० ठिकाणाहून दूरध्वनीची व्यवस्था आहे.

वृत्तपत्रें आणि नियतकालीकें

या जिल्ह्यांत दैनिक वर्तमानपत्र नाहीं. तरी जवळच्या नाशिक जिल्ह्यांतील "गांवकरी" हें दैनिक वृत्तपत्र (शहर आवृत्ति) जिल्ह्यांतील सर्व गांवांत रोज सहज मिळूं शकत असल्यामुळें ताज्या घडामोडी जिल्ह्यांच्या कानाकोपऱ्यांत पोंचूं शकतात. जिल्ह्यांतील घडामोडींचें व वृत्तांचें साप्ताहिक संकलन देणारीं अशीं १० साप्ताहिकें व एक पाक्षिक ह्या जिल्ह्यांत चालूं आहेत. हीं सर्व साप्ताहिकें जिल्ह्यांतील व जागतिक घडामोडींवर प्रकाश टाकीत असल्यामुळें व आठवड्यांतून निरनिराळ्या दिवशीं मराठींतून प्रसिद्ध होत असल्यामुळें तीं लोकप्रिय झालीं आहेत. कांहीं वर्षांपासून चालूं असलेलीं साप्ताहिकें खालील प्रमाणें आहेत.

स्वतंत्र भारत :—हे जिल्ह्यांतील सर्वांत जुनें साप्ताहिक गेलीं २५ वर्षें चालूं असून तें धुळ्याहून दर मंगळवारीं प्रसिद्ध होतें.

दलित सेवक :—हेंहि एक जुनें पाक्षिक गेल्या २० वर्षांपासून चालूं असून तें दर महिन्याच्या पहिल्या व पंधरा तारखेस धुळ्याहून प्रसिद्ध होतें.

वार्ता :—हें साप्ताहिक गेल्या १४ वर्षांपासून चालूं असून तें धुळ्यांहून दर शनिवारीं प्रसिद्ध होतें.

नवहिंद :—हें गेल्या १३ वर्षांपासून चालूं असून तें दर सोमवारीं धुळ्यांहून प्रसिद्ध होतें.

युगसंदेश :—हें गेल्या १३ वर्षांपासून चालूं असून तें दर सोमवारीं धुळ्यांहून प्रसिद्ध होतें.

गिरिजन :—हें साप्ताहिक नंदुरबार ह्या ठिकाणाहून निघत असून तें गेलीं सहा वर्षें दर सोमवारीं प्रसिद्ध होतें.

सुदर्शन :—हें साप्ताहिक धुळ्याहून निघत असून तें गेल्या ४ वर्षांपासून दर गुरुवारीं प्रसिद्ध होतें.

आपला महाराष्ट्र :—हें साप्ताहिक गेल्या दोन वर्षांपासून चालू असून तें धुळ्याहून दर शुक्रवारीं प्रसिद्ध होतें.

रचना :—हें साप्ताहिक धुळ्याहून निघत असून तें गेल्या दोन वर्षांपासून गुरुवारीं प्रसिद्ध होतें.

वनवासी :—हें नवीन साप्ताहिक दर सोमवारीं धुळ्याहून प्रसिद्ध होतें.

शहादा समाचार :—हें सुद्धां नव्यानें सुरू झालेल्या दोन साप्ताहिकांपैकीं असून तें शहादा येथून दर मंगळवारीं प्रसिद्ध होतें.

या जिल्ह्यांत वृत्तपत्र व्यवसायाशीं संबंध असलेल्या व्यक्तींचा एक मोठा संघ असून त्याचें नांव "पश्चिम खानदेश मराठी पत्रकार संघ" असें आहे. हा संघ धुळ्यास आहे व त्याचे अठ्ठावीस सभासद आहेत. तो बऱ्याच वर्षांपासून कार्य करीत आहे. पत्रकार संघाचें कार्य अध्यक्ष, उपाध्यक्ष, कोषाध्यक्ष व चिटणीस ह्यांच्या मार्फत चालते.

प्रसिद्धी व सामुदायिक श्रवण

ग्रामीण विभागांतील जनतेला राज्य व राष्ट्र उभारणीच्या प्रगतीची व कार्याची चलत्-चित्रपटांद्वारें माहिती देऊन विकास कार्यांतील त्यांची सुप्तशक्ति जागृत करण्याचें काम प्रसिद्धी विभागातर्फे करण्यांत येतें. त्याचप्रमाणें चालू घडामोडींची माहिती, विविध खात्यासंबंधी माहिती व कार्याची प्रगति, हस्तपत्रिका व पोस्टर्स आदींच्या साहाय्यानें ग्रामीण विभागांत पोहोचविली जाते. जिल्हा प्रसिद्धी विभागाला एक मोटार असून त्यांत चित्रपटाचें संपूर्ण साहित्य असतें. जिल्ह्यांत चित्रपट दाखविल्यानें ग्रामीण जनतेचें मनोरंजन व लोकशिक्षण साधलें जात आहे. प्रसिद्धी खात्याची कचेरी धुळें येथें आहे.

जिल्हा प्रसिद्धि विभागातर्फे धुळें येथें एक माहिती केंद्र उघडण्यांत आलें असून त्यांत राज्यातील दैनिकें, साप्ताहिकें व मासिकें तसेंच सरकारी माहिती देणारीं सर्व प्रकारचीं प्रकाशनें मोफत वाचनासाठीं ठेवण्यांत आलीं आहेत. जिल्ह्यांतील वृत्तपत्रांचे संपादक व वृत्तपत्र प्रतिनिधी यांना जिल्ह्यांतील विविध विकास कार्याच्या प्रगतीचें प्रत्यक्ष अवलोकन करतां यावें व जनतेला त्या कार्याची माहिती देतां यावी म्हणून प्रसिद्धी विभागातर्फे पत्रकारांना विकास कार्यें दाखिविण्यांत येतात.

या जिल्ह्यांतील बहुसंख्य ग्रामीण जनता दूरवर विखुरलेल्या लहान खेड्यांतून राहात असल्यामुळें बाहेरच्या जगाशीं तिचा संबंध कमी येत असतो. या जनतेचा बाहेरच्या जगाशीं व दैनंदिन घडामोडींशी संबंध जोडण्याचें महत्त्वाचें कार्य ग्रामीण रेडिओ योजनेद्वारें केलें जात असून जिल्ह्यांत आतांपर्यंत १४५ सामुदायिक श्रवणाचे रेडिओ सेट्स बसविले आहेत. दैनंदिन घडामोडींच्या वृत्ता-

बरोबरच शेतीच्या आधुनिक पद्धतीची माहिती, ग्रामीण स्वास्थ्य व अनक ग्रामीण प्रश्नांची चर्चा करणारे खास कार्यक्रम सामुदायिक श्रवण केंद्रासाठीं आकाशवाणीच्या विविध केंद्रांतून प्रसारित करण्यांत येत असल्यामुळें जिल्ह्यांत अशा रेडिओची मागणी सतत वाढत आहे.

महाराष्ट्र सरकारच्या प्रसिद्धी खात्याच्या ग्रामीण रेडिओ विभागातर्फे सामुदायिक श्रवणासाठीं ग्रामपंचायती, सहकारी संस्था, नगरपालिका इत्यादि संस्थांना रेडिओ सेट्स मिळूं शकतात. सुरवातीला रेडिओ बसविण्याची वर्गणी १७५ रु. व त्याचा दर वर्षाला दुरुस्ती व बॅटरीचा खर्च रु. ६० भरावा लागतो. नंतर दर वर्षाला रु. ६० वर्गणी भरावी लागतें. या जिल्ह्यांत रेडिओ बसविण्यासाठीं व त्यांची काळजी घेण्यासाठीं एका सुपरवायझरची नेमणूक करण्यांत आली असून त्यांची कचेरी धुळें येथें आहे. त्यांना स्वतंत्र मोटार दिलेली असून नवीन रेडिओ बसविण्याचें व बसविलेल्या रेडिओंच्या दुरुस्तीचें काम ते पाहात असतात.

महापूर संकट निवारण मंडळ

१९५९ च्या सप्टेंबर महिन्याच्या १५ व १६ तारखेस तापी नदीस आकस्मिकपणे आलेल्या महापुरामुळें ह्या जिल्ह्यांतील कांहीं गावांवर मोठी आपत्ती कोसळली. ह्या नैसर्गिक आपत्तीमुळें जिल्ह्यांतील १०० गांवांत राहात असलेल्या ३२७८ कुटुंबांवर संकट कोसळलें होतें. बऱ्याच कुटुंबांचीं घरें व जमिनी वाहून गेल्यामुळें तीं निराधार झाली. त्यावेळेस ताबडतोब उपाययोजना करण्याच्या दृष्टीनें लोकांना पैशाची, कपडयाची, धान्याची, भांडी व इतर जीवनावश्यक वस्तूंची तात्काळ मदत देण्यांत आली.

पुढें या जिल्ह्यांतील पूरग्रस्त निराश्रितांच्या स्थायी स्वरूपाच्या पुनर्वसन कार्याची संघटित व सूत्रबद्ध अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीनें जिल्हाधिकारी ह्यांच्या अध्यक्षतेखालीं महापूर संकट निवारण मंडळ, धुळें येथें स्थापन करण्यांत आलें. अजूनहि ह्या मंडळाचें कार्य चालू असून त्याखालीं ३७ नवीन गांवें वसविण्याचें कार्य चालूं आहे. ह्या शिवाय महापुरामुळें ज्या लोकांचें नुकसान झालें असेल त्यांना मदत दिली जात आहे. लोकांना घरें, विहिरी, रस्ते, शाळा यांचें बांधकाम व इतर बाबींसाठीं आजपावेतो जवळ जवळ सात लाख रुपयांचेवर सरकारनें मदत केली आहे व अजूनहि मदतीचें कार्य चालूं आहे. वरील संकटप्रसंगीं जिल्ह्यांतील विविध संस्था सर्वोदय मंडळ, रेडक्रॉस, व इतर सामाजिक कार्यकर्ते ह्यांनींहि अतिशय परिश्रम घेऊन पूर पीडितांना सर्व प्रकारें मदत केली.

जिल्हा उद्योग-विनिमय केंद्र

जिल्हा उद्योग विनिमय केंद्र दि. २३ मार्च १९५९ पासून या जिल्ह्याकरितां धुळें येथें स्थापन करण्यांत आलें असून गरजेप्रमाणें योग्य त्या उमेदवारांची माहिती देण्याचें कार्य ह्या कचेरी मार्फत केलें जातें. नोकरी मिळवूं इच्छिणाऱ्या उमेदवाराला या ठिकाणीं नांवे नोंदविता येतात. त्यांची शैक्षणिक, तांत्रिक व इतर लायकी तसेच पूर्वानुभव वगैरेची नोंद करण्यांत येऊन त्यांच्या अपेक्षेप्रमाणें व योग्यता लक्षांत घेऊन खाजगी, सरकारी किंवा निम सरकारी क्षेत्रांत रिकाम्या असलेल्या जागेसाठीं त्यांचीं नांवें सुचविण्यांत येतात. शैक्षणिक क्षेत्रांतून नुकत्याच बाहेर पडलेल्या उमेदवारांस लहान पुस्तिकेच्या आधारें राष्ट्रांत उपलब्ध असलेल्या निरनिराळ्या तांत्रिक शिक्षणाची माहिती करून देण्यांत येते. नोकरी मिळवूं इच्छिणारा उमेदवार प्रत्यक्ष हजर राहून किंवा पोस्टानें स्वतःचें नांव रजिस्टर करूं शकतो व त्यास नोंदणी कार्ड दिलें जातें.

सध्यां या जिल्ह्यांत तांत्रिक शिक्षण घेतलेल्या (उदा. टायपिस्ट, स्टेनोग्राफर, मेकॅनिक्स, फिटर्स, वेल्डर्स, तांत्रिक प्रशिक्षण घेतलेले शिक्षक इ.) नोकर वर्गाचा तुटवडा असून कारकून, हमाल, शिपाई ह्या व्यवसायांतील उमेदवार जरुरीपेक्षां जास्त आहेत. जून १९६० अखेर एकूण २७४६ उमेदवारांचीं नांवें उद्योगविनिमयासाठीं शिल्लक असून त्यांचें वर्गीकरण खालील प्रमाणें आहे.

मॅट्रिक इतर ग्रॅज्युएट वगैरे–९७७, मॅट्रिकपेक्षां कमी शिक्षण असलेले–१६८७, इतर–८२.

जिल्हा अल्पबचत सल्लागार मंडळ

राष्ट्र उभारणीच्या कामीं प्रत्येकाचा हातभार लागावा या दृष्टीनें ग्रामीण पातळीवर अल्प-बचतीचें कार्य सुरू करण्यांत आलें आहे. जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली एक अल्पबचत सल्लागार मंडळ कार्य करीत असून त्याची कचेरी धुळें येथें आहे. या जिल्ह्यांतील सरकारी व बिनसरकारी कचेऱ्या आणि विद्यार्थी व शिक्षक यांचे बचत गट स्थापन झाले असून ते निश्चित उत्पन्नांतून नियमित बचतीचे उल्लेखनीय कार्य करीत आहेत. तसेंच धुळें येथील सुमारे ६०० बिडी कामगार दर आठवड्यास प्रत्येकी ४ आणे प्रमाणें बचत करीत आहेत.

जिल्हा माजी सैनिक मंडळ

जिल्ह्यांतील माजी सैनिकांचें पुनर्वसन, त्यांच्या मुलाबाळांचें शिक्षण, आरोग्य आणि कुटुंबियांच्या हितसंबंधाकडे लक्ष ठेवण्यासाठीं धुळें येथें जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा माजी सैनिक मंडळ कार्य करीत असून सदर मंडळानें धुळें येथें माजी सैनिकांच्या मुलांकरितां विद्यार्थी वसतिगृह बांधलें आहे.

जिल्हा आंकडेशास्त्र कचेरी

जिल्ह्यांतील विविध विभागानें केलेल्या कार्याच्या प्रगतीची आंकडेवार माहिती एकत्र करण्याचें काम जिल्हा आंकडेशास्त्र कचेरी (जिल्हा स्टॅटिस्टिकल कचेरी) मार्फत होत असून सदर आंकडेशास्त्र अधिकाऱ्यांची कचेरी धुळें येथें अलीकडेच सुरूं झाली आहे. जिल्ह्यांतील निरनिराळ्या विभागाच्या प्रगतीची माहिती वरील कचेरीव्दारें उपलब्ध होऊं शकेल.

जिल्हा होमगार्ड संघटना व भारत सेवक समाज

या जिल्ह्याकरितां होमगार्ड संघटना असून त्याची व भारत सेवक समाजाची प्रमुख कचेरी धुळें येथेंच आहे.

जिल्हा दारूबंदी कचेरी

धुळें येथें जिल्हा दारुबंदी अधिकाऱ्यांची कचेरी असून सांस्कृतिक व करमणुकीचे कार्यक्रम ग्रामीण भागांत करून दारुबंदीचें कार्य या विभागातर्फे केलें जातें.

सेल्स टॅक्स, इन्कम टॅक्स व सेंट्रल एक्साईज

या जिल्ह्यांत सेल्स टॅक्स, इन्कम टॅक्स व सेंट्रल एक्साईज टॅक्स यांच्या जिल्हापातळीवरील अधिकाऱ्यांच्या कचेऱ्या धुळें येथेंच आहेत. जिल्ह्यांत सेल्स टॅक्सपासून दरवर्षी सुमारे २० ते २२ लाख रुपयांचें उत्पन्न येतें.

इन्कम टॅक्स भरणाऱ्यांची संख्या जिल्ह्यांत सुमारें २२०० असून त्यापासून गेल्या वर्षी जवळ जवळ १२,५०,००० रुपये उत्पन्न आलें.

या जिल्ह्यांत गेल्या वर्षी तंबाखू, तेलें, कापड, चहा, साबण यावर आकारण्यांत आलेल्या सेंट्रल एक्साईज टॅक्समुळें ४५,४८,८०० रुपये उत्पन्न झालें.

ह्या जिल्ह्यांत लाईफ इन्शुरन्स कॉर्पोरेशनची धुळें येथें शाखा आहे. तिचे पॉलिसी होल्डर्स

लाईफ इन्शुअरन्स ३३२५ असून त्यांनीं १,००,४७,५५० रु. चे विमे उतरविले आहेत.

सध्यां ह्या जिल्ह्यांत खालील पांच गांवांतून विद्युतपुरवठा चालू असून त्याचा उपयोग

विद्युत्व्यवस्था उजेडाबरोबरच लहान मोठ्या उद्योगधंद्यासाठींहि होत आहे.

धुळें, शिरपूर, नंदुरबार, दोंडाईचे, खांडबारा.

या जिल्ह्यांत एकूण २४ चित्रपट गृहें असून त्यापैकी सात चित्रपट गृहें फिरती आहेत.

चित्रपट गृहें स्थायिक चित्रपट गृहें खालील गांवांतून आहेत.

धुळें (७), नंदुरबार (३), शहादा (२), शिरपूर (२), दोंडाईचे, नवापूर, तळोदे प्रत्येकी एक.

फिरती चित्रपटगृहें :—शिंदखेडा, नरढाणा, सारंगखेडा, प्रकाशें, साक्री, निझामपूर, पिंपळनेर या ठिकाणीं असून ती जिल्ह्यांतून लहान मोठ्या खेडेगांवांतून

फिरतीं चित्रपटगृहें फिरता मुक्काम ठेवून ग्रामीण जनतेचें मनोरंजन करीत असतात.

१७. कोणाकडे कशाची चौकशी करावी

	कामाचें नांव	संबंधित अधिकारी
१	लागवडीकरितां जमीन, तगाई, कर्ज, लोखंड, सिमेंट	जिल्हाधिकारी व अध्यक्ष, जिल्हा विकास मंडळ धुळें व तालुका पातळीवर तालुका मामलेदार.
२	शेतीच्या सुधारलेल्या पद्धति, रासायनिक खतें, सुधारलेलीं बी-बियाणें, अवजारें आणि कीटक नाशक औषधें	जिल्हा शेती अधिकारी, धुळें अथवा तालुका पातळीवरील संबंधित तालुक्याचे शेतकी अधिकारी.
३	उन्हाळी पिकाच्या लागवडीसंबंधीं	शेती संशोधन केंद्र किंवा शेतकी अधिकारी, धुळें.
४	शेती शिक्षणक्रम, शेती शाळेंत प्रवेश व त्यासंबंधींची माहिती	मुख्याध्यापक, शेती शाळा, धुळें आणि जिल्हा शेतकी अधिकारी, धुळें.
५	पीक-स्पर्धा व प्रदर्शनें	जिल्हा विकास मंडळ, धुळें
६	सहकारी संस्थांची स्थापना, कार्यपद्धति व सहकारी चळवळीसंबंधींची माहिती	डेप्युटी रजिस्ट्रार, सहकारी संस्था, धुळें किंवा तालुका पातळीवर विकास योजना क्षेत्रांतील सहकारी खात्याचे विस्तार अधिकारी.
७	शिक्षण संस्थांची स्थापना, कार्य आणि त्यासंबंधीं माहिती.	जिल्हा शिक्षण अधिकारी, धुळें.
८	प्राथमिक शिक्षण व तत्संबंधी माहिती	प्रशासक, जिल्हा शिक्षण मंडळ, धुळें
९	आर्थिक दृष्टीनें मागासलेल्या वर्गांतील जनतेस मिळणाऱ्या शैक्षणिक सवलतीसंबंधीं	समाज कल्याण अधिकारी, धुळें.
१०	रस्ते, पूल आणि पाटबंधाऱ्यांचें बांधकाम दुरुस्ती व तत्संबंधीची माहिती.	एक्झिक्युटिव्ह इंजीनिअर, दळणवळण व बांधकाम खातें, धुळें.
११	ग्रामीण भागांतील लहान उद्योगधंदे, त्यांना मिळणारें सरकारी साहाय्य व मार्गदर्शन वैयक्तिक कलाकारास मिळणाऱ्या साहाय्यासंबंधीं माहिती.	इंडस्ट्रिअल इन्स्पेक्टर, कॉटेज इंडस्ट्रीज, धुळें.

१२	जनावरांचें संगोपन, त्यांच्या रोगावरील उपाययोजना आणि कोंबडी पालन.	डिस्ट्रिक्ट (ॲनिमल हजबंडरी) व्हेटरनरी ऑफिसर, धुळें किंवा तालुक्यांतील जनावरांच्या दवाखान्यांतील अधिकारी.
१३	प्रवाश्यांची विश्रामस्थानें व त्यांत जागा राखून ठेवण्यासाठीं	एक्झिक्युटिव्ह इंजीनिअर, दळणवळण व बांधकाम खातें, धुळें.
१४	ग्रामीण विभागांत ग्रामपंचायती, सहकारी संस्थांतून सामुदायिक श्रवणासाठीं रेडिओ बसविणें व त्यासंबंधी माहिती.	टेक्निशियन इन् चार्ज, ग्रामीण रेडिओ धुळें.
१५	अस्पृश्य व मागास वर्गांतील जनतेला मिळणाऱ्या सवलती, साहाय्य व सुखसोयी-संबंधी माहिती.	जिल्हा समाज कल्याण अधिकारी, धुळें
१६	सार्वजनिक आरोग्य संवर्धन उपचार-व्यवस्था व सांथीचे रोग प्रतिबंधक उपाय-योजनेसंबंधी.	जिल्हा आरोग्य अधिकारी, धुळें.
१७	मलेरिया निर्मूलन व डी. डी. टी फवारण्या-संबंधी.	आरोग्य अधिकारी (मलेरिया निर्मूलन) धुळें.
१८	विहिरी, तलाव, रस्ते, शाळागृहें आदींच्या स्थानिक विकास कार्यक्रमांतून होणाऱ्या बांधकामासंबंधी	जिल्हा विकास मंडळ, धुळें.
१९	विकास गट क्षेत्रांतील विकास कामें, त्यांची कार्यपद्धति व त्यांस मिळणाऱ्या साहाय्या-संबंधी.	संबंधित विकास गटाचे अधिकारी अथवा जिल्हा प्रकल्पाधिकारी, धुळें.
२०	सर्वोदय क्षेत्रांतील विकास कामें व त्यांची कार्यपद्धति.	संचालक, सर्वोदय केंद्र, खांडबारा.
२१	जिल्ह्यांतील पोलिस यंत्रणा व त्यासंबंधीची माहिती व नियम.	जिल्हा पोलिस प्रमुख, धुळें.
२२	जंगलांचें संरक्षण, संवर्धन आणि तत्संबंधीचे नियम व माहिती.	डिव्हिजनल फॉरेस्ट ऑफिसर, धुळें.
२३	गांवांत पोस्ट सुरू करणें, टपालाची, तारेची व्यवस्था किंवा टपाल व तार खात्यासंबंधीची कार्यपद्धति व इतर माहिती.	सुपरिंटेंडंट, पोस्ट ऑफिसेस, धुळें.
२४	एस्. टी. चे मार्ग, त्यांची कार्यपद्धति व तत्संबंधीची माहिती.	कंट्रोलर, स्टेट ट्रॅन्स्पोर्ट, धुळें.

२५	हौशी प्रवाश्यांची आकषणें व तत्संबंधी माहिती.	जिल्हा प्रसिद्धी अधिकारी, धुळ.
२६	ग्रामीण भागांत रस्ते, आरोग्य व पाणी पुरवठ्यासंबंधी.	जिल्हा लोकल बोर्ड, धुळें.
२७	नोकरी मिळविणाऱ्यांच्या नांवनोंदणी संबंधी.	जिल्हा एम्प्लॉयमेंट अधिकारी, धुळें.
२८	माजी सैनिकांच्या, त्यांच्या मुलाबाळांच्या व कुटुंबियांच्या हितसंबंधाच्या प्रश्नासंबंधी.	जिल्हाधिकारी व अध्यक्ष जिल्हा माजी सैनिक मंडळ, धुळें.
२९	जिल्ह्यांतील विविध विभागांच्या योजनांची माहिती व त्यांसंबंधीची प्रगति.	जिल्हा प्रसिद्धी अधिकारी, धुळें.
३०	अल्पबचत योजना व तत्संबंधीच्या कार्यपद्धतीची माहिती.	राष्ट्रीय बचत संघटक, जिल्हाधिकारी कचेरी, धुळें.
३१	जिल्ह्यांतील विकास कामें व तत्संबंधी माहिती.	जिल्हा विकास मंडळ ,धुळें.
३२	जमिनीची बांध-बंदिस्ती करण्यासंबंधी माहिती	जिल्हा भूसंरक्षण अधिकारी, धुळें.
३३	विरनार कापसाच्या लागवडी संबंधी	शेतकी अधिकारी, विरनार कापूस योजना, धुळें.


५०५

भौगोलिक रचना



नद्या
डोंगर
नर्मदा नदी
धडगांव
सा त पु डा प र्व त
अक्कलकुवा
तळोदे
गोमती नदी
शहादे
सा त पु डा प र्व त
तापी नदी
शिरपूर
अरुणावती नदी
नंदुरबार
अनेर नदी
शिंदखेडे
नवापूर
सा क्री
धुळें
पांझरा नदी
बोरी नदी

शासनव्यवस्था


धडगांव
अक्राणी महाल
अक्कलकुवा तालुका
अक्कलकुवा
तळोदे तालुका
तळोदे
शहादे तालुका
शहादे
सारंगखेडे
शिरपूर तालुका
शिरपूर
थाळनेर
नंदुरबार
नंदुरबार तालुका
दोंडाईचें
शिंदखेडे
शिंदखेडे तालुका
नवापूर तालुका
नवापूर
सोनगीर
साक्री
साक्री तालुका
धुळें
धुळें तालुका
तालुका
महाल
तालुका-महालाचें मुख्य ठिकाण
महसुल न्यायालयें
पोलीस स्टेशन्स
दिवाणी व फौजदारी न्यायालयें
प्रांताधिकारी न्यायालयें
जिल्ह्यांचें मुख्य ठिकाण
जिल्हा न्यायालयें
नगरपालिका